# मिळून साऱ्याजणी


पुणे । वर्ष एकविसावे । अंक दुसरा । सप्टेंबर २०२१ (मासिक) । पृष्ठसंख्या ६० । किंमत ₹ ५०/-
Miloon Saryajani | Pune | Vol. 21 | Issue 2nd | September 2021 (Monthly) | Pages 60 | Price Rs. 50


'ती', 'ते' आणि 'तो'
यांचा स्वतःशी आणि परस्परांशी
नव्यानं संवाद होण्यासाठी...
मासिक नव्हे चळवळ!










MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
www.mkcl.org/mscit
उद्याच्या जगात वावरण्याचा आत्मविश्वास!
MS-CIT मध्ये आता शिका चौथ्या औद्योगिक क्रांतीची ओळख
Big Data
Augmented Reality
Machine Learning
Virtual Reality
Artificial Intelligence
Internet of Things
Robotics
3D Printing
MKCL
ज्ञानदीप लावू जगी
MKCL
KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers
www.klic.mkcl.org
करियर ओरिएंटेड 'क्लिक्' कोर्सेस
Tally Prime with GST
Advanced Excel
Digital Freelancing
C & C++ Programming
DTP Corel & Photoshop
Mobile Apps Development
Coding
IT Hardware & Networking
Internet of Things (IoT)
BFSI
IT for Teachers
Retail Management
क्लिक् कोर्सेस :
• जॉब रेडिनेस
• मॅनेजमेन्ट
• प्रोग्रॅमिंग
• डिजिटल आर्टस्
• डिझायनिंग
• न्यू कॉलर जॉब
• अकाउंटिंग
कोर्स उपलब्ध:
केंद्रात/घरी
कंप्यूटरवर/स्मार्टफोनवर
अधिक माहितीसाठी MS-CIT केंद्राशी संपर्क साधा.
8956537496

पानोपानी

सप्टेंबर २०२१

# मिळून साऱ्याजणी

www.miloonsaryajani.in | आरंभ–ऑगस्ट १९८९



संस्थापक–संपादक

**स्मृतिशेष विद्या बाळ**

**संपादक** : गीताली वि. मं.

**व्यवस्थापक** : मानसी घाणेकर

**संपादन साहाय्य** : पूनम बा. मं.

**कार्यालयीन व्यवस्थापन** :
प्रगती सावंत, आशा देशमुख

**मुखपृष्ठ चित्र** : दुर्गा टिळक
मोबाईल : ९३७३००७३७३

**अंक जुळणी–अंक मांडणी** :
सारद मजकूर, पुणे

**आतील सुलेखन व चित्रे** :
राजू देशपांडे, शेखर गोडबोले
गिरीश सहस्रबुद्धे
आणि इंटरनेटवरून साभार

**मुद्रितशोधन** : हृषीकेश पाळंदे
आणि साऱ्याजणी

**अक्षरजुळणी** : नीला देशपांडे

**सल्लागार** : दीपा देशमुख,
जमीर कांबळे

**माध्यम संवादक** :
संदीप 'मसहूर'
मो. ९४२३८ ५८०७७

**कार्यालयीन पत्ता** :
फ्लॅट नं.१०१, पहिला
मजला, नचिकेत को–ऑप. हौ.
सोसायटी, प्रभात रोड, गल्ली
क्रमांक ४, एरंडवणा,
पुणे–४११००४

**कार्यालयीन संपर्क** :
०२०–२५६५३९३८, ७४४७४४९६६४
saryajani@gmail.com

**कार्यालयीन वेळ** :
सोम. ते शुक्र. दु. १२ ते ५

वार्षिक वर्गणी
व्यक्तीसाठी ५०० रु.
संस्थेसाठी ७०० रु.
(अधिक तपशील पान क्र. २१ वर)



- **शांतिसंवाद**
  गीताली वि. मं. । ४
- **(अमेरिकेच्या) तळ्यात, (मेक्सिकोच्या) मळ्यात**
  भाग्यश्री बारलिंगे । ६
- **स्वतंत्र, लोकशाही देशातली एका कार्यकर्त्याची शहादत!**
  सुनीति सु. र. । १०
- *# हॅशटॅग लैंगिकता*
  **लैंगिकता आणि भाषेचा व्यवहार**
  जमीर कांबळे । १२
- *विशेष ओळख*
  **मनामनात सूर्य पेरणारी अरुणा**
  मंजुषा सावरकर । १४
- **क्रांतिवीरांगणा इंदूताई पाटणकर पुरस्कार प्रदानाच्या वेळी केलेले भाषण**
  निशा शिवूरकर । १६
- *कथा*
  **एकट्या तिघी**
  अभय वळसंगकर । १८
- **महिला आरक्षण विधेयक**
  लता भिसे सोनवणे । २२
- *पुस्तकांच्या मनात*
  **मुलांच्या सहभागातून शिस्त : एक प्रयोग**
  गौरी देशमुख, कल्याणी सोहोनी । २४
- **कोरोनाचा कळस!**
  वैशाली पंडित । २८
- **शब्दांकित : काही कडू, काही गोड!**
  आशा साठे । ३०
- **कविता**
  एच. ए. पाटील, ज्योती कदम, ज्ञानेश्वर बाविस्कर, प्रभा सोनवणे, तुषार पाटील निंभोरेकर । ३२
- **सुमित्राताई नावाचं 'शांत वादळ'**
  डॉ. सविता मोहिते । ३४
- **सुमित्राताई देखने जंगल में**
  मीना गोखले । ३६
- *जोडोनिया मन ऑनलाइन व्यवहारे*
  **ऑनलाईन खरेदी–विविध पैलू**
  कौमुदी अमीन । ३८
- *कळा ज्या लागल्या जीवा*
  **भाकरीच्या शोधात शक्तिमान**
  सारिका । ४०
- *निष्पर्ण नोंदी*
  **खेरून ।** प्रियांका तुपे । ४२
- **तरुण तेजपाल जजमेंटच्या निमित्ताने**
  मनीषा तुळपुळे, प्रीती करमरकर । ४६
- **माय बाप शेतकऱ्याचं चांगभलं**
  कविता । अन्ना जगताप । ५२
- **आपल्या वाचनालयात** ।
  अश्विनी बर्वे । ५३
- **वाचणारे लिहितात** । ५४
- **'मिळून साऱ्याजणी'चं सामाजिक पालकत्व – भूमिका**
  परेश जयश्री मनोहर । ५५
- **प्रतिनिधी यादी** । ५८



निरामय पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या मालकीचे मिळून साऱ्याजणी मासिक मुद्रक, प्रकाशक गीताली वि. मं. यांनी युनिक ऑफसेट, १५२३, सदाशिव पेठ, आनंदशिल्प, पुणे ४११०३० येथे छापून फ्लॅट नं.१०१, पहिला मजला, नचिकेत को–ऑप. हौ. सोसायटी, प्रभात रोड, गल्ली क्रमांक ४, एरंडवणा, पुणे ४११००४ येथे प्रसिद्ध केले. **संपादक : गीताली वि. मं.**

'MiloonSaryajani' Monthly is owned by Niramaya Public Charitable Trust, Printed and Published by Getaali V. M., Printed at Unique Offset, 1523, Sadashiv Peth, Anandshilp, Pune 411030 and Published at Flat No.101, 1st floor, Nachiket CHS, Prabhat Road, Lane No.4, Erandawana, Pune 411004. **Editor - Geetali V. M.**



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही. अंकात प्रसिद्ध केलेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

## शांतिसंवाद



प्रिय वाचक,

सस्नेह नमस्कार!

नुकत्यातच टोकियोमधलं ऑलिंम्पिक्स यशस्वीपणे पार पडलं. मणिपूरच्या इम्फाळमधली साईखोम मीराबाई चानू, पी. व्ही. सिंधू यांच्या पाठोपाठ बॉक्सिंगमध्ये ब्राँझपदक मिळवून लव्हलिना बरगोहॉई हिनं तिथं इतिहास घडवला. आसामच्या गोलाघाट जिल्ह्यातल्या छोट्या दुकानदाराच्या या मुलीला ट्रॅकसूट किंवा डाएटसाठीही पैशांची वानवा होती, पण तिची जिद्द डोंगराएवढी होती. घरी आणलेल्या मिठाईच्या कागदावर महान खेळाडू महंमद अलीचं छायाचित्र पाहून तिनं त्याच्यासारखं होण्याचा ध्यास घेतला. 'मुली काही करू शकत नाहीत', असं म्हणणारे अवतीभोवती अनेक होते. पण लव्हलिनाच्या आईचं मुलींबाबत स्वप्न होतं की, 'अशी कामगिरी करून दाखवा, की सर्व जण तुम्हाला लक्षात ठेवतील.' ते स्वप्न लव्हलिनानं सत्यात उतरवलं. सिल्व्हर मेडल मिळवणाऱ्या मीराबाई चानूचं आयुष्यही तसं खडतरच होतं. लाकडाच्या मोळ्या वाहणारी मीराबाई जगाच्या नकाशावर दिमाखात झळकली तिच्या कठोर परिश्रम, सातत्य आणि स्वप्न पूर्ण करण्याच्या ध्यासामुळेच! पी. व्ही. सिंधू तर दिलदार खेळाडूवृत्तीची म्हणून सर्वांना माहितीच आहे. महिला हॉकी टीमनं भलेही पदक मिळवलं नाही, तरी लोकांची मनं कशी जिंकली, हे आपण अनुभवलं आहे. त्या टीममधल्या मुलींचा संघर्ष काळजाला हात घालणारा आहे. त्यांच्या जातींचा झालेला 'उद्धार' अतिशय संतापजनक आणि शरमेनं मान खाली घालायला लावणारा आहे. त्याचा त्रिवार धिक्कार!

क्रिकेटच्या मैदानातही महिला 'हम भी कुछ कम नही' हेच दाखवून देताहेत. इंग्लंडविरुद्ध सामन्यात नाबाद पाऊण शतकी खेळी करून विजय मिळवून देणाऱ्या मिताली राजनं, दहा हजार धावांचा विक्रमी टप्पा पार केला आहे. सर्वाधिक धावांसह सर्वांत मोठी कारकीर्द, पदार्पणात शतक, महिलांमधली पहिली द्विशतकवीर असे अनेक विक्रम तिच्या नावावर आहेत. १९९९ मध्ये आंतरराष्ट्रीय एकदिवसीय सामन्यात सोळा वर्षांच्या मितालीनं पदार्पणात शतक झळकवलं. खेळाडू आणि कर्णधार म्हणूनही तिची कारकीर्द चमकदार राहिली. अर्जुन पुरस्कार आणि पद्मश्रीनं गौरवलेल्या मितालीवर 'शाब्बास मिठू' हा बायोपिक येतो आहे. मितालीमुळे महिला क्रिकेटला वलय मिळालं. तिच्या कर्तबगारीमुळे दिपून जाऊन अनेक मुलींमध्ये क्रिकेटचं मैदान गाजवण्याची प्रेरणा आणि जिद्द जागी झाली, हे खूप आशादायी चित्र आहे, नाही का? गेली ४०-५० वर्षं स्त्री-चळवळ स्त्रीचं आत्मभान, आत्म सन्मान आणि आत्मविश्वासासाठी अनेकानेक क्षेत्रांत प्रयत्न करते आहे, त्याचं हे फलित आहे असं म्हणणं चुकीचं होणार नाही.

स्त्री स्वातंत्र्यासाठी पितृसत्ताक पुरुषप्रधानतेच्या बालेकिल्ल्याला खिंडारं पाडून नेस्तनाबूत करण्याचं काम गेली दीड-दोनशे वर्षांपासून अव्याहतपणे सुरू आहे. त्यात सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, जाईबाई चौधरी, सावित्रीबाई रोडे यांच्यासारख्या संघर्षशील स्त्रियांबरोबरच जोतिबा फुले, महर्षि शिंदे, धोंडो कर्वे, आगरकर, रानडे, राजाराम मोहनराय, बेहरामजी मलबारी, विद्यासागर, गांधी-आंबेडकर असे किती तरी थोर पुरुषही सहभागी आहेत. या सर्वांच्या खांद्यावर उभी राहिलेली स्त्री मुक्ती चळवळ त्यांचं ऋण सदोदित मानत असते.

१९७५ पासून स्त्रीमुक्ती चळवळीला स्त्रीवादी परिमाण लाभलं. १९८९ पासून स्त्री अभ्यासाला चालना देण्यासाठी विद्यापीठ आयोगाच्या अर्थसाह्यातून स्त्री अभ्यासकेंद्रं सुरू झाली, त्यांची संख्या झपाट्याने वाढते आहे. भारतातली स्त्री चळवळ, स्त्रीवादी विचार आणि स्त्रियांची सद्यस्थिती याविषयीचं माहितीसंग्रहण, संशोधन, विश्लेषण विद्यापीठीय पातळीवर शास्त्रशुद्ध रीतीनं मोठ्या प्रमाणावर सुरू झालं. अभ्यास विषय, अभ्यासक आणि कार्यकर्ते यांच्यात सेतू उभारण्याचं काम स्त्री अभ्यास केंद्रानं करणं अपेक्षित आहे. ते चालू आहे, पण त्यात अधूनमधून खोडसाळपणे अडथळे आणण्याचं कामही पुरुषी मानसिकता असणारं शासन-प्रशासन करत असतं. 'जे जे व्यक्तिगत ते ते राजकीयच' ही घोषणा सर्वदूर पसरवण्याचा प्रयत्न करून स्त्रीला कुटुंबांतर्गत होणारी मारहाण, हुंडाबळी, सासरी होणारा छळ या व्यक्तिगत समस्या नसून त्या पुरुषप्रधान व्यवस्थेचा परिपाक आहे, हे स्त्रियांना प्रभावीपणे सांगून त्यांच्यातला न्यूनगंड कमी करण्यात चळवळ थोडीफार यशस्वी झाली आहे. स्त्रिया स्वतःहून हिंसाचार, अत्याचाराविरुद्ध पोलिसांत तक्रार करू लागल्या आहेत. हे सर्व सकारात्मक असलं तरी १९९० नंतर सामूहिक हिंसेत ब्राह्मण्यवादी पुरुषसत्ताक विचारसरणीनं प्रभावित झालेल्या स्त्रिया सहभागी होऊ लागल्या आहेत,

हे दु:खद आणि चिंताजनक वास्तव आहे. बाबरी मस्जिद विद्ध्वंस, गुजराथमधला नरसंहार, खैरलांजी हत्याकांड आणि इतर ठिकाणी होणारे दलित व मुस्लिम समुदायांवरच्या अन्याय, अत्याचारात सहभागी होणंही काही त्याची उदाहरणं!

ब्राह्मण्यवादी पुरुषसत्ताक विचारानं प्रभावित झालेल्या स्त्रिया (म्हणजे ब्राह्मण स्त्रियाच नाही तर इतरही) 'इतर' स्त्रियांवरच्या अत्याचारात सामील होण्याचं प्रमाण वाढलंय. याचा अर्थ स्त्रियांचं 'स्त्रीभान' जागं न होता स्त्रियांच्या जात-जमातीय अत्याचारांमधल्या सहभागातून, झुंडीकरणातून स्त्रियांचं जाती-जमातीचं भ्रामक भान जागं करण्यात पितृसत्ताक पुरुषप्रधान व्यवस्था यशस्वी होते आहे. यातून स्त्री चळवळ किती गुंतागुंतीची आहेआणि स्त्रीप्रश्न सोडवणं किती जटील-गहन, असं अवघड काम आहे, याची प्रखरतेनं जाणीव होते. धर्म व संस्कृती यांच्या माध्यमातून राजकीय सत्ता बळकावण्याच्या राजकारणाचे हे सर्व दुष्परिणाम आहेत. याचं ज्वलंत उदाहरण म्हणजे महिला आरक्षण विधेयक! १२ सप्टेंबर २०२१ ला विधानसभा आणि लोकसभेत महिला आरक्षण असावं या विधेयकाला तब्बल पंचवीस वर्षं पूर्ण होताहेत. राज्यसभेत मंजूर झालेलं हे विधेयक लोकसभेत इतकी वर्षं का लटकलेलं राहिलं? याचा सविस्तर उहापोह करणारा भारतीय महिला फेडरेशनच्या राज्य सचिव लता भिसे-सोनावणे यांचा या अंकातला अभ्यासपूर्ण लेख जरूर वाचा. विधानसभा, लोकसभेत ३३% स्त्रिया आल्या तर पितृसत्ताक पुरुषप्रधान राजकारण बदलून समतावादी राजकारणाचं पर्व सुरू व्हायला नक्कीच मदत होईल.

स्त्रिया जास्त संख्येने राजकारणात आल्या की आपोआप हे घडेल असा भाबडा आशावाद यात नाही, पण समतावादी राजकारणासाठी खरं तर ५०% स्त्रिया राजकारणात हव्यात, ही पूर्वअट आहे हे लक्षात घेऊन महिला आरक्षण विधेयक पारित होण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करू या.

सर्वत्र नांदणाऱ्या पुरुषप्रधान माहोलात झाकोळलेलं स्त्रियांचं यश, त्यांचा संघर्ष, त्यांचे हक्क, अधिकार आणि ते मिळवताना त्यांना येणाऱ्या अनंत अडचणी यांचं भान येण्यासाठी या सर्व गोष्टी सतत सांगत राहाव्या लागतात. जगभर स्त्रीवादी कार्यकर्त्यांना सतत चिंता वाटत असते, की आपण जीवाची बाजी लावून केलेला संघर्ष तरुण पिढी पुढे घेऊन जाईल की नाही? भारतात ही चिंता करू नका, असं सांगणारा **'Saved by our Women'** हा जुबान प्रकाशनाच्या संचालक उर्वशी बुटालिया यांचा जून २५,२०२१ चा इंडियन एक्स्प्रेसमधला लेख जरूर वाचावा असा आहे. आदिवासी, दलित, कामगार, शेतकरी, कैदी, विद्यार्थी, नागरिक, स्त्रिया अशा अनेकानेक पीडित-वंचित घटकांच्या हक्क-अधिकारांसाठी संघर्ष करणाऱ्या, मानवी अधिकाराचा आवाज बुलंद करणाऱ्या हिडमे मारकम, अमूल्या, दिशा रवी, नोदीप कौर, नताशा, देवांगना, कल्याणीसारख्या अनेकानेक तरुण कार्यकर्त्यांचं कौतुक करणारा हा लेख आहे. त्यात त्यांच्याबरोबर संघर्षात उतरलेल्या अगणित स्त्रिया आहेत. त्या भले स्त्रीवादी विचारांच्या नसतीलही, परंतु त्यांची राजकारणाची प्रगल्भ जाण, संघर्षाची जिद्द आणि विचारांप्रती असणारं उत्तरदायित्व वाखाणण्याजोगं आहे. या तरुणी सर्व जात-वर्ग आणि प्रांतांतून आलेल्या आहेत. हे सर्व स्त्रीप्रश्न सोडविण्यासाठी उमेद वाढवणारं आहे.

या अंकापासून 'हॅश टॅग लैंगिकता' आणि 'मिळून साऱ्याजणीचं सामाजिक पालकत्व' ही दोन महत्त्वाची सदरं सुरू करत आहोत. त्यातल्या '# हॅशटॅग लैंगिकता' या सदराचे संपादक आहेत प्रा. जमीर कांबळे. जमीर कांबळे आता 'साऱ्याजणी'चे सन्माननीय सल्लागार आहेत. ते स्वतः गे आहेत. लेखक, नाटककार असणारे आपले हे सल्लागार एलजीबीटीआयक्यू चळवळीत सक्रीय आहेत. आपल्या मासिकावरची टॅगलाईन त्यांच्या चिकित्सक संवेदनशील मनाला खटकली. ती, तो, ते या प्राधान्यक्रमाबरोबरच त्यांनी टॅगलाईनमधल्या 'पलीकडील' या शब्दाला आक्षेप नोंदवला. आजवर आपण माणसांकडे स्त्री आणि पुरुष या दोनच भिंगातून पाहत आलो आहोत. ही चूक सुधारत आपण आपली टॅगलाईन तिसाव्या वर्षी बदलली. आता त्या बदलातली त्रुटी लक्षात आणून देण्याचं काम आपल्या या मित्रानं केलं आहे. तसंच विद्या बाळ अध्यासन प्रकल्पांतर्गत 'मिळून साऱ्याजणी' मासिकाच्या सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन योगदानाचा सविस्तर अभ्यास करताना 'मासिक नव्हे चळवळ!' असं अभ्यासातून अधोरेखित झालं. म्हणून आता 'साऱ्याजणी'ची नवीन टॅगलाईन आहे-

'ती', 'ते' आणि 'तो' यांचा स्वत:शी आणि परस्परांशी नव्यानं संवाद होण्यासाठी... मासिक नव्हे चळवळ!

कशी वाटते नवी टॅगलाईन? जरूर कळवा. शिकणं ही जीवनाच्या अंतापर्यंत चालू असणारी सततची प्रक्रिया आहे, हेच खरं... नाही का?

स्नेहांकित,

गीताली

१८/०८/२०२१

# (अमेरिकेच्या) तळ्यात, (मेक्सिकोच्या) मळ्यात

भाग्यश्री बारलिंगे

**मेक्सिकोत फक्त करिनाच भेटली नाही, तर तिच्या आसपासचा भवतालही लेखिकेला भेटला. आसपास सुरू असलेल्या उघड आणि दडून बसलेले अराजकाचे मुद्देही समोर येत गेले. या मुद्द्यांभोवती फिरणारं आणि अडकवून टाकणारं जगण्याच्या अनिश्चितीतले एक चक्र या लेखात.**

आमच्या गावातील (फिनीक्स) एशियन मार्केटमध्ये अचानक एकदा कच्ची चिंच मिळाली. ती मोठ्या कौतुकानं मी घरी आणली. माझ्या मुलांनी 'looks weird' म्हणून दुर्लक्ष केलं. पण घर साफ करायला आलेली मेक्सिकन बाई– करिना मात्र तोंडाला सुटलेलं पाणी सभ्यपणे गिळत लगेच विचारायला आली, 'tamarindo!! where did you get these? May I have one ?' आणि मी 'हो' म्हणायच्या आत तिनं चिंचेचं एक बोटूक तोंडात घातलं देखील! तिच्या चेहऱ्यावर अवर्णनीय असा आनंद होता. 'You made me young again, Mrs. Barlingay', ती म्हणाली. त्या चिंचेनं आमच्या दोघींच्या मनातली बालपणाची दालनं उघडली गेली आणि आमच्या व्यावहारिक नात्याला खेळकरपणा आला. तिला चिंच माहिती आहे, ह्याचंच मला आश्चर्य वाटलं. चिंचा खाताखाता करिना मेक्सिकोत पोचली... थेट तिच्या जन्मगावी!

'माझ्या गावात म्हणजे कोपालेसला खूप चिंचेची झाडं होती.' मनात म्हटलं 'म्हणजे ही मेक्सिकोतल्या खोपोलीची'. करिनाचं गाव आहे लॉस कोपालेस, सिनालोआ या राज्यातील एल रोसारियो या जिल्ह्यात. हे छोटंसं मेक्सिकन खेडं हिरवंगार होतं आणि अजूनही आहे. गावातली माणसं सामान्यतः काबाडकष्ट करणारे शेतकरी. सगळेच गरीब ! करिनाची अनेक चांगल्या–वाईट घटनांनी भरलेली कर्मकहाणी ऐकताना लक्षात आलं की, करिनानं मोठं होत असताना त्या जागी विषमता अनुभवली नाही आणि शारीरिक कष्टाची तिला कधी लाज वाटली नाही. तिच्या जन्मभूमीनं दिलेली ही मानसिक स्थैर्याची शिदोरी पुढे तिला कामी आली. कुठल्या कोण आम्ही दोघी. 'यथा काष्ठं च काष्ठं' असं म्हणण्याऐवजी 'यथा कष्टम् च कष्टम्' या (नवीन) न्यायानं भेटलो. आम्ही दोघीही अमेरिकेत स्थिरावण्यासाठी कष्ट करीत होतो. तिच्या विषयी वाटणारी जवळीक दाट झाली.

Octavio Paz - The Labyrinth of Solitude- पान ३० :

Women are inferior beings because, in submitting, they open -themselves up. Their inferiority is constitutional and resides in their sex, their submissiveness, which is a wound that never heals.

ऑक्टेव्हियो पाझ त्याच्या 'The Labyrinth of Solitude' या पुस्तकात मेक्सिकन पुरुषांच्या वरवर बोलक्या पण खरं म्हणजे अतिशय अंतर्मुख अशा मानसिकतेविषयी लिहिताना (मेक्सिकन?) स्त्रियांविषयी लिहितो–

'स्त्रिया ह्या जात्याच कनिष्ठ. कारण मन मोकळं करणं हा त्यांच्या सौजन्याचा भाग असतो. ही हीनता, हलकेपणा त्यांच्या पिंडातच आहे. सालसपणा, आज्ञाधारकपणा स्त्रीत्वाचा अविभाज्य भाग आहेत. या वृत्ती एक न भरणारी जखम निर्माण करतात.'

स्त्रियांविषयीच हे विधान वाचायला जड गेलं. हे निरीक्षण एक मेक्सिकन स्त्री म्हणून करिनाला लागू पडत नव्हतं आणि जर सगळ्या स्त्रियांविषयी हे विधान केलं असेल तर एवढ्या छोट्या चौकटीत सर्व स्त्रियांची मानसिकता बसवता येईल का? करिना भरभरून बोलत होती. आम्ही केवळ दोन स्त्रिया एकमेकींची सुख–दुःख ऐकून घेत होतो आणि त्या प्रक्रियेत एकमेकींना समृद्ध, शहाणं करत होतो.

करिनाजवळ झाडावर चढून चिंचा आणि पेवंदी बोरांसारखी दिसणारी गोल्डन प्लम्स आणि या झाडाची आंबटगोड पाने खाल्ल्याच्या गमतीदार, खट्याळ आठवणी आहेत. तसेच तिला तिचं 'अडोबी' पद्धतीने बांधलेलं घर आठवतं. घरासमोर दोन गाढवं बांधलेली असायची. या गाढवांवर

बसून ती गावातली कामं करायला जात असे. (आता तिच्याकडे जुन्या का होईना पण दोन मोटारगाड्या आहेत.) लहानपणापासून ती व तिची चार भावंडं त्यांच्या आईवडलांना शेतीच्या कामात मदत करत असत. त्यांच्याजवळ फक्त एक एकराचं वडिलोपार्जित शेत होतं. त्यातून होणाऱ्या उत्पन्नावर आणि इतर शेतकऱ्यांकडे मदत केल्यावर मिळालेल्या पैशांवर त्यांचा उदरनिर्वाह चाले. त्याकाळी (सत्तरच्या दशकात) गावात एकच किराण्याचं दुकान होतं. त्यात साखर, फुलं इत्यादी गोष्टी मिळत. संडास घराबाहेर खड्डा खणून आणि आडोसा निर्माण करून तयार केलेले असत. बालुआर्ते ही नदी घरापासून अगदी जवळ म्हणजे अंदाजे तीनशे फुटांवर होती. त्यात सर्व मुलं–मुली डुंबत असत. त्याच नदीवर कपडे धुवत असत, चांगलासा दगड पाहून. त्याच नदीचं पाणी पिण्यासाठी वापरत असत. तिच्या लहानपणी कोपालेसला वीज आणि वाहतं पाणी या दोन्ही गोष्टी नव्हत्या. नदीवरून बादलीने पाणी आणायचं आणि तीच बादली डोक्यावर उपडी करून अंघोळ करायची. एकूण काय भारतातलंच चित्र!

घराभोवती केळी, पेरू, पपई, आंबे, चिंच, लाल आणि पिवळे प्लम्स, गुयाबानो (सीताफळासारखी; पण काटेरी फळं), आरायानेस (arrayanes, छोटे पेरू), नानचेची (nance/hogberry–पिवळं, गोड चेरीसारखं फळ) झाडं असायची. शेतात मका, बीन्स, भुईमूग, टरबूज यांची पिकं यायची. करिनाचं बालपण असं समृद्ध निसर्गासमवेत गेलं. त्यामुळे साहजिकच तिला सकस अन्न म्हणजे काय याची पोटातून जाण आहे. मक्याच्या पिठापासून तयार केलेली टॉर्टिया (tortilla –स्पॅनिश भाषेत lla याचा उच्चार ‘ला’ असा न करता ‘या’ असा करतात) म्हणजे मेक्सिकन पोळी चुलीवरून ताटात घेऊन घरच्या लोण्याबरोबर तिनं खाल्ली आहे. फास्ट फूड अमेरिकेत आल्यावरच पहिल्यांदा तिनं खाल्लं. पण अशा आततायी अन्नाची पुरस्कर्ती ती कधीही झाली नाही.

गावातली संपूर्ण जनता कॅथलिक होती. दर रविवारी सगळेजण चर्चमध्ये जात. कॅथलिसिझम शिवाय इतर कुठला धर्म असतो हे करिनाला अमेरिकेत येईपर्यंत माहिती नव्हतं.

कॅथलिसिझम हा जेत्यांचा–स्पॅनिश लोकांचा धर्म. १५२१मध्ये स्पेनने मेक्सिकोतील माया व ॲझटेक या संस्कृतीच्या लोकांवर स्वारी करून पूर्ण कब्जा घेतला. तो तीनशे वर्ष टिकला. १८२१मध्ये स्वातंत्र्ययुद्ध होऊन मेक्सिको देश उत्तर अमेरिकेतील एक स्वतंत्र रिपब्लिक म्हणून गणला जाऊ लागला. महत्त्वाचे म्हणजे सर्व देश कॅथलिक झाला. ऑक्टेव्हियो पाझ हा मेक्सिकोतील नोबेल पारितोषिक विजेता लेखक! हा भारतात राजदूत म्हणून अनेक वर्ष राहून गेला. भारताविषयी त्याने अतिशय जिव्हाळ्याने लिहिले आहे. 'In Light of India' या पुस्तकात. तो लिहितो की, मी मेक्सिकन आहे म्हणूनच भारतीयांना जाणू शकतो. भारत आणि मेक्सिको या दोन देशांवर सतत होणारी आक्रमणे, दीर्घकाळ परकीय सत्ता, गरिबी इत्यादी बऱ्याच समान बाबी आहेत; पण दोन्ही देशांचा गाभा अगदी वेगळा आहे. भारतावर ज्या स्वाऱ्या होत गेल्या त्यातून आलेले नवीन धर्म, कला, भाषा हे सर्व भारतात सामावत गेले; पण मूळ धर्म किंवा सामाजिक रचना मिटली नाही. भारत नेहमीच इतर देशांशी बांधलेला होता, पुढारलेला होता. पण मेक्सिकोला जाग यायला अनेक शतके लागली.

लॉस कोपालेस या गावात करिनाच्या लहानपणी फक्त एकच शाळा होती– तीही केवळ आठवीपर्यंत. बहुतांश गावकरी अनपढ, अशिक्षित होते. सहावी पास झाल्यानंतर करिनाने एक कोर्स केला आणि गावात ती घरोघरी जाऊन तिच्यापेक्षा मोठ्या व्यक्तींना शिकवू लागली. कल्पना करा, एक छोटीशी मुलगी हातात पाटी–पेन्सिल घेऊन सेवाभावी वृत्तीने कुठलाही आविर्भाव न आणता, कुठलीही पब्लिसिटी न करता अतिशय आवश्यक असं समाजकार्य करते आहे! माझा करिनाविषयीचा आदर या आणि अशा अनेक घटनांमुळे वाढतच गेला.

करिना चांगली विद्यार्थिनी होती. तिला पुढचा अभ्यासक्रम करण्यासाठी दुसऱ्या गावात जावे लागले. एल रोसारिओ या जिल्ह्याच्या ठिकाणी माध्यमिक (secundaria) आणि उच्च माध्यमिकसाठी (preparatoria) जावे लागे. या शाळांची फी भरणे तिच्या वडलांना शक्य नव्हते. म्हणून तिथे पण ती तिच्या वर्गातील मुलामुलींना आणि शिक्षकांना, शनिवार–रविवारी घरी जाऊन बनवलेले खाण्याचे पदार्थ–तमालेस (Tamales), कुकीज् (cookies), टर्नओव्हर्स (turnovers) विकत असे. जेव्हा कॉलेजात जाण्याची वेळ आली, तेव्हा तिला फी भरणं अशक्य झालं. त्यावेळी तिनं मेक्सिकन सरकार चालवत असलेल्या CONFE या संस्थेकडे शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला. ही शिष्यवृत्ती म्हणजे माझ्यादृष्टीने केवळ वनवास, एक प्रदीर्घ शिक्षा !

CONFE - Consejo Nacional de Fomento Educativo - National Council for Education Development ही मेक्सिकन फेडरल गव्हर्नमेन्टने स्थापन केलेली संस्था आहे. या संस्थेचा मुख्य उद्देश दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या, वंचित, विखुरलेल्या लोकांपर्यंत शिक्षण पोचवणे. सोळा वर्षाच्या करिनाने ही शिक्षणाची मशाल हातात घेण्याचा निर्धार केला आणि हा कठीण वसा तिने एक वर्ष तंतोतंत निभावला. आता लोक वाहनं वापरतात; पण तिच्यावेळी

अशी काहीच सोय नव्हती. ती तिच्या गावातून– लॉस कोपालेसहुन एकटी पहाटे निघत असे. अनेक किलोमीटर अंतर गावातून चालल्यानंतर बालुआर्ते नदी होडीनं ओलांडावी लागे. त्यानंतर वाळूतून काही अंतर चालल्यावर एल रेकोदो (el recodo) या गावी पायी ती पोचत असे. तिथे डोंगरात छोट्या छोट्या वस्त्यांमध्ये लोक राहात असत. CONFEच्या नियमांप्रमाणे विद्यार्थ्यांच्या मातृभाषेतच त्याला शिकवायला हवं आणि ते पण स्थानिक संस्कृती, रीतिरिवाजांना अनुसरून! करिनाने सर्वात पहिल्यांदा या लोकांना पाहिलं तर त्यांची आर्थिक आणि वैचारिक गरिबी पाहून तिला धक्का बसला. ती म्हणाली की, या लोकांना ना संस्कृती होती ना रीतिरिवाज! तिला आठवतं की, प्रचंड अंतर चालून तिच्या 'कामाच्या जागी' पोचल्यावर काय दिसावं तर कित्येक दिवसात आंघोळ न केलेली, फाटके कपडे घातलेली मुलं–माणसं अन् वरती आग ओकणारा सूर्य! करिनाने त्या वस्तीमध्ये एक बऱ्यापैकी झोपडी शोधून तिथे काम चलाऊ शाळा तयार केली. सगळ्यात पहिले स्वच्छतेचे धडे दिले, त्यानंतर प्राथमिक शिक्षण!

एक मजेदार गोष्ट करिनाने सांगितली. तिच्या डोंगरावरच्या शाळेत एक तीन वर्षांचा मुलगा येत असे. त्याचं नाव चपितो (Chepito) होतं. त्याला मायेस्त्रा (स्पॅनिशमध्ये maestra– शिक्षिका) म्हणता येत नसे; त्याऐवजी तो बोबडं 'मालेता' असं म्हणत असे. तो काही वेळ वर्गात बसे नंतर कुठेतरी दिसेनासा होई. एक दिवस करिना इतर मुलांना घेऊन त्याच्या मागे गेली. तर असं दिसलं की, तो नदीजवळ असलेल्या एका छोट्या गुहेत जातोय. करिना पाच फूट दोन इंच उंच आहे. पण तिला रांगत जावं लागलं. गुहेत एका जागी पाणी जमलं होतं. तिथे छोटी झाडं वाढत होती. ही झाडं शूरवीर चपितोनं लावली होती. करिना आणि त्याचे वर्गमित्र त्याच्या मागे आहेत, हे त्याच्या लक्षात आलं; पण तो गडबडला नाही. उलट तो अभिमानानं सांगू लागला की, ही मारीउआनाची झाडं आहेत. ती विकून तो खूप पैसे मिळवणार आहे. (Marijuana– चरस/भांग). करिनाला हसावं की रडावं हे कळेना! वर्गातल्या बाकीच्या मुलांना त्याचे काही वाटले नाही. त्या भागात इतकं दारिद्र्य होतं की जवळपास प्रत्येक घरात मारीउआना विकण्याचा धंदा होता. त्यात कोणाला काही वावगं वाटत नसे. करिनाने चपितोच्या आईवडलांशी बोलून त्यांना लक्षात आणून दिलं की, मारीउआना हा एक नशा आणणारा, अवैध पदार्थ आहे. खास करून लहान मुलांसाठी तो हानिकारक ठरू शकतो. करिनाला वाटलं नाही तिच्या बोलण्याचा त्यांच्यावर काही प्रभाव पडला असेल म्हणून! पुढे अनेक वर्षांनी चपितो काऊबॉय हॅट घालून घोड्यावर बसून ऐटीत जाताना तिला दिसला. त्यानंच हाक मारली, 'मालेता' तेव्हा करिनाने लगेच त्याला ओळखलं. तिला आनंद झाला की, तो मारीउआनाचा धंदा करीत नव्हता, तर गायी बैलांचं खिल्लार जमवून विकत होता.

अशा जनतेबरोबर करिना आठवड्यातील पाच दिवस तरी राहत असे. त्यांच्या बरोबर टॉर्टिया (करिनाच्या उच्चाराप्रमाणे– तोरतीय्या) आणि मिरच्या किंवा शिजवलेले भोपळे खात असे. त्या लोकांना इतर मेक्सिकन लोकांसारखे मसाले माहिती नव्हते. शेवटच्या दिवशी त्यांच्या लाडक्या 'मायेस्त्रा'ला निरोप देण्यासाठी मुलांनी हरणाची शिकार केली, ते मीठ घालून पाण्यात शिजवलं आणि मोठ्या अभिमानानं तिच्यासमोर ठेवलं. करिना सांगते की, इतक्या वाईट चवीचा पदार्थ तिनं तोपर्यंत खाल्लेला नव्हता. पण तिनं त्या मुलांची पाठ थोपटली आणि त्यांच्याबरोबर ते अन्न आनंदानं खाल्लं.

तिच्या परिश्रमाचे फळ म्हणून तिला माझट्लानला (Maztlan– समुद्रकिनाऱ्यावरचं एक मोठ्ठं शहर), कॉलेजमध्ये फी न देता ॲडमिशन मिळाली. तिथेही ती काम करून अभ्यास करीत होती. तिनं तिथं हॉटेल मॅनेजमेंटचा कोर्स पूर्ण केला. ती इंग्लिश शिकली. आणि तिला एका हॉटेल मध्ये चांगली नोकरी सुद्धा मिळाली. पण, ती म्हणाली, 'दुर्दैवानं ती तिच्या होणाऱ्या नवऱ्याला, रिकार्डोला भेटली. त्यांनतर तिचं स्वतःच्या आयुष्यावर नियंत्रण राहिले नाही. रिकार्डो गोरागोमटा होता, मेस्टिझो (mestizo) पेक्षा तो क्रिओयो (criollo) दिसत असे.
मेस्टिझो म्हणजे स्पॅनिश आणि स्थानिक मेक्सिकन यांच्या संकरातून जन्मलेली प्रजा. तर क्रिओयो म्हणजे पूर्णपणे स्पॅनिश किंवा युरोपिअन. करिना गोरटेली आहे; पण मेस्टिझो दिसते. तिचा नवरा, मुलं, सासरचे लोक युरोपिअन दिसतात. रिकार्डो फुलपाखरी वृत्तीचा होता. त्यामुळे करिनाच्या सांसारिक जीवनात कधी स्थैर्य राहिले नाही. पहिलं मूल झाल्यावर रिकार्डोनं अमेरिकेत कन्स्ट्रक्शन वर्कमध्ये नोकरी मिळवली. तोपर्यंत मेक्सिकोमध्ये बेकायदेशीर ड्रग्ज आणि हिंसाचार वाढायला लागला होता. तेव्हा मुलाच्या सुरक्षिततेसाठी करिनाने पण अमेरिकेत जाण्याचे ठरवले. पण तिला व्हिसा मिळेना. तेव्हा रिकार्डोनं एका ओळखीच्या अमेरिकन नागरिकाला करिना आणि त्यांचा तीन वर्षाचा मुलगा कार्लोस यांना यू .एस. आणि मेक्सिको बॉर्डर पार करून आणायला सांगितले – अर्थात पैसे देऊन!

यू .एस. आणि मेक्सिको बॉर्डर हा फार ज्वलंत विषय आहे. पण तो कितीही ज्वलंत असला तरी माझ्या अमेरिकन–मराठी मध्यमवर्गीय आयुष्याशी त्याचा काहीही संबंध नाही, असे मला करिनाशी बोलेपर्यंत वाटत

होतं! जेव्हा ही महाप्रसिद्ध अशी बॉर्डर ओलांडलेली व्यक्ती माझ्या घरात काम करते आहे, हे कळल्यावर मला त्याविषयी माहिती काढल्याशिवाय राहवेना. शेवटी, 'युद्धस्य कथा रम्या:!'

मेक्सिको हा उत्तर अमेरिकेतील देश अमेरिकेच्या दक्षिण सीमारेषेला जोडलेला. अमेरिका–मेक्सिको बॉर्डर ही कॅलिफोर्निया, ॲरिझोना, न्यू मेक्सिको, टेक्सस या चार राज्यांची दक्षिण सीमारेषा आहे. समुद्रकाठी मजेत सुट्ट्या घालवण्यासाठी अमेरिकन्स या देशात सतत जातात. जरी या देशाचं GDP (Gross domestic product) जगात पंधराव्या क्रमांकावर आहे, तरीही हा देश गरीब व हिंसाचाराने व ड्रग ट्रॅफिकिंगने पिडलेला असा समजला जातो.

इतिहास असं सांगतो की, १८४८ मध्ये अमेरिका–मेक्सिको युद्धानंतर मेक्सिकोच्या सोनोरा राज्यातील गिला नदीच्या वरचा भाग ग्वाडालुपे– हिडाल्गो (तह) कराराप्रमाणे अमेरिकेने काबीज केला. या भागाचं पुढे यु.एस.ए.तील ॲरिझोना राज्य झालं. विकिपीडियावर याबद्दल विस्तृत माहिती आहे. इथे अजूनही फक्त स्पॅनिश बोलणारे लोक बऱ्याच प्रमाणात आहेत. दीड शतकांपूर्वी राजकीय सत्ता काही दिवसांत बदलली असेल; पण भाषेत होणारा बदल मंद गतीनं होतो आहे.

तर करिना तिच्या लहानग्याला घेऊन बसने नोगालीस नावाच्या गावाला आली. तिथे हा गोरा अमेरिकन तिला भेटला. तो सज्जन होता. त्याने कार्लोसला कडेवर घेतले व इमिग्रेशनच्या रांगेत तो उभा राहिला. करिना त्याच्या मागे होती. त्याचा interview पहिल्यांदा घेतला गेला. तो करिनाला ऐकू आला नाही. त्याने इमिग्रेशन ऑफिसरला करिना त्याची गर्लफ्रेंड असल्याचे सांगितले. पण मुलगा नक्की कोणाचा हे सांगताना तो चाचरला. तेव्हा त्याच इमिग्रेशन ऑफिसरने करिनाला बोलावले. तिने दिलेली माहिती अर्थातच वेगळी होती. त्यामुळे करिनाला व्हिसा मिळाला नाही. कार्लोसला घेऊन ती परत गेली. काही महिन्यांनी एक मेक्सिकन बाई तिला भेटली. ती म्हणाली, तू गेली नाहीस अमेरिकेत तर हरकत नाही पण तुझा मुलगा जायला हवा. त्याच्या भविष्याचा विचार कर. मी त्याला घेऊन जाऊ शकते. करिनाने तिला पैसे दिले. करिनाला तो क्षण अजूनही slow motionमध्ये आठवतो. जेव्हा ती परकी बाई तिच्या जिवाच्या तुकड्याला घेऊन जात होती. फक्त काही फुटांचं अंतर, पण करिनाला असं वाटलं की, ती कार्लोसला दुसऱ्या विश्वात घेऊन चालली आहे. तिच्या जिवाची जी घालमेल झाली ती शब्दातीत आहे. तो प्रसंग जणू आताच डोळ्यासमोर घडतोय अशा ट्रान्समध्ये जाऊन करिना बोलत होती. त्या बाईनं इमिग्रेशन ऑफिसरला काय सांगितलं हे करिनाला माहिती नाही. पण तिनं सहज बॉर्डर ओलांडली. करिनाला निरोपादाखल हात दाखवून दिसेनाशी झाली. आणि रिकार्डोचा फोन येइपर्यंत, आपल्या मुलाचे काय झाले असेल या काळजीने, करिनाला पाणी पिण्याची सुद्धा शुद्ध नव्हती. काही आठवड्यांनी करिनाने परत एकदा यु.एस.मध्ये जाण्याचा वैधपणे प्रयत्न केला आणि पण याही वेळी तो असफल ठरला. तिला व्हिसा मिळाला नाही. शेवटी तिनं काही लोकांबरोबर मध्यरात्री अवैधपणे बॉर्डर ओलांडली. बॉर्डर म्हणजे काटेरी तारेचं कुंपण होतं. करिना तिच्या मुलाला आणि नवऱ्याला भेटली. तिनं कंबर कसून वृद्धाश्रमात कामं केली, लोकांची घर साफ केली... अजूनही करते. त्यानंतर तिनं अनेक वर्षं तिच्या आईवडलांना, भावा–बहिणींना पाहिलेदेखील नाही.

हे घडलं नव्वदच्या दशकाच्या शेवटी. आता मात्र तिला लोक बॉर्डर अवैधपणे ओलांडून यायला नको आहेत. ती म्हणते की आता बॉर्डर बदलली आहे. नुसतं तारांचं कुंपण राहिलेलं नाही तर भिंत बांधलीये, असं तिनं ऐकलं. एवढंच नव्हे तर बॉर्डरवर नुसतं अराजक माजलंय. पाच हजारापेक्षा जास्त लोकांना तिथे अडकवून ठेवलंय. हे लोक केवळ मेक्सिकोचे नाही तर निकारागुआ, होंडुरास इत्यादि सेंट्रल अमेरिकन देशांमधूनसुद्धा आलेले असतात. बॉर्डरवर घडणारे अत्याचार, भ्रष्टाचार, लाचलुचपत, बलात्कार यांना अंत नाही.

जन्मभर केलेल्या निरलस कष्टांमुळे करिनाच्या मनात तिची स्वतःची अशी एक उजळलेली प्रतिमा आहे, जी तिला आत्मविश्वास देते. करिनावर आतापयर्यंत अनेक कठीण प्रसंग आलेत. पण तिनं नेहमीच त्यांना धैर्यानं तोंड दिलं. ती म्हणते की, अशावेळी देव तिची परीक्षा घेत असतो. करिना तिच्या सचोटीमुळे, कष्टाळूवृत्तीमुळे आणि दयाळूपणामुळे जिथे जाते तिथे लोकांची मनं जिंकते. तिच्या मेक्सिकन समाजात तिला मान आहे. ती त्यांना जमवून जिझसच्या त्यागाविषयी, धर्माच्या आपल्याकडून काय अपेक्षा आहेत या विषयी सांगत असते. ती म्हणते की, आतापर्यंत माझ्याशी अनेक लोक वाईट वागले आहेत. पण मला कुणाविषयी कडवटपणा नाही. देव त्यांचा न्याय–निवाडा करेल. ती जेव्हा एकटीच अनेक मैल चालून डोंगराळ भागात शिकवायला जात असे, तेव्हा तिला एकटं कधीच वाटलं नाही. कारण, देव नेहमीच तिच्याबरोबर असतो.

ती आता ख्रिश्चन झाली आहे. 'कॅथलिक म्हणजे ख्रिश्चन नाही का?' तर ती म्हणाली, 'नाही, ते मूर्ती पूजा करतात.' 'कुठल्या मूर्ती?' 'व्हर्जिन मेरीच्या, बरेच संत आणि अर्थात जीझस यांच्या मूर्ती.'

मला मूलभूत प्रश्न असा पडला

(पान ३१ वर)

# स्वतंत्र, लोकशाही देशातली एका कार्यकर्त्याची शहादत!

सुनीती सु. र.

**फादर स्टॅन स्वामी यांची जन्मभूमी तमिळनाडू आणि कर्मभूमी झारखंड. आयुष्यभर ते झारखंडच्या दलित, आदिवासी यांच्या अन्यायाविरोधात आयुष्यभर झगडत राहिले. संवैधानिक अधिकारावर त्यांचा दृढ विश्वास होता. अशा या शांतताप्रिय, संयमी, मानवाधिकाराच्या रक्षणकर्त्याचा कारावासात यातनामय मृत्यू झाला. त्यांच्या कार्यकर्तृत्वाला साऱ्याजणीचा सलाम!**

रांची शहराच्या परिघावर 'बगैचा' हा परिसर आहे. रम्य, शांत व निवांत. टिपिकल ख्रिश्चन मिशनरी पद्धतीच्या इमारती. साध्या, मोकळ्याढाकळ्या, यूजर फ्रेंडली. मधल्या अंगणात डावीकडे बिरसा मुंडांचा काळ्या रंगातला सुरेख, ताशीव, कातीव पुतळा आणि उजव्या बाजूला एक स्तंभ. त्यावर ब्रिटिश काळापासून आजवर– होय, आजवर!– सरकारी दमनाला बळी पडलेल्या लढवय्यांची नावं कोरलेली.

२०१८च्या नोव्हेंबरमध्ये आमच्या 'संविधान सन्मान यात्रे'च्या तिसऱ्या चरणाची सुरुवात झारखंडपासून, रांचीपासून झाली; तेव्हा फादर स्टॅन स्वामींच्या या कार्यक्षेत्राशी आणि खुद्द त्यांच्याशीही परिचय झाला. उंच, शिडशिडीत अंगकाठी, काळा रंग, चेहऱ्यावर केवळ शांती. सर्वच अभिव्यक्तीत. मी महाराष्ट्रातून आलेय, तेही पुण्यातून, कळल्यावर म्हणाले, ''भीमा कोरेगाव केसमध्ये माझं नाव आहे. केव्हाही अटक होऊ शकते.''

अंगावर शहारा आला!

त्यानंतरचे दोन दिवस, जातायेता सहज झालेल्या भेटी. त्यांचं तिथल्या सर्वांशी (बहुतेक सर्व आदिवासी) साधं, स्नेहाचं वागणं, बोलणं. सकाळच्या कोवळ्या उन्हातल्या प्रार्थनेच्या वेळी झारखंडच्या संघर्षांचा इतिहास सांगणं, परिसर दाखवणं. ते जाहीर सभेत त्यांचं शांत, संयमित स्वरात साधंसं पण ठाम बोलणं. असे फादर लक्षात राहिले. काय बोलत होते ते? – भुकेबद्दल. भूकबळींबद्दल. विकासाबद्दल आणि विकासचक्रात भरडल्या जाणाऱ्या आदिवासींबद्दल. यातलं काय देशद्रोहाचं होतं?

अखेर त्यांना अटक झालीच. पार्किन्सनसह अनेक विकार असलेल्या चौऱ्याऐंशी वर्षाच्या म्हाताऱ्या कार्यकर्त्याला जेलमध्ये पाणी पिण्यासाठी आवश्यक असलेला सिपर मिळवण्यासाठीही कोर्टापर्यंत जावं लागलं. कोरोनाने त्यांना गाठलं... म्हणतात की, बेल इज रूल अँड जेल इज एक्सेप्शन; पण तसं काही झालं नाही. बेल मिळालाच नाही आणि अखेर ते गेले. ५ जुलै २०२१ ला, तुरुंगाच्या गजाआड असताना.


मूळचे तमिळनाडूचे असलेल्या फादर स्टॅन स्वामी यांची कर्मभूमी झारखंड ही राहिली. ५० वर्षे ते झारखंडच्या आदिवासी क्षेत्रात कार्यरत होते. झारखंडमधील दलित, आदिवासींचे ते मित्र, हितैषी बनले. राज्य आणि शासनयंत्रणेकडून त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाविरोधात आपल्या अखेरच्या श्वासापर्यंत संघर्ष करत राहिले. शांतीपूर्ण मार्ग आणि संवैधानिक अधिकारांवर दृढ विश्वास बाळगत, जबरदस्तीच्या भूसंपादनाविरोधात, संसाधनांच्या लुटीविरोधात लढत राहिले. विनाकारण, विनाचौकशी तुरुंगात डांबल्या गेलेल्या निरपराध आदिवासींच्या सुटकेसाठी प्रयत्न करत राहिले. पेसा कायद्याअंतर्गत ग्रामसभांचे अधिकार मिळवण्यासाठी झटत राहिले. पत्थलगडी स्वशासन आंदोलनामध्ये त्यांची महत्त्वाची भूमिका राहिली. विकासाच्या नावावर नैसर्गिक संसाधनांची आणि त्यावर जगणाऱ्या आदिवासींची लूट करणाऱ्या कंपन्यांच्या विरोधात, आदिवासींच्या जगण्याच्या हक्कांसाठी ते आवाज उठवत होते. झारखंडमधील विविध तुरुंगांत खितपत पडलेल्या ४००० हून अधिक आदिवासी कैद्यांच्या सुटकेची मागणी करणारी जनहित याचिका त्यांनी दाखल केली होती.

फादर स्टॅन स्वामी यांची संपूर्ण लढाईच कायद्याच्या संदर्भात होती. कायद्यांद्वारे न्याय मिळाला पाहिजे या आग्रहासाठी होती. अन्याय्य कायद्यांच्या विरोधात होती. संविधानाच्या 6th Scheduleच्या (आदिवासींना आपल्या अधिवासात असलेले विशेषाधिकार) अंमलबजावणीसाठी होती. कायद्याच्या कलम २४४ नुसार Tribal Advisory Councilमध्ये आदिवासी सदस्यांच्या

अधिकारांविषयी होती. वनअधिकार कायदा २००६ नुसार आदिवासींना वनहक्क मिळवून देण्यासाठी होती. फादर स्टॅन स्वामींची लढाई देशात कायद्याचे राज्य असावे यासाठी होती. संविधानवादासाठी होती. ती ते फार हिमतीने लढले. त्याच्या बदल्यात त्यांना काय मिळाले, तर देशद्रोहाचा आरोप, तुरुंगवास आणि तुरुंगातला मृत्यू!

२०१० साली त्यांनी एक पुस्तक लिहिले– 'बंद कैदियों का सच!' ३००० आदिवासी बिनाचौकशी अनेक वर्षे जेलबंद आहेत, त्याबाबतची वस्तुस्थिती त्यात मांडली होती. तुरुंगांतील यातल्या ९७% कैद्यांची आमदनी ५००० रुपयांहूनही कमी होती. ते वकीलही नेमू शकत नाहीत. त्यातील ९८% लोकांना खोट्या गुन्ह्यांत फसवलेले असते. अशा लोकांच्या सुटकेसाठी फादर स्टॅन स्वामींनी समिती बनवली होती. त्यांना जामिनावर मुक्त करा, वेगाने सुनावणी करा, सुनावणी पूर्ण व्हायला विलंब का लागतो यावर न्यायिक आयोगाने तपास करावा, ही त्यांची मागणी होती. त्यांनाच 'देशाविरोधात युद्ध पुकारणारे दहशतवादी' ठरवण्यात आलं. खरं तर यापैकी कुठले काम 'भारताच्या संप्रभुतेला धोका' होते? पण 'भारताविरोधात युद्ध छेडण्याच्या योजनेत सामील असण्याच्या' गुन्ह्याखाली भीमा–कोरेगाव खटला उभा करण्यात आला. सुधा भारद्वाज यांच्यासारख्या आदिवासींच्या न्याय्य हक्कांसाठी कार्य करणाऱ्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या मानवाधिकार कार्यकर्त्यांसह एकूण १६ कार्यकर्त्यांना त्याखाली तुरुंगात डांबले गेले. त्यांच्यावर Unlawful Activities Prevention Act (UAPA) खाली आरोप ठेवण्यात आले. फादर स्टॅन स्वामी हे त्या १६ मधील एक.

राज्यसत्तेच्या विरोधात निर्भयपणे बोलणारे, आवाज उठवणारे संख्येने थोडेच असतात. त्यांचा आवाज अशा रीतीने, त्यांना राज्यसत्तेचा, देशाचा शत्रू घोषित करून बंद करणं सोपं ठरतं.




UAPA हे सध्याच्या सत्ताधाऱ्यांचे सोयीचे हत्यार झाले आहे. दहशतवादाच्या, देशद्रोहाच्या आरोपाखाली कार्यकर्त्यांना तुरुंगात सडवत ठेवण्याचं. चार–चार वर्षे तुरुंगात ठेवूनही न्यायालयीन प्रक्रिया पुढे जात नाही. सरकार आणि पोलीस त्यांच्या विरोधात पुरावे दाखल करू शकत नाहीत. मात्र, माणूस गजाआड राहतो. संपत जातो. शिवाय, हे सारे कायद्याच्या चौकटीत! २३ वर्षे टाडा कायद्याखाली जेलमध्ये राहिलेला आणि सर्व उमेदीची वर्षे संपल्यावर निर्दोष मुक्तता झालेला निसार म्हणतो त्याप्रमाणे, जेलबाहेर येताना उरते ती 'जिंदा लाश'! याच UAPA खाली तब्बल दीड वर्षे तुरुंगात काढलेले, तुरुंगात असतानाच निवडणूक लढवून निवडून आलेले आणि त्यानंतर नुकतीच सुटका झालेले आसामच्या अखिल गोगोई यांचे उदाहरण ताजेच आहे.

मात्र, या सर्वांमुळे संविधान, मूलभूत अधिकार, कायदे, कायद्यांची नैतिकता, न्यायव्यवस्था, या लोकशाहीच्या महत्त्वाच्या स्तंभांच्या अस्तित्वावर आणि सार्थकतेवरच प्रश्नचिन्ह लागल्यासारखे झाले आहे. न्यायप्रक्रियेची विश्वासार्हता तिच्या नैतिकतेवर अवलंबून असते. मात्र, कायदा नेहमीच न्याय करतो असे नाही, अन्यायही करतो. जे फादर स्टॅन स्वामी आणि इतरांच्या बाबतीत झाले आहे.

खरं तर कायदाच असं सांगतो की, आरोप शाबीत होईपर्यंत आरोपीला निर्दोष मानलं पाहिजे. परंतु प्रत्यक्षात मात्र आरोपीला आधीच दोषी ठरवून टाकून, न्यायप्रक्रिया लांबवत, 'तारीख पे तारीख' पाडत त्याला तुरुंगवासाची शिक्षा दिली जाते. अनेकदा त्या गुन्ह्यासाठी असलेल्या शिक्षेहूनही अधिक काळ! खोट्या गुन्ह्यांत फसवले गेलेले कितीतरी लोक बिना सुनवाई, बिनाजामीन तुरुंगात खितपत पडलेले आहेत.

याच विरोधात फादर स्टॅन स्वामी लढत होते. फादर स्टॅन स्वामी यांच्या केसची त्यांच्या अटकेदरम्यानच्या ९ महिन्यात एकदाही सुनावणी झाली नाही. कोर्टात मुद्दे आले ते त्यांना सिपर अगर स्ट्रॉ द्यावा की देऊ नये; गंभीर आजारी असल्यास कुठल्या हॉस्पिटलमध्ये दाखल करावे, अशा मुद्द्यांवर! फादर स्टॅन स्वामी यांच्या मृत्यूच्या घटनेतून तरी या कायद्यांच्या आणि त्यांच्या गैरवापराच्या संदर्भात देशात चर्चा छेडली जावी.

फादर स्टॅन स्वामी यांचा मृत्यूने न्यायप्रक्रियेवर गंभीर सवाल उपस्थित केले आहेत. अन्यही निर्दोष लोकांच्या अटकेमधून हेच सवाल उपस्थित होत आहेत. खोट्या प्रकरणांमध्ये निरपराध लोकांना फसवणारे अधिकारी त्या माणसाचे आयुष्य उद्ध्वस्त करत असतात. मात्र, त्यांच्यावर क्वचितच कारवाई होते. कुणालाही खोट्या(ही) गुन्ह्यात अडकवणं हा पोलीस आणि न्यायव्यवस्थेचा भाग बनला आहे आणि त्यामुळे त्यांनी आपली विश्वासार्हता पूर्ण गमावली आहे आणि उरली आहे ती केवळ दहशत! लोकशाहीच्या स्वास्थ्यासाठी हे फार हानीकारक आहे.

फादर स्टॅन स्वामी यांच्या तुरुंगवासात झालेल्या मृत्यूच्या घटनेने देशातीलच नव्हे, तर जगभरातील लोकशाहीप्रेमी व मानवी हक्कांचे पुरस्कर्ते, हादरले. शोषित–पीडितांना न्याय मिळवून देणे हेच ज्यांच्या जीवनाचे उद्दिष्ट राहिले, त्या शांतताप्रिय, संयमी, अंगी संतत्व बाणवलेल्या अशा या मानवाधिकारांच्या रक्षणकर्त्याचा अशा रीतीने झालेला यातनामय मृत्यू ही इथल्या राज्यसत्तेद्वारे

(पान २७ वर)

# हॅशटॅग लैंगिकता

# लैंगिकता आणि भाषेचा व्यवहार

जमीर कांबळे

**'मराठीत समलैंगिकता नसते' अशी प्रतिक्रिया मिळते तेव्हाच लैंगिकतेच्या चळवळीचा आणि भाषेचा किती जवळून संबंध आहे, हे लक्षात येतं. लैंगिकतेच्या आसपास सुरू असणारा भाषिक संवाद किती तोकडा आहे याचा अनुभव गे असलेल्या जमीर कांबळे यांनी कैक वेळा घेतलाय. त्यातूनच त्यांचं पक्कं चिंतन तयार होत गेलंय.**
**लैंगिक अर्थानं भाषिक जाणीव समृद्ध व्हायला हवी, हे सुचवू पाहणारा # हॅशटॅग लैंगिकता या लेखमालेचा हा पहिला लेख.**

परवा एका सिग्नलवर एक तृतीयपंथी कारपाशी येऊन पैसे मागू लागली. पैसे देऊन, मी तिला प्रेमाने त्यांच्या भाषेत आदराने ''पांव पडती'' म्हटलं. हे ऐकून ती फारच खूश झाली. लागलीच मास्क खाली करत, मला आशीर्वाद देत ती म्हणाली, ''जियो. कोणाची गं चेली तू?'' तृतीयपंथी समुदायातील व्यक्तींचे 'गुरू' आणि त्यांचे 'चेले' असे वर्गीकरण केल जाते.

मी : मी कुणाचीच चेली नाही गं.

ती : असं व्हय, कोती हायेस का?

मी : नाही, कोती पण नाही, मी 'गे' आहे.

असे म्हणून मी पुढे जाताना ती मला आणि माझ्या गाडीला कौतुकाने पाहत उभी राहिली.

काय वाटलं असेल तिला माझ्याबद्दल? मी तिच्या भाषेतल्या 'चेला' किंवा 'कोती' या कुठल्याच शब्दांत स्वतःला बसवत नव्हतो. त्याउलट मी एका इंग्रजी शब्दात स्वतःची ओळख सांगितली. वर आमच्या दोघांमध्ये एक मोठी आर्थिक दरी होती. माझा रुबाब, माझी आर्थिक परिस्थिती, माझी सत्ता या सगळ्यांचा संबंध ती नक्कीच माझ्या शिक्षणाशी, नोकरीशी, माझ्या पगाराशी आणि कदाचित माझ्या जातीशीही लावत असेल. हो, माझं शिक्षण खूप झालं आहे; परंतु मला ना नोकरी, ना पगार, जातीनं तर मी मातंग, आईच्या बाजूने मुस्लीम! लैंगिक ओळखीमुळे तिच्या मानाने कमी; परंतु यातना भोगाव्या लागल्याच होत्या. हे विचार मनात आले आणि थोडं हसू आलं.

आमच्या दोघांमधल्या दरीचं कारण समाजामध्ये प्रस्थापित झालेल्या भांडवलशाही, धर्म, पितृसत्ता आणि जातिव्यवस्था या सगळ्यांपासून होणाऱ्या एकत्रित शोषणामध्ये आहे. आमच्या दोघांमध्ये भाषेचाही एक महत्त्वाचा फरक आहे. ती स्वतःची व्याख्या हिजडा समुदायाच्या चौकटीतून आणि त्या समुदायामध्ये प्रचलित असलेल्या 'कोती' किंवा 'चेला' या शब्दांतून करत होती. तिचा समुदाय हा या शहरापुरता, या देशापुरता, फार तर दक्षिण आशियापुरता मर्यादित आहे. तिला या एकाच समुदायात राहून त्याची परंपरा चालवायची आहे. मी मात्र माझी व्याख्या 'गे' या शब्दातून करत होतो. माझ्यासाठी हा केवळ एक इंग्रजी शब्द नसून, तो एलजीबीटी (LGBT) म्हणजे लेस्बियन-गे (समलिंगी स्त्री-पुरुष), बायसेक्श्युअल (उभयलिंगी) आणि ट्रान्सजेंडर (तृतीयपंथी) यांच्या जागतिक चळवळीतून आलेला शब्द आहे.

जसं मी समलिंगी असल्याचं माझ्या लक्षात आलं, तसा मी माझ्या या भावनेसाठी एक 'चांगला' शब्द शोधू लागलो होतो. मी स्त्रियांसारखा वागत, बोलत असल्यामुळे लोक मला 'बायल्या' असं म्हणून चिडवू लागले होते. स्त्रियांना पुरुषांचे आणि पुरुषांना स्त्रियांचे आकर्षण वाटले पाहिजे- समाजाच्या या विषमलिंगी संस्कृतीच्या अलिखित नियमाला खोडून काढण्यासाठी आधी तो विरोध शब्दरूपात आणला पाहिजे. 'लैंगिकता' या विषयीचं सामाजिक मौन तोडलं, पितृसत्ताक आणि विषमलिंगी नियमाच्या भाषेला भिडलं आणि त्या भाषेमध्ये हस्तक्षेप केला पाहिजे.

आजूबाजूला केवळ विषमलिंगी लोकच दिसत असताना माझ्या सत्यशोधासाठी मला दोनच मार्ग दिसत होते- एक म्हणजे मी दुटप्पी आयुष्य जगायचं, म्हणजे इतरांसमोर मीही विषमलिंगी असल्याचं दाखवायचं, वेळ आली तर लग्नही करायचं, माझे समलिंगी आकर्षण लपूनछपून जगायचं आणि या आकर्षणाला काय म्हणतात वगैरे भानगडीत पडायचं नाही. माझ्या आत्मबोधासाठी, आत्मसन्मानासाठी जास्त मुक्तिदायी असा दुसरा पर्याय म्हणजे आपल्या या आकर्षणासाठी एक

चांगला शब्द, त्याला समजण्यासाठी त्याबद्दलचे साहित्य, आपला समुदाय आणि आपल्या लैंगिक आकर्षणाचे प्रेमामध्ये रूपांतर करण्याची शक्यता शोधणं. मी अर्थातच, दुसरा पर्याय निवडला.

तेव्हा हाती लागलेल्या साहित्यात वैद्यकीय भाषेत 'समलिंगी आकर्षण' हा एक आजार, एक विकृती आहे, असे वाचनात आले. वैद्यकीय, तांत्रिक, भावनाशून्य आणि ओलावा नसलेला 'समलिंगी' हा शब्द मला पटला नाही. नव्वदच्या दशकात इंटरनेट आले, तेव्हा मी रोज सायबर कॅफेमध्ये बसून 'याहू–मेसेंजर'वर चॅटिंग करायचो. तिथे एकदा 'मॅन–टू–मॅन' असे चॅटरूम दिसले. त्यामध्ये आधी केवळ परदेशातल्या पुरुषांशी गप्पा मारताना माझ्या लक्षात आले की, परदेशात समलिंगी लोक स्वतःला सन्मानानं 'गे' असं म्हणतात. मी माझ्या समलिंगी आकर्षणासाठी शोधत होतो, तसा एक 'चांगला' शब्द मला सापडला होता. शब्दकोशात पाहिल्यावर लक्षात आले की, हा एक 'आनंदी' या अर्थाचा जुनाच शब्द आहे. परदेशातील समलिंगी लोकांनी स्वतःसाठी या जुन्या शब्दाचा नवीन वापर करून त्याला आपल्या समाजात रुजवलं ह्याचं मला फार अप्रूप वाटू लागलं होतं. मीही स्वतःला 'समलिंगी' न म्हणता 'गे' म्हणायचं ठरवलं. क्षणात माझं एका वैद्यकीय, तांत्रिक, आजाराच्या, विकृतीच्या शब्दातून एका सन्माननीय शब्दात रूपांतर झालं होतं. माझ्यासाठी हा एक 'राजकीय ओळख' बनण्याचा पहिला निर्णायक क्षण होता.

ही राजकीय ओळख भाषेच्या व्यवहारातून रुजवावी लागेल हे पुढे प्रकर्षाने लक्षात आलं. २००९ साली मी एलजीबीटी समुदायाच्या विषयावर 'ऑफबीट' नावाचे मराठी नाटक लिहिलं. त्याआधी मला मराठी साहित्यात कुठेही माझ्या समुदायातील लोकांचा नावाने उल्लेख झालेला दिसला नाही. मुंबईच्या सेन्सॉर बोर्डाने मला 'मराठीत समलैंगिकता नसते' अशी एक हास्यास्पद; परंतु नेमकी प्रतिक्रिया दिली. लैंगिकतेच्या चळवळीचा भाषेशी असलेला संबंधच इथे अधोरेखित झाला होता.

खरंच मराठी भाषेत समलैंगिकता नाही. 'स्त्री', 'पुरुष' आणि 'तृतीयपंथी' असे लिंगभाव दाखवणारे तीन शब्द आहेत; परंतु लैंगिक ओळखींच्या अनेक छटा या भाषेला आणि पर्यायाने संस्कृतीला ज्ञातच नाहीत. त्याउलट आमच्यासारख्या लोकांनी आयुष्यभर फक्त 'अपशब्द' आणि 'शिव्याच' ऐकल्या– 'गांडू', 'छक्का', 'गुड', 'पावली गुल', 'हिजडा' इ.

हृषीकेश कोरडे नावाच्या ट्रान्सजेंडर विद्यार्थिनीने पुणे विद्यापीठाच्या स्त्री–अभ्यास केंद्रातून याच विषयावर एक महत्त्वाचा प्रबंध लिहिला आहे. त्यामध्ये तिने काही आदिवासी जमातींमधील तथाकथित ट्रान्सजेंडर व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या आहेत. ह्या मुलाखतींमध्ये हृषीकेश मुख्यतः 'भाषेतून एखाद्याची लैंगिक ओळख कशी तयार होते?' ह्याचा शोध घेत होती. मुक्ता आणि विजया या दोघींची मुलाखत वाचताना लक्षात आलं की, त्यांच्या आदिवासी समुदायामध्ये पुरुषाने स्त्रीसारखे वागले तरी लोकांना त्यात काही वावगं वाटत नाही. आणि जगण्याच्या लढाईमध्ये लैंगिकतेला प्राधान्य नसल्यामुळे या दोघींना आयुष्यात कधीही त्यांच्या लैंगिक ओळखीसाठी एका नावाची गरज भासली नाही.

पुण्यातसुद्धा आधीपासूनच समलिंगी आणि ट्रान्सजेंडर लोकांचे गट आहेत. मी 'ऑफबीट' नाटक बसवत असताना या गटातील काही लोकांसोबत काम केलं, तेव्हा मला 'कोती' हा शब्द समजला. नंतर हेही समजले की, कोत्यांची स्वतःची परंपरेने चालत आलेली एक स्वतंत्र भाषाही आहे. अर्थात, ही भाषा, त्यातले शब्द हे केवळ विशिष्ट गटातील लोकांनाच समजतात. वरील दोन्ही उदाहरणांमध्ये दोन घटना दिसतात– एक म्हणजे काही व्यक्ती आयुष्यभर स्वतःची 'लैंगिक ओळख' तयार होऊच देत नाहीत. दुसरं म्हणजे काही व्यक्ती पितृसत्ताक संस्कृतीच्या विरोधात स्वतःची एक उपसंस्कृती व स्वतंत्र भाषाही तयार करतात. अर्थात, ही भाषा मुक्तिदायी असतेच असे नाही, या भाषेमध्येही पितृसत्ताक पूर्वग्रह दिसून येतातच.

भाषातज्ज्ञ सोस्यूर म्हणतो, भाषेतील प्रत्येक शब्द हा मुळातच एक 'अपशब्द' असतो, कारण शब्द आणि वस्तू यांच्यातलं अर्थाचं नातं हे शेवटी अभिप्रेत म्हणजे कल्पित आणि माणसांनी रचलेलं असतं. थोडक्यात, शब्द हा अर्धसत्य असतो. फ्रेंच तत्त्वचिंतक फुको म्हणतो, 'भाषा हे ज्ञानाच्या उत्पादनाचे, सत्तेचे हत्यार आहे. उदाहरणार्थ, मराठी भाषेत लैंगिक ओळखींसाठी केवळ अपशब्द आणि शिव्याच असतील तर, याचा अर्थ या भाषेच्या संस्कृतीमध्ये त्यांना सत्ता नाही. हे त्यांच्या प्रती होणाऱ्या भेदभावाचे लक्षण आहे.' स्त्रीवादी तत्त्वचिंतक बटलर म्हणते, 'भाषा हे सांस्कृतिक ज्ञाननिर्मितीतून भेदभाव करत 'कर्त्यांना' (subjects) जन्म देते.' याचा अर्थ समाज मला अपशब्द किंवा शिवी वापरून ओळखतो, तेव्हा त्यातून लैंगिक ओळखींच्या बाबतीत एक ज्ञाननिर्मिती व संस्कृती तयार होते. उदाहरणार्थ, आपल्या समाजात समलिंगी लोकांना 'बायल्या' म्हटलं जातं तेव्हा समलिंगी व्यक्ती आणि बायका दोघांचा अपमान होतो. 'कोती' नावाच्या मराठी चित्रपटात मुलींसारखे कपडे घालणाऱ्या लहान मुलाला त्याचे वडील आणि पूर्ण गाव 'बायल्या' म्हणून

(पान ५२ वर)

**विशेष ओळख**

# मनामनात सूर्य पेरणारी अरुणा

मंजुषा सावरकर

**अरुणा सबाने नावाचं वादळ जगाच्या दृष्टीनं भांडखोर ठरत असलं तरीही त्यांच्या या भांडखोरीला सलामच ठोकावासा वाटतो. स्त्री ही स्वतंत्र असून स्वबळावर स्वतंत्र जग उभारू शकते, हा विश्वास ठामपणे जपणाऱ्या अरुणाताईंच्या कामानं अनेकींच्या आयुष्यात सूर्य उगवलाय. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे मंजुषा सावरकर यांनी उलगडलेले पैलू.**

जंगलाचं जग अनेकांना भुलवतं. काहींना ते अद्‌भुत आणि चमत्कारिक वाटतं, तर कुणाला मनोहारी तेवढंच रम्य. विदर्भातलं मेळघाट असंच विलक्षण जंगल ब्रिटिशांना हे जंगलराज भावलं होतं. त्या राजवटीतील अनेक राहुट्या या आदिवासीबहुल क्षेत्रात आजही कायम आहेत. या वनात कार्य करणं आव्हानच, तेही एखाद्या महिलेनं? वनक्षेत्र आणि महिला? पण या पारंपरिक मताला छेद देत एक रणरागिनी धडाडीनं आपलं पाऊल प्रशासकीय सेवेत रोवते. सारंच अगदी सुखनैव सुरू आहे, असं वाटत असताना वरिष्ठ अधिकाऱ्याच्या रूपातला 'पुरुष' नावाचा नरपशू चोरपावलानी येतो आणि पाहता–पाहता तिच्या जगण्याचे संदर्भच बदलवून टाकतो. स्त्री म्हणून वाट्याला आलेलं दुर्दैव इथे ठाण मांडून बसलेले होतं, हे तिने स्वतःच्याच छातीवर गोळ्या झाडून आत्महत्या केल्यावर जगाला कळतं.

सारं जंगलं हा थरार अनुभवतो. प्रसारमाध्यमं भरभरून लिहितात. स्त्री संघटनेच्या दाहक प्रतिक्रिया, स्त्री–शिक्षण, स्त्री–सुरक्षा, स्त्री–सक्षमीकरण, स्त्री–स्वातंत्र्य यावर अगदी टोकाची मतं शब्दांकित होतात. पुन्हा येरे माझ्या मागल्या. जगण्याचं रहाटगाडगं सुरू. त्या जंगलात दीपाली चव्हाण स्वतःच्या प्राणास मुकली; पण समाजापुढे प्रश्नचिन्ह उभे करून छातीवर दगड ठेवून या क्षेत्रात पाठवणाऱ्या कुटुंबाने घालवलेल्या विश्वासाचं काय? स्वातंत्र्याच्या कल्पनेनं भारलेला धीटपणा? मुलींमधला आत्मविश्वास, की स्त्रीचा सर्व क्षेत्रातील संचार? ज्या पुरुषी मानसिकतेचा ही स्त्री बळी ठरली त्या दीपाली चव्हाणचं काय? केवळ हळहळ व्यक्त करणे, तिच्या कुटुंबाला शाब्दिक सांत्वन देणं बस्स! अशावेळी अरुणा सबाने नावाचं वादळ या एकूणच प्रकरणाभोवती घोंगावतं. थेट घटनास्थळापर्यंत पोहचतं, तिच्या कुटुंबाशी, कार्यक्षेत्राशी चर्चा करतं. तिच्यातली कार्यकर्ती पेटून उठते. स्वतःला ठणकावून सांगते, 'अरुणा, तू जीवंत आहेस कारण तुझ्या आतल्या आवाजाचा अद्याप मृत्यू झालेला नाही.' अशा वेळी काळाच्या चरख्यावर माणुसकीची वस्त्र विणणाऱ्या महात्मा गांधींचे वाक्य इथे महत्त्वपूर्ण वाटते. ते म्हणतात, 'आतल्या आवाजाचा मृत्यू याच्या इतकी क्रूर घटना जगात दुसरी कुठलीच असू शकत नाही.' आमच्या आतल्या आवाजाचा मृत्यू झाला आहे का? मूग गिळून बसलेला अधिकारी, पदाधिकारी आणि समाजातील प्रत्येक घटकाला त्या इशारा देतात. समाजबांधवांनो, एक वाक्य वाचल्याचं आठवतं. तुमच्या शेजाऱ्यावर अन्याय होताना, जर तुम्ही निर्धास्त झोपू शकत असाल तर... वाट पाहा पुढची तुमचीच पाळी आहे. अशा परिस्थितीत अरुणा सबाने यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट टाकली– 'आणखी किती दीपाली?'

आणि आतल्या आवाजाची खदखद बाहेर पडली. कामाच्या ठिकाणी केला जाणारा महिलांचा लैंगिक छळ याविषयीचे लेख यातून प्रकरणाचा पाठपुरावा सुरू झाला. दबलेल्या आवाजात जोश आला. त्यावेळी जगाच्या दृष्टीने अरुणा सबाने भांडखोर ठरतात; पण त्यांच्या या भांडखोरीला सलाम ठोकावासा वाटतो त्यांच्यातील लढाऊ आणि आक्रमक स्त्रीला शुभेच्छाही द्याव्याशा वाटतात. अशा अनुषंगाने मूर्तिजापूर महाविद्यालयाच्या प्राध्यपिकेचा प्रश्न त्यांनी चव्हाट्यावर आणला. प्रसारमाध्यमावर गाजला, त्यानंतर तर मालिकाच सुरू झालीय.

मला यावेळी हे आवर्जून सांगावेसे वाटते की, प्रारंभीच्या काळात समाजाकडून अनेक दूषणं ल्यालेल्या अरुणाताई आज समाजात भूषणावह आहेत. परित्यक्त्या, घटस्फोटिता, नवऱ्याने टाकलेली, नवरा सोडलेली वगैरे

दूषणं अंगावर लेऊन काळाच्या ओघात अरुणा सबाने नावाच्या या संयत समईनं धगधगत्या मशालीचं रूप कधी आणि कसं धारण केलं कळलंही नाही. त्यासाठी अरुणाच्या प्रदेशातली भटकी–विमुक्ता (विमुक्ता– कादंबरी) आम्हाला अर्थात समाजाला तपासलीच पाहिजे. अरुणाताईला समाजानं काय शिकवलं, यापेक्षाही समाजाला आणि यानंतर येणाऱ्या पिढीला त्या काय शिकवून जातात ते अधिक महत्त्वाचं ठरतं.

देहाच्या देवळातली आपली माणसं भक्तिरसात ओथंबून आपल्या आजुबाजूला आपली म्हणून उभी राहतात, तेव्हा युगानुयुगे त्या मांगल्यासमोर समई होऊन संयतपणे तेवत राहतात हजारो स्त्रिया, पावित्र्य आणि सन्मान राखत उजळून टाकतात देवळातल्या भिंतीना. समईच्या त्या लोभस उजेडात सोहळा होतो मग जगण्याचा. मात्र हीच 'आपली' माणसं असुरी आभूषणं लेऊन उभी राहतात काळाकुट्ट अंधार घेऊन त्या तेवणाऱ्या समईपुढं, तेव्हा संयमी समई परिस्थितीच्या दट्ट्यानं कशी मशाल होऊन धगधगत आपलं अस्तित्व शोधू लागते. तिला पकडू पाहणाऱ्याचे हात होरपळून टाकते आणि नव्या तेजाने ऊब आणि उजाळा देऊ लागते त्याचं ज्वलंत उदाहरण म्हणजे अरुणाताई. काही माणसं वादळ झेलतात आणि पचवतात. काही त्या वादळात कोलमडून पडतात. मात्र, काही वादळ झेलून पचवून समर्थपणे उभी राहतात. तो जिद्दीचा, संघर्षाचा प्रदेश म्हणजेच 'अरुणाचा प्रदेश'.

दीपाली चव्हाणसारख्या समाजातील वंचितांच्या वर्गाचे वकीलपत्र त्यांनी न देताच अरुणाताईनी स्वीकारले आहे. ज्यांना कोणी नाही ज्यांना निराधार असल्यासारखे वाटते. ज्यांना जगण्यात एकाकीपणाची व्यथा आणि भीती वाटते. त्यांच्यासाठी त्या आधार होतात. त्यांच्यावर लिहितात, बोलतात. जे




करता येईल ते प्रत्यक्ष करतात त्यासाठी केवढ्याही मोठ्या संस्थेशी, व्यक्तीशी दोन हात करण्याची अर्थात संघर्ष करण्याची त्यांची तयारी असते. आपल्या या वाटेवरून चालतानाचा त्यांचा आत्मविश्वास आणि निर्भयपणा लक्षणीय आहे. त्या समस्येला जाऊन भिडतात. मग ती समस्या समूहाची असो वा व्यक्तीची. एखाद्या व्यक्तीचे दु:ख दूर करता आले तरी त्या ते आपलं मोठं यश मानतात असे त्यांचे विजय शेकडोनी आहेत. त्याची पुस्तकं झाली आहेत. विमुक्ता, मुन्नी (कादंबऱ्या); अथांग, जखम मनावरची, अनुबंध (कथासंग्रह); स्त्री : नाते स्वत:शी, जिवाभावाचे (ललित); स्त्रीवाद : एक दृष्टिकोन, आक्रोश सामाजिकतेचा (वैचारिक) अशा मांदियाळीत 'आईचा बॉयफ्रेंड'सारख्या आवाहनात्मक लेखनातून समाजाला 'का?' प्रश्न विचारण्याची ताकद आणि अनप्लॅन्ड ट्रिपसारख्या मुक्त थरार अनुभवाची अभिव्यक्ती 'ते आठ दिवस' पुस्तक म्हणजे भन्नाटचं. आव्हानात्मक आणि कौतुकास्पदच. याशिवाय पाच संपादनं. जे नवीन पिढीला जुन्या पिढीचा वारसा देऊन जाणार आहेत. प्रगमनशील विचारांची प्रथितयश लेखिका, कल्पक संपादक अशी त्यांची प्रतिमा त्यांच्या कार्यातून सिद्ध झाली आहे. ध्येयवादाने प्रेरित झाल्यामुळे त्या प्रकाशनाकडे व्यवसाय या दृष्टीने न पाहता समाजप्रबोधनाचे एक माध्यम म्हणून पाहतात.

अरुणाचा प्रदेश सर्वसामान्यांसारखाच सुरू होतो. मात्र, एका वळणावर विलक्षण होऊन अवाक करून जातो. ही पाटील घराण्यात जन्माला आलेली शेतकरी कुटुंबातली मुलगी. समृद्ध, अल्लड–अवखळ बालपण, वयाच्या आठव्या वर्षी पितृछत्र हरवलेलं, वडिलांचा लौकिक भूदानात विनोबाजींना भरपूर शेती वगैरे दिलेली. घरातलं वातावरण पूर्ण राजकीय आणि सामाजिकतेनं भारलेलं. आठ भावंडं, वडील गेल्यानंतर थोरला भाऊ वडिलांच्या भूमिकेत उभा राहिलेला आईचा आत्मविश्वासाचा पदर धरून जग पालथं घालण्याच्या नादाला कवेत धरून पाहणारी गरिबी, संघर्ष या शब्दांशी अजिबात ओळख नसलेली. आईनं वाचनाची आवड, वेळेचं व्यवस्थापन गरिबांबद्दलची सहानुभूती, मदतीची भावना आणि महत्त्वाचं म्हणजे अन्यायाविरुद्धचं उभं राहणं, हे बाळकडू कदाचित समोर दत्त म्हणून उभ्या राहणाऱ्या संघर्षयात्रेसाठीच होतं.

पुरोगामी विचाराचा पुरुष म्हणून त्याच्या विचारावर प्रेम केलं. प्रेमविवाह

(पान ४९ वर)

# क्रांतिवीरांगना इंदूताई पाटणकर पुरस्कार प्रदानाच्या वेळी केलेलं भाषण

निशा शिवूरकर

**इंदूताई पाटणकरांचा १४ जुलैला चौथा स्मृतिदिन होता. त्यानिमित्तानं आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार प्रदान कार्यक्रमातलं हे भाषण. जसंच्या तसं! पुरस्कार विजेत्या निशा शिवूरकर या साऱ्याजणीच्या मैत्रिणीचं दिलसे अभिनंदन!**

आजच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षा, माणदेशी महिला बँकेच्या संस्थापक अध्यक्षा, लोकशाहीवादी डाव्या चळवळीतील माझ्या सहकारी चेतना सिन्हा, ज्यांच्या हस्ते हा पुरस्कार मला देण्यात येणार आहे ते असंघटित कष्टकऱ्यांच्या चळवळीचे नेते साथी विकास मगदूम, क्रांतिवीर बाबुराव पाटणकर लोकशास्त्रीय संशोधन व प्रबोधन संस्थेचे आणि क्रांतिवीरांगणा इंदूताई पाटणकर पुरस्कार समितीचे सर्व विश्वस्त, कार्यकर्ते, आपले मित्र कॉ. भारत पाटणकर आणि उपस्थित सर्व बंधू, भगिनींनो सर्वांना माझा नमस्कार, क्रांतिकारक जिंदाबाद.

१४ जुलै, इंदूताईं पाटणकरांचा चौथा स्मृतिदिन. इंदूताईंच्या स्मृतीला प्रेमपूर्वक अभिवादन. त्याचप्रमाणे क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवाडी, देशभक्त दिनकर निकम, स्वातंत्र्यसैनिक संभाजीराव निकम, स्त्री चळवळीतील कार्यकर्त्या उषाताई निकम यांच्याही स्मृतीला अभिवादन.

सुरवातीलाच या कार्यक्रमाला प्रत्यक्ष उपस्थित राहता येत नाही यासाठी मी आपल्या सगळ्यांची क्षमा मागते. लवकरच कासेगावला येण्याचा प्रयत्न करते. पुरस्कार समितीने इंदूताईंच्या नावाचा पुरस्कार मला दिला. माझा सन्मान केला त्याबद्धल मनापासून आभार मानते.

हा पुरस्कार माझ्यासाठी अतिशय मोलाचा आहे. १५ सप्टेंबर १९२५ मध्ये जन्मलेल्या आणि १४ जुलै २०१७ मध्ये मृत्यूला सामोरे गेलेल्या इंदूताईंचे जीवन म्हणजे मोठ्या संघर्षाचा इतिहास आहे. हा कालखंड एका व्यक्तिपुरता बघता येणार नाही. ब्रिटिशांच्या वसाहतवादी राजवटीच्या विरोधात झालेली विविध आंदोलन, देश स्वतंत्र व्हावा म्हणून झालेल्या चळवळी, स्वातंत्र्यानंतर देशाची धर्मनिरपेक्ष आणि प्रगतिशील वाटचाल आणि उपेक्षित कष्टकरी जनतेच्या हक्कांसाठी झालेल्या विविध चळवळींचा हा इतिहास आहे. इंदूताई हा इतिहास झोकून देऊन जगल्या. या इतिहासाच्या भाग झाल्या. विविध संकट आली तरी डगमगल्या नाहीत. मोठ्या धैर्याने जगल्या. माझ्या पिढीला कायम इंदूताईंच्या धैर्याचे, साहसी स्वभावाचे, सहिष्णू, प्रगतिशील व्यक्तित्वाचे आकर्षण होते. आपण चळवळीतल्या स्त्रियांना सावित्रीबाई फुलेंच्या लेकी म्हणतो तशाच माझ्या पिढीतील कार्यकर्त्या इंदूताईंच्या लेकी आहेत. आईने करावी अशी माया इंदूताईंनी आमच्यावर केली. कधी आम्हाला चार शब्द परखडपणे सुनावले. आमच्यासारख्या त्यांच्यापेक्षा वयाने लहान असलेल्या स्त्री कार्यकर्त्या स्त्रीमुक्ती विषयी, स्त्री चळवळीविषयी काय बोलतात हे त्यांनी समजून घेतले. इंदूताईंच्या विचारात ताठरता, निष्कारण कठोरता नव्हती. काळ, परिस्थिती आणि प्रश्नांच्या गरजेप्रमाणे स्वतःत परिवर्तन करणाऱ्या त्या होत्या. माझ्या या चळवळीतील आईच्या नावे मला हा पुरस्कार तुम्ही दिलात. जणू इंदुताईंचीच शाबासकी मला मिळाली.

इंदूताई नेहमी म्हणत मी आजी गोदावरी मुळे घडले. आपल्या विधवा आजीचे दुःख जस इंदूताईना कळले . तसेच त्यांचा संघर्ष, धैर्य इंदूताईच्याही जीवनाचा भाग झाला. आजी गोदावरी, आई सरस्वती, इंदूताई, सून गेलं ओमेंट नात प्राची आणि माझ्यासारख्या कितीतरी स्त्री कार्यकर्त्या असा हा मोठा पट आहे. परीघ आहे. इंदूताई यातील महत्वाचे प्रेरणास्थान आहे.

इंदूताईंनी स्वतःला घडवले. त्यांचे वडील दिनकरराव निकम गांधीजींच्या आंदोलनात होते. क्रांतिसिंह नाना पाटीलांच्या प्रतिसरकार चळवळीत होते. इंदूताईंनी आपल्या आजीचा आणि वडिलांचा वारसा आयुष्यभर चालवला. नाना पाटील यांच्या चळवळीत त्यांनी प्रत्यक्ष भाग घेतला. त्या काळात सामान्यतः बाराव्या वर्षी मुलींची लग्न करून दिली जात. मी माझ्या मर्जीप्रमाणे

जगेल, आत्मविश्वास नसलेली, डोक्यावर पदर घेणारी मुलगी म्हणून जगणार नाही. मला देशासाठी काम करायचे आहे. असं म्हणून निर्धाराने वडिलांचे घर सोडले. लग्न, नवरा, संसारा पेक्षा स्वातंत्र्याच्या चळवळीत आयुष्य द्यायला इंदूताईंनी मोठीच बंडखोरी केली. पुरुषच नाही तर स्त्री देखील जीवनदानी कार्यकर्ती होवू शकते याचे दर्शन आपल्या जीवनसंघर्षातून घडवले.

चळवळीत आयुष्य देण्यासाठी इच्छेबरोबरच स्वतःला घडवायला हवे म्हणून विविध विषयांवरची पुस्तकं वाचली. शिबिरांमध्ये भाग घेतला. प्रतिसरकार चळवळीत असणाऱ्या इंदूताईंना महात्मा गांधीजींच्या विचाराचे व कार्याचे आकर्षण होते. आपल्या मैत्रिणींसह त्या काहीकाळ सासवडच्या गांधी आश्रमात राहिल्या. याच आश्रमात त्यांना सरहद्द गांधी खान अब्दुल गफरखान, शंकरराव देव, आचार्य भागवत यांचा सहवास मिळाला. हा आश्रम प्रेमाताई कंटक चालवत. प्रेमाताईंविषयी इंदूताईंनी फार सहृदयतेने लिहिले आहे. स्वतःला समृद्ध बनवत, शरीर, मनाने समर्थ बनवत इंदूताईंनी आपले आयुष्य घडवले. चळवळीतील सहकारी, साथीदार बाबुराव पाटणकरांना जीवनसाथी म्हणून निवडले. आपल्या जीवनसाथीच्या मृत्यूची वेदना सहन केली. डगमगून न जाता शिक्षिकेची नोकरी केली. मुलगा भारत बरोबरच अनेक मुलांना घडवले. भारत पाटणकरांना चळवळीत साथ दिली. भारत यांनी एका कवितेत आपल्या आईला उद्देशून म्हंटले–

गॉरकीची 'माँ' वाचतोय
*तुझं प्रतिबिंब दिसतय तिच्यात पदोपदी*
*तिच्यातल्या तुला पाहून*
*माझ्या रक्तातलं बळ वाढत जातंय।*

असं बळ इंदूताईंनी आपल्याला दिले आहे. भारत पाटणकर आणि त्यांच्या नंतरच्या पिढ्यांना दिले आहे. इंदूताईंनी आणि आम्ही महाराष्ट्रातील परित्यक्ता चळवळीत एकत्र काम केले

हा माझ्या आयुष्यातील मोठा ठेवा आहे. शिदोरी आहे. इतरत्र अशा कामाचे एनजीओ करणं होत होते. मी आणि इंदूताई समग्र राजकीय परिवर्तनाचे स्वप्न प्रत्यक्षात आणू पाहत होतो. त्यामुळे परित्याक्त्यांच्या प्रश्नांवरच्या कामाचे एनजीओकरणं होऊ दिले नाही. आमच्याकडे असलेल्या राजकीय भानामुळे परित्यक्ता चळवळीला आम्ही दिशा दिली. परित्यक्ता स्त्रियांना स्वतंत्र रेशनकार्ड मिळावे अशी मागणी करणारी ही चळवळ स्त्रीचा भारतीय नागरिक म्हणून विचार करायला लावणारी चळवळ ठरली. आम्ही मिळून केलेल्या कामामुळे शहरात अडकलेला स्त्रीमुक्तीचा विचार महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात पोहचवला. हिरवी धरती, स्त्रीशक्ती, मानवमुक्ती' ही घोषणा इंदूताईंनी स्त्रीमुक्ती संघर्ष चळवळीच्या वतीने दिली. आंदोलन मानवमुक्तीचे ठरले. परित्यक्ता आणि विधवा स्त्रियांच्या घरांच्या हक्कांची चळवळ सांगली जिल्ह्यात इंदूताईंच्या नेतृत्वात झाली. या घरांसाठी ग्रामपंचायत ते मुंबई उच्चन्यायालयापर्यंत स्त्रीमुक्ती संघर्ष चळवळीने मोठी झुंज इंदूताईंच्या नेतृत्वात दिली. यश मिळवले. घरे उभी राहिली. परित्यक्ता स्त्रीला कोणीही तिला हाकलून देणार नाही असं घर या चळवळीने दिले. परित्यक्ता चळवळीतील हे प्रमुख रचनात्मक काम आहे. ३१ मार्च १९९७ ला या घरांसाठी झालेल्या भूमिपूजन आंदोलनासाठी मी आले होते. इंदूताईंच्या सळसळत्या उत्साहाने आम्हाला सगळ्यांनाच ऊर्जा मिळाली. संघर्षाचे बळ मिळाले.

मला क्रांतिवीरांगणा इंदूताई पाटणकर पुरस्कार जाहीर केल्याची पोस्ट फेसबुकवर भारत पाटणकर यांनी दिली. अनेकांनी माझे अभिनंदन केले. आपले चळवळीतील सहकारी कॉ. संपत देसाई यांनी लिहिले, इंदूताई ते निशाताई परित्याक्त्यांच्या न्याय्य हक्कांच्या संघर्षाचे एक रिंगण या पुरस्काराच्या निमित्ताने पूर्ण झाले.

ही न्याय्य हक्कांची लढाई, संघर्ष संपलेला नाही. इंदूताईंच्या शब्दात

बोलायचे तर हे काम संपणारे नाही. अविरत करावे लागेल. आजच्या आक्रमक पुरुषसत्ताक राजकारणाच्या काळात स्त्रियांच्या, शेतकऱ्यांच्या, कष्टकरी जनतेच्या चळवळी चालवणे कठीण झाले आहे. आदिवासी, कष्टकरी समूहाच्या बाजूने उभ्या असणाऱ्या कार्यकर्त्यांना शहरी नक्षलवादी, देशद्रोही ठरवण्यात येते आहे. फादर स्टॅन स्वामी यांच्या कारागृहात झालेल्या मृत्यूने आपण सगळेच अस्वस्थ आहोत. यूएपीए कायदा रद्द करण्याची मागणी विविध स्तरातून होते आहे. समता, स्वातंत्र्य, धर्मनिरपेक्षता ही स्वातंत्र्य आंदोलनाने, इंदूताईंसारख्या कार्यकर्त्यांच्या संघर्षातून निर्माण झालेली मूल्ये धोक्यात आली आहेत. संविधानाची व्यवस्था संपवण्याचे प्रयत्न नरेंद्र मोदी आणि भाजपची मंडळी करत आहेत. देशातील अल्पसंख्याक समूह भयग्रस्त केला जात आहे. ट्रिपल तलाक, लव जिहाद, गोहत्याबंदी, एन आर सी आदी कायदे करून समाजाचे ध्रुवीकरण केले जात आहे. आव्हान फार मोठे आहे. त्यासाठी आपले प्रयत्न, एकजूट वाढवायला हवी.

करोना काळात देशाच्या आरोग्य व्यवस्थेचे गंभीर स्वरूप देशापुढे आले. व्हेंटिलेटर, ऑक्सिजन व औषधांअभावी लक्षावधी लोकांना मरण आले. मोदी सरकारच्या चुकीच्या लॉकडाऊनमुळे कष्टकरी जनतेचे, स्थलांतरित मजुरांचे जगणे मुश्किल झाले. लोक रस्त्यावर मरण पावले. मन की बात बोलणाऱ्यांनी या विषयावर मौन धारण केले. महामारीच्या काळात मोदी सरकार जनतेला आधार देण्यात, वाचवण्यात अपयशी ठरले. करोनाकाळाचा वापर जनतेची, कार्यकर्त्यांची मुस्कटदाबी करण्यासाठी सरकारने केला आहे. जनतेच्या प्रश्नांची लढाई अवघड झाली आहे. उषःकाल होता होता काळरात्र

(पान २९ वर)

**कथा**

# एकट्या तिघी

अभय वळसंगकर

त्या तिघींची ओळख तशी अपघातानंच झाली. कॉलेजच्या पहिल्या वर्षाच्या त्या तिघी, एवढंच त्यांच्यातलं समान सूत्र. पण वर्ग वेगवेगळे, सामाजिक पार्श्वभूमी वेगळी, शाळा वेगळ्या, अगदी आवडीनिवडीसुद्धा वेगळ्याच.

'त्या' पावसाळी पहाटे कॉलेजमध्ये एक हाइकर्स ग्रुप जमला. त्यातच या तिघी जणी होत्या. नवशिक्या आणि हौशी. त्या ग्रुपमध्ये बरेचसे सिनिअर्सच होते आणि काही त्यांच्यासारखे नवखे. ग्रुप लीडरच्या ब्रिफींगनंतर फौज दादर स्टेशनकडे रवाना झाली, कर्जतची लोकल पकडायला. त्या लोकलमध्ये नेमक्या त्यांच्या जागा एकत्र आल्या आणि त्यातून पहिल्यांदा ओळख झाली. म्हणजे नावांची देवाणघेवाण, एस्.एस्.सी.च्या मार्कांची देवाणघेवाण इत्यादी. त्यानंतर दिवसभराची हाईक झाली तेव्हाही त्या एकमेकींना भेटत राहिल्या; पण ते सुद्धा न ठरवतांच.

सोमवारपासून कॉलेज परत सुरू झालं आणि त्या आपापल्या मित्रमैत्रिणींत मिसळून गेल्या, आणि आज तब्बल चाळीस वर्षांनंतरही त्यांची घट्ट मैत्री आहे. कसं घडलं हे सारं?



\+ + +

मेघा, नंदिता आणि दीपा या त्या तिघी जणी. मेघाचे वडील एका बँकेचे मॅनेजर आणि आई कॉलेजमध्ये शिकवणारी इंग्रजीची प्राध्यापिका. हिंदू कॉलनीत स्वत:चं घर आणि आठ वर्षांनी लहान भाऊ.

नंदिताचे वडिल कुर्ल्याच्या एका फोर्जिंग कंपनीत फोरमन आणि आई पूर्ण वेळची गृहिणी. तीन मुलींत नंदिता मधली.

दीपाचे वडील तिच्या लहानपणीच गेलेले. चार वर्षांनी थोरला भाऊ आणि आईची एल.आय.सी. मधली क्लार्कची नोकरी. पण माहेरचा भक्कम आधार.

दादरची मेघा, कुर्ल्याची नंदिता आणि माहिमची दीपा अशा त्या त्या वेळच्या तिघी, आज वरळीची मेघा, प्रभादेवीची नंदिता आणि पवईची दीपा अशा झाल्या आहेत. मुंबईतल्या ट्रॅफिकला न जुमानता नेमानं महिन्यातून दोन वेळा तरी प्रत्यक्ष भेटताहेत; देश-विदेशातल्या सहलीही एकत्र करताहेत आणि एकमेकींशी रोजच्या संपर्कात आहेत.

कॉलेजच्या सुरुवातीला 'त्या' हाईकमध्ये झालेली ओळख, खरंतर मैत्रीत न बदलतांच त्यांचे कॉलेजचे दिवस संपून गेले.

\+ + +

मेघा :

तिला, आशुतोष म्हणजे आशु कॉलेजच्या पहिल्या वर्षीच भेटला. प्रथम प्रेम जडलं, मग मैत्री झाली आणि एके दिवशी लग्नसुद्धा. तशी कॉलेजमध्ये ती दोघं दोनच वर्षं एकत्र होती. कारण त्यानंतर तो गेला इंजिनिअरींगकडे आणि मेघा इंग्लिश लिटरेचरकडे.

यथावकाश आशुचं शिक्षण पूर्ण झालं आणि उत्तम नोकरी मिळाली. पेप्सीकोमध्ये. हुशार तर तो होताच आणि त्यांतून कष्टानं घडवलेलं व्यक्तिमत्त्व! मग काय विचारता? पहिले झूट पेप्सीच्या मार्केटिंग डिपार्टमेंटमध्येच नियुक्ती झाली त्याची. त्याचे इतर बिचारे क्लासमेटस् मात्र त्याच पेप्सीच्या फॅक्टऱ्यांच्यात प्रॉडक्शनमध्ये लागून गेले. अशा तऱ्हेनं एका हुशार इंजिनियरचा शीतपेयंविक्या झाला, असं जरी त्याचे मित्र त्याला चेष्टेनं म्हणाले असले तरी ते सुद्धा जाणून होते की, आशुनं निवडलेली करियर त्याला किती भाग्योदयाची ठरणार आहे ते. आणि झालंही अगदी तसंच.

नोकरीच्या पहिल्या महिन्यापासून नवी कोरी फियाट, क्लब मेंबरशिप, टूरवर असताना फाईव्ह स्टारमध्ये राहण्याची सोय, अशा अनेक पर्कस्नी त्याचं व्यावसाईक आयुष्य सुरू झालं. त्यानंतर वर्षभरात मेघाचं एम.ए. सुध्दा

पूर्ण झालं. आणि ती पुढच्या शिक्षणाचा विचार करू लागली.

''आय फर्मली बिलीव इन अॅन अर्ली स्टार्ट अँड अर्ली कंप्लीशन'', आशु जेव्हा तिला पहिल्यांदा असं म्हणाला होता, तेव्हा तो फार तर इंजिनियरिंगच्या तिसऱ्या वर्षाला असेल. पण नोकरी लागून एखादं वर्ष पूर्ण व्हायच्या सुमारास तो पुन्हा एकदा तेच म्हणाला तेव्हा तिला अंदाज आलाच की, तो आता लग्नाची घाई लावणार. अर्ली–स्टार्ट म्हणजे लग्न. आणि अर्ली कंप्लीशन म्हणजे आधीच ठरविलेली दोन अपत्यं जन्माला घालून फॅमिली कंप्लीट करणं! म्हणजे या गोष्टीला मेघाची तत्त्वत: मान्यता होती, परंतु पुढच्या शिक्षणातही तिला तितकाच रस होता. पण आशुच्या प्लॅनिंगपुढं तिची फारशी मात्रा चालली नाही– किंवा तिनं फारशी चालवलीच नाही हेच खरं. लग्न मग लगेच झालं. आशुच्या इच्छेनुसार चार वर्षांत फॅमिलीही कंप्लीट झाली आणि त्या सर्व रेट्यात मेघाच्या पुढच्या शिक्षणाची इच्छा पार थिजून गेली. तिकडं आशुचा यशोरथ जोरदार दौडत होता आणि त्या ग्लोरीमध्ये आकंठ बुडून इकडं मेघा दोन मुलांना मोठं करत होती.

आशुचा चढता आलेख आणि त्या अनुषंगानं आलेली आर्थिक सुबत्ता यामुळं आपलं सामाजिक स्थान वरच्या श्रेणीकडं झुकलंय, हे मेघाला जसं जाणवू लागलं. तशी ती स्वत:मध्येही हळूहळू बदल घडवू लागली. तिच्या ब्युटीपार्लरच्या फेऱ्या वाढू लागल्या. तिचा शॉपिंगचा रस्ता दक्षिण मुंबईकडे सरकला. ती त्यांच्या क्लबच्या लेडीज विंगची अध्यक्ष झाली. तिनं बुक रीडिंग क्लब जॉईन केला वगैरे वगैरे. तिचं सर्कलसुद्धा तिनं आता जाणीवपूर्वक कॉस्मोपॉलीटन तर बनवलंच; पण आशुच्या कॉर्पोरेट सर्कलमधल्या मित्रांच्या बायका तिच्या नेहमीच्या बैठकीतल्या मैत्रिणी झाल्या.



काही वर्षं अशीच सरली. कॉलेज संपूनही आता तब्बल दहा वर्षं झाली होती. आणि एक दिवस तिला 'ते' निमंत्रण आलं– कॉलेजच्या हीरक महोत्सवाचं. माजी विद्यार्थ्यांसाठी एक स्नेहमेळावा आयोजित केला होता त्याचं.

''आशु, हे बघ काय आलंय'', मेघा.

''हो, मला पण आलंय'', आशुतोष.

''मग जायचं का आपण? मजा येईल जरा. व्हिजिटींग अवर अल्मा माटर आफ्टर अ डिकेड'', मेघा

''छे गं, जेमतेम दोन वर्षं काढली मी त्या 'तात्या' कॉलेजात, ती सुद्धा इंजिनियरिंगचं लाँच पॅड म्हणून. मी काय करू तिथं जाऊन? आय हॅव नो मेमरीज ऑफ दॅट इंस्टिट्युशन'', आशुतोष.

''असं कसं म्हणतोस आशु? आपली ओळखंच त्या कॉलेज मधली ना? मग 'नो मेमरीज' म्हणजे काय?'' मेघा.

''मेघू, तू माझी मेमरी थोडीच आहेस. तू तर माझा श्वास आहेस, श्वास. प्रेझेंट... कंटिन्युअस...'', आशुतोष.

''बास, बास... कुणाला नकार देताना किंवा विरोध करतानाही हरभऱ्याच्या झाडावर कसं चढवायचं हे तुझ्याकडून शिकावं बरं आशु. आणि मार्केटिंगमध्ये गेल्यापासून तुझं जे पॅकेजिंग असतं ना, ते तर केवळ अप्रतिम'', मेघा.

''असं नाही गं, मेघू'', आशुतोष.

''अरे ठीक आहे, मला कळलाय तुझा निर्णय. पण मी जायचं म्हणतेय. म्हणजे जाणार आहे त्या समारंभाला'', मेघा.

\+ + +

नंदिता :

कॉलेजमध्ये बी.एस्.सी. करून नंदिता पुढं गेली मुंबई विद्यापीठात एम.एस्.सी. करायला. पोस्ट–ग्रॅज्युएशन संपवून एक नोकरी मिळवायची, ठाण्याच्या औद्योगिक पट्ट्यात, एवढं साधं उद्दिष्ट होतं तिचं. वडलांची रिटायरमेंटही जवळ आलेली, त्यामुळं घरातला आर्थिक भार लवकरात लवकर उचलावा इतकीच तिची इच्छा होती. तीन वर्षांनी मोठी असलेली

बहीण एव्हाना नोकरीला लागून तिच्या परीनं तो भार हलका करतच होती; पण नंदितालाही तिची जबाबदारी पार पाडायची होती. धाकटी बहीण तिच्यानंतर तब्बल सात वर्षांनी झाल्यामुळं तिच्या भविष्याची तजवीज करावी, हाही नंदिताचा ध्यास होताच.

पण तसं काहीच घडायचं नव्हतं. ते तिला 'त्या' दिवशी अचानक कळलं. म्हणजे एका संध्याकाळी वडील तसे रोजच्याच वेळी घरी आले आणि नंदितानं पाण्याचा पेलाही त्यांना रोजच्या सारखाच दिला. घोटभर पाणी पिऊन म्हणाले,

''आई कुठंय? आणि ताई आलीये का कामावरून?''

नंदिता म्हणाली, ''होय. दोघीही आंतच आहेत.''

आणि त्यांचं घर काही इतकं मोठं नव्हतं की आतल्यांना, त्यांच्या येण्याची चाहूल लागू नये. त्यामुळं नंदिताचं उत्तर संपायच्या आतच त्या दोघी दिवाणखान्यात आल्या. आईकडं बघंत बाबा म्हणाले, ''ठरलं ग. ठरलं आपल्या मनाप्रमाणं, दोघींचही एकाच घरात.'' आणि एक मोठा उसासा सोडला. आईला अर्थातच, या गोष्टीची पार्श्वभूमी ठाऊक होती, पण या दोघी पोरींना अजिबातच नाही. त्या दोघी बहिणींत, त्यातल्या त्यात नंदिता थोडी धीट. म्हणून वडिलांना विचारलं, ''दादा, काय म्हणताय तुम्ही? कोण दोघी? काय ठरलं? कोणतं घर?''

''अगं तुझं आणि तुझ्या ताईचं लग्न ठरलं, अण्णाभाऊंच्या मधल्या आणि धाकट्या मुलांबरोबर. म्हणजे हिला माहीतंच आहे की, अण्णा किती दिवस माझ्या मागे लागलेत ते. पण आमच्या मनाची तयारी होत नव्हती. पण ती शेवटी झाली आणि अण्णाभाऊंना आज होकार कळवून आलो'', दादा.

अण्णाभाऊ दादांपेक्षा चार–पाच वर्षे मोठे; पण दोघांचा स्नेह पार सावंतवाडीतल्या त्यांच्या शालेय दिवसांपासूनचा. दादांना आय.टी.आय. करायला मुंबईत आणणारे अण्णाभाऊच– आणि सुरुवातीच्या काळात छोट्याशा चाळीतल्या घरात आसरा देणारेही अण्णाभाऊच. त्यामुळे अण्णाभाऊ आणि त्यांच्या कुटुंबीयांशी या मुलींची ओळख लहानपणापासूनचीच. शरद आणि शेखर म्हणजे अण्णांचा मधला आणि धाकटा हे तसे नंदिता आणि तिच्या ताईचे लहानपणापासूनचे मित्र– दोन कुटुंबांतील स्नेहामुळे. खरं तर अण्णा–दादा यांच्यातील मैत्रीमुळं. पण तरीही हे लग्नापर्यंत जाईल – किंवा जावं असा विचारच दोघी बहिणींनी कधी केला नव्हता.

पण शेवटी सर्व काही अण्णा–दादांच्या इच्छेनुसारच झालं. अर्थात, ते तसंच होणार होतं म्हणा.

शेखर एक होतकरू आणि निर्व्यसनी मुलगा होता. आणि त्याला 'नको' म्हणावं अशी नंदिताची प्राज्ञाही नव्हतीच म्हणा. अण्णांच्या धोरणी स्वभावानुसार त्यांनी एकाच घरच्या दोघी जरी सुना म्हणून घरात आणल्या होत्या, तरीही वन–रूम किचनची दोन वेगळी घरं त्यांनी शरद–शेखरसाठी अगोदरच घेऊन ठेवली होती– दहिसरला. आणि ते मोठ्या मुलाबरोबर परळला राहत होते. त्यामुळे नंदिताचा शेखरबरोबरचा संसार तसा स्वतंत्रच सुरू झाला. 'काही झालं तरी नोकरी करायची नाही. आणि मेहनतीला कमी पडायचं नाही'. हा शेखरचा सुरुवातीपासूनचाच खाक्या. त्यामुळे मित्राबरोबर एका खोपट्यात विरारला त्यानं स्क्रीन प्रिंटींगचा उद्योग सुरू केलेला त्याला जेमतेम वर्ष–दीड वर्ष झालं असेल आणि तेव्हाच त्यांचं लग्न झालं. काही महिन्यांतच दहिसर ते फोर्ट अशा फेऱ्या मारत नंदिताचंही एम्.एस्.सी. पार पडलं. मेहनत, चिकाटी आणि त्या जोडीला हळूहळू कमावलेली धडाडी या त्रिसूत्रीवर चालणाऱ्या शेखरचा धंदा झपझप बाळसं धरू लागला. काही वर्षांतच अंधेरीला त्यांना मोठा गाळा घेतला आणि पहिली जर्मन प्रिटींग प्रेसही घातली. दिवस तरीही उमेदवारीचेच होते. बँकांची कर्ज, गाळ्याचं लठ्ठ भाडं हे सर्व शिरावर घेत त्यानं वाटचाल चालूच ठेवली आणि केमिस्ट्रीची पोस्ट ग्रॅज्युएट पत्नी त्याची व्यवस्थापिका म्हणून त्याच्या धंद्यात जॉईन झाली. बघता–बघता, ते दहिसर सोडून अंधेरीला घर घ्यायची स्वप्न बघू लागले.

आणि एक दिवस तिला 'ते' निमंत्रण आलं– कॉलेजच्या हीरक महोत्सवाचं– आणि माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्याचं.

निमंत्रण मिळतांच, तिनं ठरवलं, आपण जायचं. जुन्या स्मृतींची ओढ तर होतीच. पण तेव्हाचे सारे आता कुठं पोचलेयंत ही उत्सुकताही!

तिची काही मेघासारखी खात्री नव्हती की, तिचीच उडी सर्वात उंच आहे म्हणून!

\+ + +

दीपा :

वडलांचं छत्र जरी अकाली हरपलं असलं तरी, आर्थिक ताणांचा मात्र तिला कधीच सामना करावा लागला नाही– संपूर्ण विद्यार्थीदशेत. आईची स्थिर नोकरी आणि भक्कम आजोळाच्या बळावर तिनं शिक्षणाची शाखा निवडली ती केवळ 'आवड' या निकषावरच. पॉलिटिकल सायन्समध्ये बी.ए. करून सोशल वर्कच्या पोस्ट–ग्रॅज्युएशनचं तिनं केव्हाच नक्की केलं होतं आणि प्रत्यक्षात केलंही तसंच. माहिम ते निर्मला निकेतन हा रोजचा प्रवासही फार त्रासाचा नाही. ठरल्याप्रमाणं ते दोन वर्षांत पार पडलं आणि ज्या कॉर्पोरेट क्षेत्राशी संबंध नको म्हणून हे क्षेत्र निवडलं त्याच्याशीच संबंध जोडला! टाटा ट्रस्टमध्येच पहिली नोकरी घेतली आणि बघता बघता तिथलीच होऊन गेली.

थोरल्या भावानं परदेशात नोकरी घेतली आणि उरल्या फक्त दीपा आणि तिची आई. आणि अर्थातच आईच्या माहेरचा विशाल परिवार.

टाटा ट्रस्टच्या कामासंदर्भात एकदा सुजयची ओळख झाली. सुजय हा टाटा ग्रुपचाच एक अधिकारी. फारसं काही नाट्यपूर्ण न होता यथावकाश त्यांच्यातली ओळख मैत्रीत आणि मग प्रेमात बदलली आणि मग लग्नसुद्धा. त्या लग्नाला नकार देण्यासारखं कारण दोघांच्याही घरांतून नसल्यामुळं सारं कसं विनासायास पार पडलं. भाऊ कायमचा परदेशी स्थायिक. मुंबईच्या मानानं प्रशस्त घर. त्यात राहणारी एकटी आई. सुजयचं कुटुंब सोलापूरला राहणारं आणि त्याचं मुंबईचं घर भाड्याचं. तेव्हा 'आपण सर्व आपल्याच घरी एकत्रच राहूया' या आईच्या प्रस्तावाला दीपानं जरी पटकन् होकार दिला तरी, सुजयचा होकार मिळवून त्यांना प्रत्यक्ष 'एकत्र' राहायला सुरुवात करायला तीनेक वर्ष सहज गेली. त्यानंतर त्यांना पहिलं आणि एकच अपत्य झालं. कारण, दुसरं नको हा त्यांच्या दोघांचा ठाम निर्णय होता. बाळंतपणाच्या छोट्या ब्रेकनंतर दीपाचं काम पूर्ववत सुरू झालं आणि सुजयचं तसं थांबलंच नव्हतं. छोट्या शहरातून मुंबईला आलेला सुजय तसा इथं चांगलाच रूळला होता. पण आपली सुरुवात छोट्या शहरातील असल्यामुळं मुंबईत यशस्वी व्हायला जादा कष्ट घ्यायला हवेत, अशा विचारांच्या मुशीत आपलं व्यक्तिमत्त्व घडवत होता. वरिष्ठांचा म्हणूनच तो लाडका होता आणि त्याचमुळे व्यावसायिक प्रगतीपथावर इतरांपेक्षा दमदार पावलं टाकत होता. एका आतल्या कोपऱ्यात 'घरजावई' असल्याची सल होतीच, त्यातून कमावती पत्नी आणि सुखवस्तू सासूच्या पार्श्वभूमीवर त्याची पारंपरिक पुरुषी मानसिकता त्याला कुठंतरी अस्वस्थ करंत होती. पण तरीही फारसे गंभीर पेचप्रसंग नसलेला त्यांचा संसार तसा ठीकच चालला होता, असं म्हणायला काहीच हरकत नाही.

आणि एक दिवस दीपाला 'ते' निमंत्रण मिळालं. सुजयचा तिच्या कॉलेजच्या दिवसांत काहीच संबंध नव्हता आणि तो मुळातला बाहेरगावचाच असल्यामुळं तसं दीपाच्या त्या कॉलेजबद्दलही त्याला काही मत नव्हतं.

जेव्हा दीपा त्याला त्या निमंत्रणाबद्दल म्हणाली तेव्हा तो एका 'अतिरिक्त ऊर्जेनं' (हे दीपाचं मनातलं निरीक्षण!) म्हणाला, ''म्हणजे काय? तू जायलाच हवंस. किती दिवस घर आणि नोकरीच्या विळख्यात अडकून राहणार तू? तुला तुझं सोशल लाईफ हवंच की– नोकरीच्या पलीकडलं. नक्की जा, जुन्या मैत्रिणींना भेट. चांगली संधी चालून आलीये.''

दीपाला सर्व कळलं; पण तिनं लक्ष फक्त निमंत्रणावरच केंद्रित ठेवलं. एका अर्थानं हे खरंच होतं म्हणा की, तिला तिच्या रूटीनमधून बाहेर डोकावण्याची गरज होतीच; पण त्याच बरोबर आपल्या इतर सख्यांचा आजवरचा

(पान ४३ वर)


## नव्यानं वर्गणी भरायची आहे?

| भारत | | | |
|---|---|---|---|
| | वार्षिक | ३ वर्षे | १० वर्षे |
| व्यक्ती | ५००/– | १४००/– | ५०००/– |
| संस्था | ७००/– | १९००/– | ७०००/– |

| भारताबाहेर | | |
|---|---|---|
| | वार्षिक | ३ वर्षे |
| व्यक्ती | ५० यु.एस. डॉलर्स | १२० यु.एस. डॉलर्स |
| संस्था | ६० यु.एस. डॉलर्स | १५० यु.एस. डॉलर्स |

वर्गणी मनीऑर्डरने किंवा 'निरामय पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट'च्या नावे डिमांड ड्राफ्टने /**AT PAR** चेकने पाठवावी.
वर्गणी इंटरनेट बँकिंगद्वारे तसेच, मिळून साऱ्याजणीच्या www.miloonsaryajani.in या वेबसाईटवरूनही भरता येईल.
यासाठी आमचे खाते क्रमांक आहेत –

**युनियन बँक, कर्वे रोड, पुणे**
Saving Ac. No. - **370002010908793**
IFSC - **UBIN0537004.**

**बँक ऑफ महाराष्ट्र, कर्वे रोड, पुणे**
Saving Ac. No. - **60029908172**
IFSC - **MAHB 0000116.**

A/C Name :
**Niramaya Public Charitable Trust**

**एक महत्त्वाची सूचना –** वर्गणी ऑनलाईन भरल्यानंतर ७४४७४४९६६४ या क्रमांकावर नांव, पत्ता, वर्गणीची रक्कम आणि वर्गणी कोणत्या बँकेत भरली याची SMS करून माहिती द्यावी, म्हणजे खात्यात जमा झालेली वर्गणी कोणाची आहे हे आम्हांला कळू शकेल.

# महिला आरक्षण विधेयक

लता भिसे–सोनवणे

**महिला आरक्षणाचा मुद्दा आंतरराष्ट्रीय महिला वर्षानंतर पुढं आला. खरं तर गेल्या तब्बल २५ वर्षांपासून महिला आरक्षण विधेयक रेंगाळलं आहे. यातूनच महिलांकडे बघण्याची व्यवस्थेची दृष्टी ध्वनित होते. म्हणूनच समतावादी राजकारण येण्यासाठी या विधेयकाचा पाठपुरावा करायलाच हवा, असं साऱ्याजणी आग्रहानं मांडत आहे.**

१२ सप्टेंबर २०२१ रोजी महिला आरक्षण विधेयकाला पंचवीस वर्षे पूर्ण होतील. राज्यसभेत मंजूर झालेले हे बिल अजूनही लोकसभेमध्ये मंजूर झालेले नाही. स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये महिलांना सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठेचे हक्क देताना संसदेत आणि संसदे बाहेरही अनेकदा मोठ्या प्रमाणावर विरोध झालेला आहे. स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिल मांडले त्याही वेळेला पितृसत्ताक व्यवस्थेचे समर्थन करणाऱ्यांनी हिंदू कोड बिलाला विरोध केला. त्यानंतरही जेव्हा जेव्हा महिलांना हक्क देण्याची वेळ आली, तेव्हा विरोध झालेला आहे. आणि हिंदू कोड बिलानंतर सर्वात जास्त प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पद्धतीने विरोध हा पंचवीस वर्षापूर्वी मांडलेल्या संसद व विधानसभेत महिलांना आरक्षण देणाऱ्या बिलाला झाला आहे. १२सप्टेंबर १९९६ रोजी देवेगौडा सरकारने सादर केलेले विधेयक लोकसभेत मंजूर होऊ शकले नाही. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या खासदार गीता मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त संसदीय समितीकडे हे बिल पाठवण्यात आले. या समितीने १९९६ रोजी लोकसभेत आपला अहवाल सादर केला. यानंतर एनडीए सरकारच्या काळात १९९८मध्ये १२ व्या लोकसभेत पुन्हा विधेयक सादर केले गेले.१९९९, २००२मध्ये ही सादर झाले.२००३, २००४मध्ये सामाईक किमान कार्यक्रमात या बिलाचा समावेश केला. त्यानंतर फेब्रुवारी २०१०मध्ये केंद्रीय मंत्रिमंडळाने हे विधेयक मंजूर केले. परंतु लोकसभेत मात्र हे विधेयक मंजूर होऊ शकले नाही. या सर्व काळात महिला संघटनांनी ८ मार्च महिला दिन असो वा अन्य कुठलाही महिला चळवळीचा कार्यक्रम असो, महिला आरक्षण मिळालेच पाहिजे ही मागणी लावून धरली. २०१४ पासून भारतीय महिला फेडरेशन परिषदा घेऊन, पंतप्रधानांना लाखो पत्रे पाठवून तसेच महिला दिनालाही या मागणीवर सातत्याने मोहीम चालवली आहे. कारण, हा केवळ राजकीय मुद्दा नाही तर भारतीय स्त्रियांच्या मुलभूत मानवी हक्काचा हा अत्यंत गंभीर मुद्दा आहे आणि म्हणून बिलाच्या पंचविसाव्या वर्षानंतर महिला आरक्षणाबाबत पुन्हा एकदा मोहिमेची आवश्यकता आहे.

महिला आरक्षणाचा प्रश्न हा आंतरराष्ट्रीय महिला वर्षानंतर पुढे आला. आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने युनोने सांगितल्यानुसार भारतामध्ये फुलरेणू गुहा यांच्या अध्यक्षतेखाली स्टेटस ऑफ विमेन कमिटी नेमली गेली. त्यामध्ये भारतीय स्त्रियांच्या स्थितीबाबत अहवाल तयार झाला. त्यामध्ये स्त्रिया शिक्षण, रोजगार, आरोग्य याच बरोबर राजकारणातही मागे आहेत असे या अहवालाने सांगितले आणि महिलांना आरक्षण दिले तरच महिलांचा राजकारणातील सहभाग वाढेल अशी स्पष्ट भूमिका घेऊन तशी शिफारसही केली गेली. या शिफारशींची महिला संघटनांनी व महिला चळवळीने अत्यंत गंभीर दखल घेतली व आरक्षणाचा पाठपुरावा केला आणि त्यामुळे पंचायतराज संस्थांमध्ये व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी आरक्षण आले. महिला, दलित, आदिवासी यांना पंचायतराज संस्थांमध्ये १९९२मध्ये आरक्षण आले. म्हणजे आरक्षणाचा लढा हा जरी १९९२ पासून सुरू झालेला दिसला तरी याची मुळं १९७४च्या स्टेटस ऑफ विमेन कमिटीच्या शिफारशींमध्ये आहेत. हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

या विधेयकाला विरोध का होतो आहे?

या विधेयकाचा फायदा समाजातील उच्चवर्गीय, उच्चवर्णीय महिलांना होईल आणि म्हणून या आरक्षणात अनुसूचित जाती, जमाती बरोबरच इतर मागास प्रवर्गातील महिलांसाठीही आरक्षण असले पाहिजे. उच्चवर्गीय, उच्चवर्णीय

महिलांना याचा फायदा होईल असे म्हणत असताना ज्येष्ठ नेते शरद यादव यांनी तर या आरक्षणाचा 'बालकटी औरते' फायदा घेतील, असे म्हणाले होते. आणि यावर खूपच गदारोळ झाला होता. दुसरा मुद्दा पुढे येतो आहे, तो म्हणजे या विधेयकामुळे सध्याच्याच प्रस्थापित राजकारणी घरातील महिला नातेवाईक यांनाच निवडणुकीत उभे केले जाईल व त्यामुळे सर्वसामान्य महिलांना आरक्षणाचा लाभ होणार नाही आणि बिलाचा जो उद्देश आहे तोच हरवला जाईल. याच बरोबर जो विरोध अनुसूचित जाती जमातींच्या शिक्षण व नोकरीतील आरक्षणाला होतो. त्यामध्ये मेरिटचा(गुणवत्ता) मुद्दा येतो, तोच मुद्दा, तोच निकष इथेही लावला गेला आहे. महिलांनी आपली गुणवत्ता सिद्ध करावी. त्यांना आरक्षणाची गरज नाही. त्याच बरोबर अजून एक असा विचार पुढे येतो की, सरकारने आरक्षण देण्याची गरज नाही. जो पक्ष निवडणूक लढवेल त्या प्रत्येक पक्षाने उमेदवार उभे करताना त्यांना तिकीट देण्यामध्ये आरक्षण ठेवावे.

गेली पंचवीस वर्षे हे बिल रेंगाळत राहिले आहे आणि महिलांसाठी अत्यंत महत्त्वाचा असा संसद आणि विधानसभेतील आरक्षण हा मुद्दा दरवेळी अडथळे वाढवणारा ठरला आहे. खरं तर २०१४ आणि २०१९ या दोन्ही वेळी सध्याच्या सत्ताधारी भाजपाने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यामध्ये असे म्हटले होते की, आम्हाला बहुमत मिळाले तर आम्ही महिलांना आरक्षण देऊ; परंतु गेल्या सात वर्षात किसान कायद्यासारखे कायदे मागणी न करताही आणले गेले, नि जे बिल राज्यसभेत मंजूर झाले लोकसभेत मंजूर होऊ शकले नाही, ते बिल बहुमत असूनही भाजपा सरकार हा कायदा आणत नाही हा त्यांच्या महिलांकडे बघण्याच्या दृष्टिकोनाचाच एक आविष्कार आहे.

जात, वर्ग व लिंगभाव आधारित विषमता असलेल्या पितृसत्ताक समाजात महिलांना कुटुंबात आणि कुटुंबाबाहेर निर्णय प्रक्रियेत सहभाग नाकारला गेला आहे. एवढेच नाही तर, अगदी गावाच्या चावडी समोरून जाताना दलित आणि महिलांनी पायात चप्पल घालून जायचं नाही, अशा अपमानास्पद प्रथा ही महाराष्ट्रात होत्या. ७३ व ७४ व्या ऐतिहासिक घटनादुरुस्तीने स्त्रिया आणि दलितांना ग्रामपंचायतीत खुर्चीत बसण्याचा अधिकार दिला आणि तेवढेच नाही तर सरपंच, पंचायत समिती सभापती आणि जिल्हा परिषद अध्यक्षपद आरक्षणामुळे ही महत्त्वाची पदे ही त्यांना भूषवता येऊ लागली. निर्णयप्रक्रियेत त्यांच्या क्षमता नाहीत, कौशल्य नाहीत, असे म्हटले गेले. अशा या समाज समूहांनी गेल्या पंचवीस वर्षांमध्ये देशभर हा समज खोटा ठरवला आहे. सदस्य म्हणून व या महत्त्वाच्या पदाच्या पदाधिकारी म्हणून अनेक महिलांनी अत्यंत चांगली भूमिका बजावलेली आहे. विकासामध्ये, विकासाच्या प्रक्रियेमध्ये महिलांना निर्णयप्रक्रियेत संधी दिली तर त्या निश्चितच चांगली भूमिका बजावू शकतात हाच या गेल्या पंचवीस वर्षाचा अनुभव आहे. काही गावांमध्ये सर्व स्त्रियांची ग्रामपंचायत हाही एक अनुभव महिलांची क्षमता सिद्ध करणारा आहे. 'बाईची बुद्धी भातातलं पाणी बघण्याइतकीच', अशा समजाला महिलांनी खोडून काढले आहे. लाखो महिला सदस्य सरपंच होऊ शकतात, निर्णयप्रक्रियेत सहभागी होऊ शकतात तर मग देशाच्या संसदेमध्ये राज्यांच्या विधानसभामध्ये त्यांना प्रवेश नाकारला जातो, हा प्रश्न या पंचविसाव्या वर्षाच्या निमित्ताने महिला संघटना विचारत आहेत. संसद व विधानसभेतील आरक्षणा बरोबरच सर्व निर्णयप्रक्रियांमध्ये महिलांना आरक्षण असले पाहिजे, समान सहभाग असला पाहिजे ही मागणी गेले काही वर्ष महिला चळवळीने पुढे आणली आहे. कोरोना काळामध्ये टास्क फोर्ससारख्या समित्यांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व अत्यंत नगण्य होते. कोरोना काळ, नैसर्गिक व मानव निर्मित आपत्तीचे महिलांवर होणारे परिणाम हे पुढे आले; पण त्या परिणामांमधले बारकावे धोरणांमध्ये येण्यासाठी निर्णयप्रक्रियेमध्ये महिलांचा सहभाग नाही. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात लोकशाही प्रक्रिया अधिक व्यापक आणि जनसहभागी करण्याच्या दृष्टीने महिला आरक्षण अत्यंत महत्त्वाचं राहणार आहेच, पण अत्यंत आवश्यकच आहे.

दर दहा मैलाला बदलणारी पितृसत्ता, पुरुषप्रधानता, मर्दानगीच्या नवनव्या कल्पना त्याचबरोबर जातिव्यवस्थेचे नवे आविष्कार, विवाहसंस्थेमध्ये आलेली अरीष्टे, संपूर्ण समाज जीवनामध्ये वाढलेली धर्मांधता, जनविरोधी आर्थिक धोरणे यामुळे, महिला, कष्टकरी आणि नागरिक या तिन्ही भूमिका बजावताना त्यांच्या आत्मसन्मानाचे, सन्मानाने जगण्याचे, त्यांच्या विकासाचे अनेक प्रश्न कुटुंबात आणि कुटुंबाबाहेर तयार झाले आहेत. आणि याची उत्तरे पुरुषप्रधान संस्कृती, पुरुष पुढाकार घेऊन सबलीकरण या नावाखाली शोधतात आणि त्यामुळे बहुतेकदा महिलांच्या प्रश्नाचे प्राधान्यक्रम, त्याचे सोडवणुकीचे मार्ग, त्याचे पर्याय हे सर्व पुरुषांच्या नजरेतून होते आणि यामुळेच सर्व ठिकाणी निर्णयप्रक्रियांमध्ये, धोरण ठरवण्यात महिलांची भागीदारी अत्यंत आवश्यक झाली आहे.

या भागीदारीकडे याच परिप्रेक्ष्यात पाहायला हवे. देशाची संसद व राज्याची विधानसभा जर महिलांच्या मानवी हक्काबाबत, त्यांच्या सन्मानाने जगण्याच्या हक्काबाबत निर्णय घेणार असेल, महिलांच्या विकासाचा निधी ठरवणार असेल तर या सभागृहातमध्ये महिलांचे असणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य लढ्यामध्ये महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढल्या आणि त्यामुळे मताचा अधिकार

(पान ५० वर)

**पुस्तकांच्या मनात**

# मुलांच्या सहभागातून शिस्त : एक प्रयोग

## अभय अभियानाच्या नवीन पुस्तकाची ओळख

गौरी देशमुख
कल्याणी सोहोनी

**मूल वाढवताना त्याच्या विस्तारत जाणाऱ्या जगाचा परीघ पालक म्हणून आपण समजून घ्यायला हवा. ही समज देणाऱ्या अभय अभियानाच्या 'मुलांच्या सहभागातून शिस्त : एक प्रयोग' या पुस्तकाबद्दल, प्रस्थापित शिक्षक दिनानिमित्त विशेष लेख! मुलांना घडवण्यातला शिक्षक हा महत्त्वाचा घटक आहे. म्हणून ५ सप्टेंबर बरोबरच आदर्श शिक्षक जोतिबा आणि सावित्री यांच्या स्मृतिनिमित्त २८ नोव्हेंबर आणि ३ जानेवारी या दिवशीही शिक्षकांचा सन्मान करायला हवा, अशी साऱ्याजणीची भूमिका आहे.**

मुख्याध्यापकांसाठी कार्यशाळा चालू होती. अंदाजे ३०-३५ जण सहभागी झाले होते. त्यातले एक साधारण पन्नाशीतील सर बोलायला उभे राहिले. त्यांच्याबाबतीत घडलेला त्यांच्या बालपणीचा प्रसंग सांगू लागले. मोठ्यांकडून त्यांनी अनुभवलेल्या शिक्षेच्या प्रसंगाचे कथन ते करत होते. आजही ते सगळे आठवताना भीती, खिन्नता, हतबलता या भावनेतून ते अचानक ढसाढसा रडायला लागले.

दुसऱ्या प्रसंगात एका शिक्षिकेने त्यांचा शिक्षेबद्दलचा अनुभव सांगितला. त्या सातवीत असताना गणिताच्या सरांनी सर्वांसमोर त्यांची केलेली हेटाळणी, फाडलेल्या वह्या, पालकांकडे सतत केलेली तक्रार, यातून पालक आणि शिक्षक यांचा बसलेला दुहेरी मार. यामुळे गणिताबद्दलची बसलेली भीती आजही त्यांची पाठ कशी सोडत नाही, हे सांगताना बाईंचा कंठ दाटून आला होता.

'शिक्षा' या शब्दामधली जरब, भीती, सल माणसांमध्ये किती खोलवर रुतते, याचा अनुभव अशा कित्येक कार्यशाळांमधून एक प्रशिक्षक म्हणून आम्हाला येत राहतो.

मूल वाढत असताना त्याचे विश्व घर-कुटुंब, शेजारपाजार, शाळा आणि मग बाहेरचे मोठे जग असे विस्तारत जाते. या सर्वच ठिकाणी काही नियम, चौकटी आवश्यकच असतात. तिथे वावरताना मुलांना त्या पाळायला शिकवणे हे प्रौढांचे कामच आहे. बरेचदा यात प्रौढांचे प्रयत्न कमी पडतात किंवा पद्धती चुकीच्या असतात. कधीकधी शिस्त, वळण, संस्कार, आदर्श या प्रौढांनी त्यांच्या सोयीनुसार आखलेल्या चौकटीत लहान मुलांचे वर्तन बसणारे नसते. मग चालू होते ती लहानांना त्या चौकटीत बसवण्याची प्रौढांची धडपडआणि यातूनच शिस्तीच्या नावाखाली मुलांना केल्या जाणाऱ्या शिक्षांचा वापर बरेचदा प्रौढांकडून केला जातो. या शिक्षा जशा शारीरिक वेदना, इजा करणाऱ्या असतात तशाच अपमान, हेटाळणी, तुच्छता यामुळे मानसिक-भावनिकदृष्ट्या हानी करणाऱ्या असतात.

याचबरोबर वरकरणी कौतुकाचे वाटणारे प्रकार म्हणजे पालकांनी मुलांचा प्रत्येक हट्ट ताबडतोब पुरवणे, मुलाची प्रत्येक छोटी-मोठी कामे स्वतःच करत राहणे, स्पून फिडिंग करणे; पण यामुळे आपण मुलांना अकार्यक्षम बनवतो आहोत याची पालकांना, शिक्षकांना बरेचदा जाणीव नसते.

सहज, सोपा पर्याय म्हणून बहुतांश समाजानेही स्वीकारलेला हा शिक्षांचा मार्ग, जो आतापर्यंत पिढ्यान् पिढ्या सर्रास चालत आलेला आपल्याला दिसतो. मग वयाच्या ५०-६० वर्षापर्यंत मनात राहिलेली त्या शिक्षांबद्दलची सल अशा कार्यशाळेतून व्यक्त होते. या वयातही शिक्षेचा प्रसंग जसाच्या तसा आठवतो आणि त्यातील भावनेने रडायला येणे, हतबल वाटत राहणे चालू राहते. शिक्षा करणाऱ्या व्यक्तीबद्दलचा राग अजूनही मनाच्या तळाशी राहतो. त्या त्या वेळी वाटलेली लाज, स्वतःबद्दल कमीपणाची किंवा स्वतःची लायकी नसल्याची भावना मूळ धरू शकते व या सगळ्याचे व्यक्तिमत्त्वावर दूरगामी दुष्परिणाम दिसून येतात. शाळागळती, मुले औपचारिक शिक्षणव्यवस्थेच्या बाहेर फेकली जाणे, जायबंदी होणे, तात्पुरते किंवा कायमस्वरूपी विकलांगता येणे आणि अपवादात्मक परिस्थितीत मुलांचा मृत्यू ओढवणे किंवा आत्महत्या करणे इथपर्यंतसुद्धा केलेल्या शिक्षांचे गंभीर परिणाम संभवतात.

### बोलण्याच्या आधी आपण ऐकायला शिकूया

शिक्षा करणाऱ्यांना इतर पर्याय का सुचले नसतील यावर शिक्षा मिळालेल्या व्यक्तींकडून अशा कार्यशाळेमधून प्रश्न उपस्थित केले जाऊ लागतात. बरेचदा याचे कारण म्हणजे दुसरे सकारात्मक मार्ग किंवा पद्धती अनुभवलेलेच नसतात, माहीत नसतात आणि त्यावर फारसा

**५ सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त...**




विचारही केलेला नसतो. त्यामुळे, स्वत: ती व्यक्ती ज्या अनुभवातून गेलेली असते ते त्रासदायक, अन्यायकारक वाटले असले, तरी प्रौढावस्थेत गेल्यावर तीच व्यक्ती आपसूकपणे तशा मार्गांचाच लहानांवर वापर करताना दिसते. यातूनच शिक्षा हेच शिस्त लावण्याचे एकमेव माध्यम आहे, हा विचार पक्का होऊन अनेकांकडून शिक्षांचाच मार्ग अवलंबला जातो.

या अशा चक्रात सापडलेल्या कितीतरी व्यक्ती अनेक कार्यशाळांच्या माध्यमातून सतत दिसत राहतात.

'शिक्षा हेच शिस्त लावण्याचे एकमेव माध्यम आहे', या विचाराला छेद देऊन भयमुक्त वातावरणात आनंददायी शिक्षणातून मुलांच्या क्षमतांचा विस्तार व्हायला हवा, यासाठी सन २००६ पासून पुण्यात 'अभय अभियान' या नावाने कार्यरत असलेल्या एका चळवळीमार्फत काम केले जात आहे. यामध्ये अनेक व्यक्ती आणि संस्थाचा समावेश आहे.

मुलांमध्ये स्वयंशिस्त रुजावी; पण शिस्तीच्या नावाखाली त्यांना शिक्षा केल्या जाऊ नयेत यासाठी शिक्षक–प्रशिक्षण, पालकसभा, निरनिराळ्या प्रकारे जनजागृती आणि धोरणकर्त्यांबरोबर काम अशा पद्धतीतून हे काम पुढे नेले जात आहे. यातलाच एक भाग म्हणजे नुकतीच अभय अभियानामार्फत 'मुलांच्या सहभागातून शिस्त : एक प्रयोग' या पुस्तकाची निर्मिती केली गेली आहे.

शिक्षा न करता मुलांमधे खरेच स्वयंशिस्त रुजणे शक्य आहे का? त्यासाठी अभियान ज्या विचारांचा, पद्धतींचा आणि तंत्रांचा पुरस्कार आणि प्रचार करते त्या खरोखर परिणामकारक ठरतात का? याचा पडताळा घेण्यासाठी अभय अभियानामार्फत पुण्यातील एका शाळेत सलग दोन वर्षे, विद्यार्थी आणि शिक्षकांबरोबर 'स्वयंशिस्त रुजवण्यासाठी सकारात्मक पद्धती' वापरण्याचे प्रयोग केले गेले. त्यातूनच या पुस्तकाची निर्मिती झाली.

सकारात्मक शिस्त (Positive Discipline) ह्या विषयावर आपल्याकडे फारसे साहित्य उपलब्ध नाही. सकारात्मक शिस्त आणि त्या अनुषंगाने अभ्यासले गेलेले मुद्दे, तंत्र, पद्धती यांचा या पुस्तकात समावेश केला आहे. त्यामुळेच मुलांबरोबर काम करणाऱ्या प्रत्येकाला हे पुस्तक मदतीचे ठरेल ह्याबद्दल आम्हाला नक्कीच विश्वास वाटतो.

सर्वसाधारणपणे शिस्त आणि स्वातंत्र्य हे विरुद्धार्थी शब्द म्हणून वापरले जातात. पण खरंतर स्वातंत्र्य म्हणजे आपल्या मनाप्रमाणे, कलाप्रमाणे जीवन जगता येणे व त्यातून आपल्या जीवनाला आकार देता येणे असे म्हटले, तर शिस्त म्हणजे सुव्यवस्था. शिस्त आणि स्वातंत्र्य याचा नेमका अर्थ लक्षात आला तर स्वातंत्र्याबरोबर येते ती जबाबदारी आणि जबाबदारीतून निर्माण होते ती सुव्यवस्था, हा विचार जर मुलांबरोबर काम करणाऱ्या प्रत्येक प्रौढाला पटला तर भयमुक्त, आनंददायी शिक्षणाचा पाया रोवण्यास मदत होईल, या हेतूने या पुस्तकाची निर्मिती केली गेली आहे.

**कोणत्या पद्धतीला सकारात्मक म्हणायचं?**

- उद्दिष्ट कोणतंही असलं तरी ते साध्य करण्यासाठी हिंसाविरहित पद्धतीचा वापर होतो.
- मोठी माणसंदेखील ठरवलेल्या नियमांचे पालन करतात.
- दोघांचंही हित साधलं जातं.
- दोघांचाही आत्मसन्मान जपला जातो.
- मुलांबद्दल आपुलकी आणि आदर असतो.
- मुलांवर कुरघोडी करण्याचा हेतू नसतो, तर शेवटी मोठे आणि मुलं दोघांमध्येही समाधानाची भावना असावी असा प्रयत्न असतो.
- मुलांबरोबर वागण्याच्या मोठ्यांच्या पद्धतीत आत्मीयता, सहृदयता आणि ठामपणा असणं ही सकारात्मक पद्धतीची पूर्वअट आहे.

'शिक्षा नाकारून शिस्त रुजवावी', हे म्हणताना मुलांना शिस्त लावताना नियम असायला हवेत हीच अभय अभियानाचीही भूमिका आहे. फक्त नियम करताना त्याबरोबर येणारी जाचकता व त्यातून मुलांवर केली जाणारी हिंसा टळावी याकरता सकारात्मक शिस्तीचा खरा अर्थ समजणे गरजेचे वाटते. शिक्षांमुळे मुलांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारे घातक परिणाम प्रौढांनी समजून घ्यावेत

## अगदी महत्त्वाचं

आपला पुढील अंक ऑक्टोबर–नोव्हेंबर जोड अंक असणार आहे. हा जोड अंक १ नोव्हेंबरला पोस्टाने रवाना होईल. ऑक्टोबरचा अंक प्रकाशित होणार नाही. यावर्षीही कोरोनामुळे सर्वांचेच अंक पोस्टाने रवाना होतील. जास्तीचे अंक हवे असतील तर कार्यालयात संपर्क करावा, ही विनंती.

दिवाळीनिमित्त 'मिळून साऱ्याजणी'चे कार्यालय २ ते ७ नोव्हेंबर बंद राहील. ८ नोव्हेंबरपासून कार्यालय नेहमीप्रमाणे सुरू होईल.

**संपर्क नं.**
०२०–२५६५३९३८
७४४७४४९६६४



आणि मुलांचे अयोग्य वागणे योग्य पद्धतीने कसे हाताळावे यावर ह्या पुस्तकात मार्गदर्शन मिळते.

यातूनच शिस्तीची वेगळी संकल्पना आपल्या समोर येते. ही शिस्त लोकशाही पद्धतीमधील समाजाच्या नियमांच्या चौकटीतली आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'निर्णयप्रक्रियेत मुलांचा सहभाग असावा' हा आग्रह धरणारी आहे.

हा विचार या पुस्तकाचा आत्मा आहे, असे म्हणणे योग्य ठरेल. समानतेचा आग्रह धरणारी शिस्त का स्वीकारायची हे सांगताना मुलं ही प्रौढांपेक्षा वयाने, अनुभवाने लहान असली तरी माणूस म्हणून ती समान पातळीवर आहेत आणि प्रौढांप्रमाणे मुलांनाही सन्मानाने जगण्याचा अधिकार जो आपल्या संविधानाने लहान–मोठ्यांना दिलेला आहे, याची आठवण हे पुस्तक वाचताना होते. तसेच मुलांमध्ये समानता हे मूल्य रुजण्यासाठी प्रौढांकडून काय काय उपाययोजना अपेक्षित आहेत हे देखील या पुस्तकातून उलगडत जाते.

पुस्तकात शिक्षा व सकारात्मक शिस्त यावर अनेक मुद्दे सखोल अभ्यासातून मांडले गेले आहेत. यातील 'सत्तासंबंध, हिंसाचार आणि शिक्षा' हे प्रकरण वाचताना शिक्षा करताना समाजातील विषम सत्तासंबंध कशी भूमिका बजावतो हे समजते. जर सत्तासंबंधातील दडपणाचे, अन्यायाचे, शोषणाचे वेगवेगळे नमुने लहानपणापासून मुलांनी अनुभवले, मुलांमध्ये खोलवर रुजले तर मुलांच्या व्यक्तिमत्त्वामध्येही त्याचे दुष्परिणाम दिसून येतात. अन्याय करणारे किंवा सहन करणारे गट समाजात कसे निर्माण होतात यावर यात भाष्य केले आहे. यातूनच आज समाजात सर्वत्र दिसणारा 'पॉवर गेम'चा प्रभाव माणसासाठी, समाजासाठी किती घातक आहे, याची जाणीव होत राहते.

वंदना भागवत यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेतून–

*मूल बेशिस्त आहे म्हणजे ते आपला अपमान करते आहे, आपल्या अधिकाराला आव्हान देते आहे, असा सोपा अर्थ आपण काढतो. कारण, आपल्याला आपल्या आत्मसन्मानाची फिकीर असते. पण तितकीच फिकीर मुलालाही त्याच्या स्वतःच्या आत्मसन्मानाची असते, हे आपण लक्षात घेतले तर मुलाच्या अडचणींचा अदमास येऊ शकेल.*

*सत्ता म्हणजे केवळ अधिकार प्राप्त करणे नव्हे तर सर्वजण परस्परांच्या म्हणण्याचा आदरपूर्वक विचार करतील, अयोग्य वाटणाऱ्या विचाराला आदरपूर्वक नकारही देतील, परस्परांच्या आत्मसन्म ानाची जपणूक करण्याचे धैर्य प्रत्येकात असेल असा समाज निर्माण करणे.*

मुलांच्या वयाच्या टप्प्यांनुसार त्यांच्या शारीरिक, मानसिक गरजा, क्षमता, वैशिष्ट्यं बदलत असतात. एका जागी सलग बसून एकाग्रतेने अभ्यास किंवा एखादे काम करणे, काही गोष्टींची विशेष आवड असणे, काही कृतींकडे विशेष कल असणे, समवयस्कांबरोबरचे नाते बदलत जाणे... अशा बाबींचे महत्त्व आणि माहिती शिक्षक व पालकांना असणे फार आवश्यक आहे.

ती पुरेशी नसेल तर मुलांकडून केल्या जाणाऱ्या विविध अपेक्षा अनुरूप असण्याऐवजी अवाजवी व अनाठायी ठरू शकतात. त्यातून मग मुलांचे वागणे मोठ्यांच्या दृष्टिकोनातून 'शिक्षेयोग्य' ठरते.

म्हणूनच 'मुलांचा शारीरिक, भावनिक विकास', 'बहुविध बुद्धिमत्ता' ही संकल्पना व तिचे महत्त्व तसेच 'शिक्षा आणि मेंदू यांचा सहसंबंध' अशा प्रकरणांमध्ये याबद्दल सखोल माहिती वाचायला मिळते. याच्या जोडीला अर्थातच 'शिस्त रुजवण्यासाठी लागणाऱ्या सकारात्मक पद्धती व तंत्रे' अगदी नेमकेपणाने स्पष्ट केली आहेत. ती वाचून 'आपणही ती आत्मसात करू शकू' असा विश्वास वाचकांना वाटेल.

शिक्षांना हमखास कारणीभूत ठरणारा एक विषय म्हणजे लैंगिकता. हा व्यापक विषय असल्याने यावर सविस्तरपणे व सखोलपणे ऊहापोह करणारे एक संपूर्ण प्रकरणच आपल्याला पुस्तकात वाचायला मिळते. वयानुसार बदलणारे लैंगिकतेचे पैलू प्रौढांनी समजून घेतले व याबद्दल मुलांशी अगदी लहानपणापासूनच सुसंवाद ठेवला तर मुलांची दृष्टी निकोप होऊन त्यांचे वर्तन जबाबदारीचे व सुरक्षित ठेवण्यास मदत होऊ शकते.

यातील एक खास आणि मुलांच्या दृष्टीने अत्यंत उपयोगी प्रकरण म्हणजे वर्गसभा– एक परिणामकारक पद्धती. यामधून निर्णय प्रक्रियेत मुलांना सहभागी करून घेतल्यामुळे मुलांच्या अनेक क्षमता विकसित होताना दिसतात, जसे की नियम पाळणे, प्रश्न सोडवणे, सहकार्याने गटकार्य करणे, एखाद्या गोष्टीचा एकांगीपणे विचार न करता विविध बाजूंनी विचार करणे, आदरयुक्त संवाद साधणे, विचार मांडणे व इतरांचे विचार ऐकून घेणे, आत्मसन्मान वाढणे इ.

यामुळे प्रौढांना भेडसावणाऱ्या मुलांबाबतच्या अनेक समस्या निवारण्यासाठी ही पद्धत उपयुक्त ठरते. वर्गसभा तंत्राचा शिकून केलेला वापर निश्चितच परिणामकारक आहे, हे प्रयोगातून सिद्ध झाल्याचे दिसते.

वर्गसभेबद्दल पुस्तकात असलेल्या एका शिक्षिकेच्या अनुभवाच्या आशयाचा येथे आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. त्या सांगतात, 'मुलांबरोबर या पद्धतीतून काम करताना सुरवातीला थोडे जड गेले. पारंपरिक पद्धतीला तडा देऊन समानतेवर आधारित नवीन संकल्पना आधी व्यक्ती

म्हणून स्वत: रुजवणे सोपे मुळीच नव्हते. पण जसजशी मी ही पद्धत आत्मसात करू लागले, तसतसे माझेच विद्यार्थी मला नव्याने उलगडू लागले. मूल वाचता येणं म्हणजे नक्की काय, हे या प्रक्रियेमुळे मला कळले. मुलांबरोबरचे वेगळे नाते निर्माण झाले, जे आदर, प्रेम, समानता यावर आधारले गेले आणि कायमस्वरूपी या नात्याची वीण घट्ट रोवली गेली. शिक्षक म्हणून तर मी समृद्ध होत गेलेच पण वैयक्तिक जीवनातही मी तरल, संवेदनशील होत असल्याची जाणीव मला पावलोपावली होत आहे.'

**Children need love, especially when they do not deserve it.**

**- Harold Hulbert**

प्रत्येकाला स्व-तंत्राने; पण त्याच वेळी जबाबदारीने अर्थपूर्ण जगता आले, तर आनंदी व समाधानी आयुष्य जगता येईल. यातूनच आनंदी, भीतीमुक्त व निकोप, सुदृढ समाजाची निर्मिती शक्य आहे. हिंसामुक्त व भीतीमुक्त जीवन जगण्याचा प्रत्येक मुलाचा अधिकार आहे, तो त्याला मिळावा यासाठी 'अभय अभियान' प्रयत्नशील आहे.

'मुलांच्या सहभागातून शिस्त : एक प्रयोग' हे शिक्षक-पालकांनी तर निश्चितच पण सर्व प्रौढांनी वाचावे, अनुसरावे व संग्रही ठेवावे असे पुस्तक आहे. ते मिळवण्यासाठी व अभय अभियानामार्फत घेतल्या जाणाऱ्या विविध कार्यशाळांच्या माहितीसाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावा ही विनंती.

**अभय अभियान समन्वयक :**
९६८९०९७०२० / ८२०८४३४५६६
*abhaya.abhiyaan@gmail.com*

***गौरी देशमुख***, *पुणे*
*gaurindu@gmail .com*
***कल्याणी सोहोनी***, *पुणे*
*sohonikalyani@gmail .com*

(पान ११ वरून)

करण्यात आलेली हत्याच आहे, अशी प्रतिक्रिया सर्वत्र व्यक्त झाली. ही घटना भारताच्या लोकशाहीवर कलंक आहे; केंद्र सरकार आणि त्याच्या हाती एकवटलेल्या साऱ्या यंत्रणा यांच्याद्वारे सर्व लोकशाही संकेत पायदळी तुडवले जात आहेत; त्याचा निषेध करावा तेवढा थोडा आहे, अशी तीव्र भावना व्यक्त झाली. भारत सरकार आणि एनआयएसारख्या त्याच्या यंत्रणांचे क्रौर्य याचे बळी ठरलेल्या फादर स्टॅन यांच्या मृत्यूचा शोक व आक्रोश केवळ देशभरातूनच नव्हे तर जगभरातून व्यक्त झाला. शेकडो ठिकाणी उत्स्फूर्तपणे विरोध प्रगट झाला. भारत सरकारचे लोकशाहीविरोधी फॅसिस्ट रूप जगाच्या वेशीवर टांगले गेले. आज फादर स्टॅन यांच्या कार्याबद्दल जाणून घेण्यासाठी जगभरातले संवेदनशील लोक उत्सुक आहेत. कॉर्पोरेट्सच्या नफेखोरीसाठी आदिवासी-दलित-ग्रामीणांवर होणारे अन्याय-अत्याचार आणि त्यांच्यासाठी लढणाऱ्या कार्यकर्त्यांची होणारी मुस्कटदाबी याची वस्तुस्थिती जगाच्या पुढे आली आहे. नोबेल पुरस्कार विजेत्यांसह जगभरातील अनेक मान्यवरांनी निषेध व दु:ख व्यक्त केले. अमेरिकन बार असोसिएशनने भीमा-कोरेगाव केसमध्ये निष्पक्ष सुनावणी व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

खोटे पुरावे तयार करून या आरोपी कार्यकर्त्यांना या प्रकरणात कशा रीतीने गोवण्यात व फसवण्यात आले आहे हे आर्सनलच्या अहवालात स्पष्ट झाले आहे. तरीही ना न्यायप्रक्रिया जलदगतीने चालवली जात आहे, ना कोविडच्या भयावह काळातही, अगदी ज्येष्ठ, वयोवृद्ध कार्यकर्त्या आरोपींनाही जामीन दिला गेला! यूएपीएच्या प्रकरणांमध्येही जामीनाचा अधिकार- जो अलीकडेच दिल्ली उच्च न्यायालयाने अधोरेखित केला- तो संवैधानिक स्वातंत्र्याचा भाग आहे, हे अधिक व्यापक स्तरावर प्रचारित केले जायला हवे. फादर स्टॅन स्वामी यांच्या निधनानंतर का होईना, मुंबई उच्च न्यायालयाने खरी संवैधानिक भूमिका घेऊन या खटल्यातील अन्य सर्व आरोपींची जामिनावर मुक्तता केली, तर ते एक विधायक पाऊल ठरेल.

फादर स्टॅन यांच्या मृत्यूनंतर भीमा-कोरेगाव घटनेसंदर्भातील खोट्या आरोपांमध्ये गोवल्या गेलेल्या आणि तुरुंगवास भोगत असलेल्या कार्यकर्त्यांसंदर्भात मागील तीन वर्षांत पहिल्यांदाच देशातील प्रमुख १० विरोधी राजकीय पक्षांच्या नेत्यांनी पत्र लिहून राष्ट्रपतींचे लक्ष वेधले आणि त्यांच्या सुटकेची मागणी केली. हे उशीरा का होईना, पडलेले योग्य पाऊल आहे. मात्र जोवर यूएपीएसारख्या अन्याय्य कायद्यांच्या विरोधात हे पक्ष ठाम भूमिका घेणार नाहीत, तोवर त्यांच्या विरोधाचा परिणाम फारच सीमित असेल. कारण यूएपीएसारख्या कायद्यांचा गैरवापर हेच तर या सरकारचे हत्यार आहे. त्याद्वारेच भाजप सरकार लोकशाहीची गळचेपी करत आहे. भारतात लोकशाही जिवंत ठेवायची असेल, तर यूएपीए आणि देशद्रोहाच्या अन्य कायद्यांबद्दल सर्व राजकीय पक्षांना स्पष्ट भूमिका घ्यावीच लागेल.

फादर स्टॅन स्वामी गेले... आता ते निर्दोष ठरतील किंवा दोषी ठरवले जातील. पण त्याचं आता काय... पक्षी दिगंतरा गेला आहे...

रांचीतल्या बगैचातल्या त्या शहीद स्तंभावर आणखी एक नाव आता कोरलं गेलं आहे- फादर स्टॅन स्वामी!

फादर स्टॅन स्वामी अमर रहे!

***सुनीती सु.र.***, *पुणे*
*sunitisr@gmail.com*

# कोरोनाचा कळस...!

वैशाली पंडित

**गावकुसाबाहेरच्या शिक्षिकेची ही वेदना कोरोनाकाळात तुमच्या–आमच्या आसपास जे घडत होतं, जे घडत आहे, त्याचंच चिंतन या टिपणातून!**

कदमबाईंनी त्यांची ॲक्टिवा शाळा क्रमांक दोनच्या गेट जवळ गडग्याशी लावली. गडग्यावर मधुमालतीच्या वेलांनी आयताच मांडव घातला आहे. उन्हात ही ॲक्टिवा तरी तापणार नाही.

एरवी कदमबाईंच्या कपाळी उन्हाचा सासुरवास आहेच.

कदमबाईंनी चेहऱ्यावरचा मास्क नीटनेटका केला आणि शाळेत क्वारंटाईनसाठी असलेल्या कुटुंबाचा अंदाज घेतला. त्यातल्या एकाची कार दिसत नाही. 'शीः! गेले हे लोक बाजार भिकांडायला. अकला नाहीत मेल्यांना. मुंबईहून आलात तर राहा ना सरळ विलगीकरणात चौदा दिवस. मरायला बाजारात, गावात जाऊन संसर्गाचे काळ कशाला होताय?'

कदमबाईंचा संताप होता होता. एकतर क्वारंटाईन सुपरवाझर म्हणून प्राथमिक शिक्षकांना सक्तीची ड्युटी लागलेली. ते ही देशकार्यच आहे, मानलं. पण ते करणाऱ्यांच्या सोयी सुविधेकडे, सुरक्षिततेकडे कोणाचंच लक्ष नाही, शिक्षिकांचे हाल तर कोणालाच सांगता येत नाहीत.

कदमबाईंना शाळेच्यासमोर विठ्ठल मंदिराच्या गेट 'बाहेर' खुर्ची टाकून बसावं लागतं. उन्हाची झळ लाहालाहा करते, भाजून काढते... तरी इलाज नाही. सावलीची ठिकाणं नाहीत जवळ. खरंतर मंदिराचा मंडप चारी बाजूंनी उघडा आहे. संगमरवरी फरशांनी आत गार वाटत असेल असं कदमबाईंना अनेकदा वाटलं. पण तो दैवी गारवा मिळण्याची मुभा त्यांना नव्हती. सारे भारतीय माझे बांधव आहेत, हे शाळेच्या मुलांना कदमबाईंनी शिकवायचं मात्र ...बाकी कदमबाईंसारखे लोक 'बांधव' या इयत्तेत बसण्याच्या लायकीचे नसतात. म्हणून तर 'क्वारंटाईन सुपरवायझर' या घसघशीत पदावर नियुक्ती झाल्यावर त्या ड्युटीवर हजर झाल्या, तेव्हा गावकऱ्यांनी मोठ्या आदरपूर्वक त्यांच्यासाठी खुर्चीची व्यवस्था केली होती. हां ! आता ती खुर्ची देवळाच्या बाहेरच ठेवायची दक्षता घेतली होती ते सोडा. कदमबाईंना गाव आणि गावातले लोक काही नवे नव्हते. आजवर जसं चरफडत नोकरी करत आलो तशीच रिटायर्ड होईपर्यंत करायची.

पाण्याची बाटलीही त्या बरोबर आणतात. ती दिवसभरात पुरत नाही पण जास्त पाणी पिणंही मरणच.

सकाळी नऊ वाजल्यापासून संध्याकाळी पाच वाजेपर्यंत ताटकळणी. लघवीला जायचीही सोय नाही. शाळेची मुतारी क्वारंटाईन लोक वापरतात तिथे जाणं म्हणजे मरणाला आमंत्रण! काहींच्या घरात 'कदम' आडनावालाच प्रवेश नाही, तिथे कदमबाईंच्या लघवीच्या सोयीचं दूरच राहिलं. कदमबाईंनी एकदा शाळेच्या मागच्या झाडोऱ्यांत आडोसा शोधायचा प्रयत्न केला; पण तिथे क्वारंटाईनवाल्यांनी पिकनिक पॉइंट केलेला दिसला. तसल्या स्थितीतही सेल्फी काढण्याचा ऊत आला होता.

कदमबाईंना घरी पोचायला साडेपाच वाजायचे. तोवर पोट फुगून वाट लागलेली असते. त्यातून पाळी सुरू असेल तर हाल कुत्राही खाणार नाही. कधी हा कोरोना जाणार कोण जाणे !

कदमबाईंनी दुसऱ्या क्वारंटाईन फॅमिलीला लांबूनच विचारलं, ''ओ, हेंची गाडी खय दिसना नाय ती? गेले खय?''

त्यातल्या एका बाईने पदर तोंडावर धरून कदमबाईंना ओरडून सांगितलं, ''आमका वो काय इचारतास बाईनु? मोटी मान्सां ती! गाडीवाली. गाव झोळाक जातंत नि फिरान येतंत. आमची मरांडी. आमी सगळे नियम पाळतंव. शाळेच्या

गेटाभायर येनंव नाय. माजी दोन पोरा आसंत तीपन भायरा पडनंत नायत.''

खरंच होतं. गाडीवाले गावावर उपकार केल्यासारखेच क्वारंटाईन झालेत. चहा द्या, नाश्ता द्या... नाश्त्याला चिकन समोसेच द्या. नाहीतर हे चाललो आम्ही गावातल्या आमच्या घरात. सरपंचांनी स्वतः त्यांची जबाबदारी घेतली शेवटी; पण तेही जेरीस आलेत या मंडळींपुढे.

क्वारंटाईन लोकांमध्ये एक तरुण आहे. लॅपटॉप घेऊन सारखा काम करत असतो. त्याच्या घरचे लोक एरवी 'आमचो बाबू आफिसर आसा... आमचो बाबू येकदम हायफाय आसा' अशी डिंग मारत फिरत होते. आता बाबूला चहा, नाश्ता घरून येतो; पण ते आणणारा पायरीवर डबे कसेतरी टेकवतो आणि पळून जातो. फटाका लावल्यावर ज्या तातडीने पळतात तसेच अगदी. त्या धांदलीत डबे कधीकधी सांडतातही. बाबू आतून बघत असतो. त्याच्या चेहऱ्यावर उदास हसू असतं... क्वारंटाईनचे दिवस संपल्यावर बाबू घरच्यांशी कसा वागेल, याचं चित्र कदमबाई रेखाटतात आणि स्वतःशीच सुस्कारतात.

'ते भटके गाडीवाले आता आले वाटतं! अरे... पण सगळे देवळात कुठे घुसतायत. आँ?... अरे?'

क्वारंटाईन मंडळी आता देवळात शिरली. आत जाऊन घंटा वाजवल्या. गाभाऱ्याच्या कुलपाला उगाच हलवून बघितलं. दोन्हीबाजूंनी गालावर चापट्या मारत नमस्कार चमत्कार झाले. प्रदक्षिणा झाल्या. गारशा फरशीवर मंडळी बसकण घालून बसली. तिथेही सेल्फ्या झाल्या.

कदमबाईंनी हवालदिल होत सरपंचांना मोबाईलवर सगळी बातमी दिली. ग्रामपंचायत सदस्य, सरपंच आणि दोन पोलीस तातडीने मास्कसह देवळाजवळ आले.

क्वारंटाईन मंडळींना बाबापुता करून आधी बाहेर काढलं. त्यांना शाळेत पिटाळलं. त्यांना आपला स्पर्श होऊ नये म्हणून जो तो सांभाळून होता. चेहऱ्यावर तीव्र तिरस्कार होता.

एव्हाना गावकरीही आले. सगळं देऊळ सॅनिटाईझ केलं. फिनेलने फरशा पुसून घेतल्या. सरपंचांनी गाभाऱ्याला कुलूप असल्याची खात्री केली. मंडपाला कुलूप शक्यच नव्हतं.

कदमबाई बाहेरूनच सगळं बघत होत्या. सरपंच सदस्यांशी बोलत होते, ''हय ता डोक्याक ताप झालो हा. मुंबयवाले ईले तेंनी अगदीच ताळतंत्र सोडल्यानी हा. हेंका समाजना नाय मेल्यांका? आपूनव मरतले आन् आमकाव मारतले.''

कदमबाई अलिप्तपणे ड्युटी करत खुर्चीवर बसल्या होत्या. क्वारंटाईन. आपल्याला कुठे नवं आहे विलगीकरण? आपण कायमच गावकुसाबाहेर. भीमबाबा, जोतिबा, सावित्री... सगळ्यांनी हयात वेचली आपल्यासाठी! कदमबाईंनी नेहमीसारखाच हा कडवटपणा घशात रिचवला. बाई भानावर आल्या.

सरपंचांनी कदमबाईंना हाक म ारली होती. सगळेजण तिथे उभे होते. ''कदमबाईंनु, आजपासून देवळात कोणीही प्रवेश करणार नाही याची जबाबदारी तुमची. देवळात फक्त कदमबाईच येतील. तुम्ही इकडे आत खुर्ची टाकून बसा. सदानंद, बाईंसाठी एक पाण्याचा मडक्या ठेव भरून. बाईनु, काय लागलं तर बिंधास सांगा. घर जवळच आहे माझं.''

'देवळात फक्त कदमबाईच येतील' या वाक्याने कदमबाई उभ्या शहारल्या...

भीमबाबा, सावित्रीमाये, जोतिबा, तुम्ही ऐकलंत ? तुमच्या या लेकीलाच फक्त मंदिरप्रवेश!

कोरोनाने हवेत गेलेल्या पायांना जमीन दाखवली म्हणायची! आता माणूस हीच आपली ओळख? कदमबाई चपला काढून आत गेल्या. आजवर बाहेरून बघितलेला फरशीचा गारवा त्यांच्या तळव्यांना कुरवाळत होता. इथून समोरची शाळा स्पष्ट दिसते आहे. कदमबाई कमरेवर हात ठेवून तिकडे बघत आहेत. ड्युटी करत आहेत. क्वारंटाईंनांवर नजर ठेवून आहेत.

गाभाऱ्यातूनही कोणीतरी कमरेवर हात ठेवून कदमबाईंवर नजर रोखते आहे. कदमबाईंच्या डोईवरच्या उन्हाच्या झळा आता मंदिराच्या कळसाने वरचेवर झेलल्या आहेत.

कोरोनाने कळस गाठला आहे..!

***वैशाली पंडित***

*मिळून साऱ्याजणी प्रतिनिधी, मालवण*

---

(पान १७ वरून)

झाली आहे. देशातील अशा वातावरणात स्त्रियांना घरात डांबले जाते आहे. स्त्रियांवरची बंधने वाढत आहेत. संस्कृती रक्षणाच्या नावाने तरुण तरुणींवर बंधने घातली जात आहेत. स्त्री कोणत्याही धर्माची असो सहिष्णुता आणि शांततेच्या वातावरणातच ती निर्भयपणे जगू शकते. सर्व धर्मियांच्या ऐक्याने स्त्रीमुक्ती चळवळीला बळ मिळते. महाराष्ट्रातील परित्यक्ता स्त्रियांची चळवळ ही धर्मनिरपेक्ष चळवळ आहे. या चळवळीला इंदूताईंनी विचार दिला सामर्थ्य दिले. क्रांतिवीरांगणा इंदूताईंच्या नावाने आपण मला दिलेल्या पुरस्काराने लोकशाही समाजवाद, धर्मनिरपेक्षतेसाठीच्या संघर्षासाठी मला मोठीच ताकद आणि ऊर्जा मिळाली आहे.

आपल्या सगळ्यांचे पुन्हा आभार मानते. जिंदाबाद

***निशा शिवूरकर,*** *संगमनेर*

# शब्दांकित : काही कडू, काही गोड !

आशा साठे

**लॉकडाऊनच्या काळात सुरू झालेल्या सखी साऱ्याजणीच्या एका अनोख्या व्हॉट्सॲप ग्रुपबद्दल. बदलाची प्रक्रिया ही अशा छोट्या छोट्या पातळीवरच घडून यावी लागते, हे अधोरेखित करणारा हा लेख.**

५ सप्टेंबर २०२० ह्या दिवशी हा एक नवा प्रयोग सुरू केला. सखी साऱ्याजणीच्या व्हॉट्सअप ग्रुपमध्ये मी काही पोस्ट्स टाकत होते. त्या काही जणींना खूपच आवडायच्या. बहुतेक लिखाण साहित्य संदर्भातलं होतं. मग असं नेहमी शेअर करावं वाटलं. नीना, स्मिता, आसावरी आणि अनेकींना वाटलं. माझी तयारी होती. पण सखी साऱ्याजणीची जागा वापरण्यापेक्षा स्वतंत्र ग्रुप करावा असं ठरलं आणि प्रथम फक्त तीन महिन्यांसाठी प्रयोग करू म्हणता म्हणता आता वर्ष झालं ग्रुपला!

ग्रुपमध्ये सुरुवातीला मी माझ्या मनाशी काही उद्देश निश्चित केले होते. ३० जानेवारी २०२०ला विद्याताई गेल्यानंतर एक संवादाची पोकळी मला जाणवत होती. संवादासाठी सतत त्या साद घालत. त्यातून अनेक उपक्रम उभे राहिले. अर्थपूर्ण जगण्यासाठी न्याय, स्वातंत्र्य, समता, मैत्री, सौंदर्य, प्रेम अशी मूल्यं जपायला हवीत, अशी त्यांची धारणा होती. समाजाशी नातं ठेवण्याचं महत्त्व त्यांना फार वाटे.

मला वाटलं, माझ्या साहित्यप्रधान संवादातून 'शब्दांकित'मधून संवाद चालू करून त्यांना अभिवादन करू या. 'साऱ्याजणी' शब्दाला त्यांनी एक वेगळा अर्थ दिला आहे. तेव्हा ग्रुपमध्ये येण्यासाठी ती किमान अट होती आणि त्यामुळे ज्यांचा परिचय झाला, अशा सखी साऱ्याजणी आणि इतर मैत्रिणी यांचा हा 'शब्दांकित' ग्रुप तयार झाला. नीना, रेखा, स्मिता आणि मी ॲडमिन आहोत. पूर्वी मी माझ्या काही मैत्रिणींसह 'शब्दांकित' नावाचा ग्रुप स्थापन केला होता. चांगलं साहित्य चांगलं माणूस घडवतं म्हणून ते लोकांपर्यंत विविध उपक्रमातून आम्ही पोचवत असू. 'निजखूण', 'चंद्र माझा', 'तिची कहाणी', 'कथा सानेगुरुजींची' हे त्यातले गाजलेले कार्यक्रम. शिवाय, सुट्टीत मुलांची शिबिरं. 'शब्दांकित'चं स्वरूप कधीच व्यावसायिक नव्हतं. ती साहित्यातून चांगलं माणूस घडविण्याची एक चळवळ– चळवळ शब्द मोठा होईल– उपक्रम होता.

तर ५ सप्टेंबर २०२० पासून व्हॉट्सॲप ग्रुप स्वरूपात हा नवा प्रयोग. कोरोनामुळे प्रत्यक्ष भेटणं शक्य नव्हतंच. अजूनही नाहीच! ग्रुपमध्ये काही सभासद आले – गेले तरी सरासरी ४०/४५ पेक्षा कमी संख्या कधीच झाली नाही.

आतापर्यंत वर्षभरात जे विषय झाले, त्यापैकी काही असे– प्रार्थना, निजखूण, चंद्र माझा, स्त्रियांची आत्मचरित्रं, मराठी नाटकातील स्त्री, प्रेम, स्नेहसंक्रांत, संकल्प, मातृभाषा, वाचन, लोकशाही, दिवाळी, मिळून सारेजण, एकटेपण, कथा, कविता यांवर आधारित अनेक विषय, टागोर, ह. ना. आपटे, कुसुमाग्रज, खलील जिब्रान, दिवाकर, गदिमा, सानेगुरुजी, आगरकर, केशवसुत, बहिणाबाई... यादी खूप मोठी आहे.

ग्रुपमधील इतरांनी काही विषय सादर केले. त्यात तुकाराम, अनुवाद, शेतीचे प्रयोग, आहार, नाटक, इतर प्रांतातील स्त्री–विश्व, बोनसाय, वारी, पंडित नेहरू, विवेकनिष्ठ विचारपद्धती असे विविध विषय होते. 'मिळून साऱ्याजणी'च्या वाटचालीवर दर महिन्यात आवर्जून एकदा चर्चाही झाली. ह्या सगळ्याबरोबर काही कडू गोष्टींना सामोरं जावं लागलं. त्यातलं मुख्य म्हणजे विषयांतर! कधी राजकीय विषयांची घुसखोरी. मुख्य आपल्या विषयाशी, विचारसरणीशीच विरोधी मतप्रदर्शन, त्यातला आंधळा भक्तिभाव. त्याला प्रोत्साहन नाही देता येत. वैचारिक विरोधी मांडणीचं स्वातंत्र्य आहेच, पण... असो, एकदा त्यासाठी पंधरा–वीस दिवस ग्रुप बंद केला. त्यामुळे नाराज होऊन काहींनी व्यक्त होणंच बंद केलंय. पण ग्रुप

(पान ५१ वर)

(पान ९ वरून)
की, बाई गं, तुला मेक्सिकोत चांगली मॅनेजरची नोकरी असताना तू इथे का बरं आलीस? नवरा बाहेरख्याली होता, हे तुला तेव्हाही माहीत होतं. (नंतर त्यांचा घटस्फोट झाला.) मेक्सिकोत राहणं एवढं असुरक्षित आहे का?

तर करिना म्हणाली, 'मी इथे राहून लोकांची घरं साफ करते ते, मेक्सिकोतल्या मॅनेजरच्या नोकरीपेक्षा जास्त सुरक्षित आहे. माझ्या डोक्यावर छप्पर आहे, ताटात चांगलं अन्न आहे, घरात वाहतं पाणी आहे. मी स्वाभिमानाने जगते आहे. कोणीतरी लुटारू येऊन बळजबरीनं माझं घर ताब्यात घेईल, मी कितीही कष्ट केले तरीही मी गरिबीतच जगेन, माझ्या मुलांना मी चांगलं शिक्षण देऊ शकणार नाही, त्यांच्या आजूबाजूला कसे लोक असतील याच्यावर माझे नियंत्रण राहणार नाही. – इतके सगळे नकार जिथे आहेत तिथे मी का राहू –जेव्हा की केवळ काही फुटांवर स्वर्ग आहे!'

मला करिनाच्या साध्या–सरळ स्पष्टीकरणामुळे अंतर्मुख व्हायला झालं. स्वर्गाची व्याख्या किती सोपी! जगण्याचे नियम किती साधे, सरळ; पण नैतिकता, सौजन्य, शांतिप्रियता यांच्या चौकटीत बसणारे! मी स्वतः जेव्हा अमेरिकेचं नागरिकत्व घेतलं, तेव्हा मला फार वाईट वाटलं होतं. पण मला हेही कबूल करावं लागेल की भारत आणि अमेरिका या दोन्ही देशांबद्दल मला सारखीच आस्था आहे. मग स्वदेशाचा अर्थ काय? व्होल्टेयर (Voltaire) म्हणतो की, देशप्रेम ही भावना माणुसकीला हानिकारक आहे. देशभक्त डॉ. खानखोजे यांची कर्मभूमी मेक्सिको होती जिथे त्यांना अतिशय आदराने, मानसन्मान देऊन वागवण्यात आले. डॉ. खानखोजेंनाही भारतापेक्षा मेक्सिकोत काम करणे जास्त आवडले. मग स्व–देश म्हणजे काय?

याचे उत्तर 'The Hindu view of life' (पान ६६) या सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या पुस्तकात नकळत, अचानक मिळाले. त्यांनी लिहिलेय की,

No country belongs to itself. The needs of the world are the paramount consideration. .... there is no easy solution to the racial problems. ... They can be solved only by the consciousness of the earth as one great family and an endeavour to express this in all our relationships.

देश हा केवळ तिथे राहणाऱ्या लोकांचा नसतो... आपल्या भोवतीच्या जगाच्या गरजा या नेहमी महत्त्वाच्या समजायला हव्या. (जगाच्या काही भागात गुदमरवणारी लोकसंख्या आहे तर कुठे मैलोगणती माणूस दिसत नाही.) वर्णभेदामुळे निर्माण होणाऱ्या जाचक समस्यांवर सहज तोडगा निघणे अशक्य; पण 'हे विश्वची माझे घर' हे तत्त्व सर्वांनी अंगिकारले आणि आयुष्यातील प्रत्येक नात्याचा, अनुभवाचा, या तत्त्वानुसार अंगिकार केला तरच हे प्रश्न सुटतील.

सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी त्यांचा हात आशीर्वादपूर्वक माझ्या मस्तकी ठेवला, असं मला वाटलं. माझ्या मनातली घालमेल नाहीशी झाली. आपण या जगाचे नागरिक आहोत; केवळ एका देशाचे नाही. आजच्या आधुनिक जगात एखाद्या देशाचा टिळा लावणं, हे राजकीय आणि व्यवस्थापनाच्या दृष्टीनं आवश्यक आहे.

करिनाची रोचक कर्मकहाणी आणि राधाकृष्णन यांचे संस्करदायी विचार यांची माझ्या मनात सांगड पडली. अमेरिकन नागरिकत्वाचा अर्थ जागतिक दृष्टिकोनातून कळला. No country belongs to itself- ह्या वाक्याने जणू काही मला नवीन अशी दिव्यदृष्टी दिली. जगाच्या नकाशातील रेषा वितळून सर्व जग एकसंध झालं. भारत, अमेरिका या पुड्यांमध्ये बांधलेला माझा जीव मुक्त झाला. माझ्यातील चैतन्य बाहेर झेपावून जगाच्या चैतन्याशी एकरूप झालं, असं क्षणभर का होईना मला वाटलं. सह्याद्री जितका माझा तितकाच तो करिनाचा पण आहे; मला आवडणारी ऱ्हाईन (Rhine) नदी परकी नसून गंगेइतकीच जवळची आहे. हे जाणवून मला वाटलं की, ही वैचारिक प्रक्रिया पसायदानाच्या वैश्विक प्रार्थनेचाच भाग आहे.

मी जरी कुणी राजकारणी किंवा इकॉनॉमिस्ट नसले, तरी मेक्सिको ह्या देशाची आजची स्थिती म्हणजे अमेरिकेच्या अजस्त्र अर्थकारणाची पडलेली अक्राळविक्राळ सावली तर नव्हे असा विचार मनात नेहमी येतो. आपणसुद्धा या अराजकाला capitalismचा भाग म्हणून अगदी कणभर का होईना जबाबदार असू, अशी एक टोचणी मनाला लागलेली असते. अशा वेळी असं वाटतं अमेरिकेनं, करिनासारख्या व्यक्तींनी काबाडकष्ट करून भरलेला 'कर' करी धरून म्हणावं, 'Mi casa, su casa'– माझं घर हे तुझं घर आहे आणि त्यांच्या अनिश्चितीमध्ये जगणाऱ्या मुलांना कुशीत घ्यावं. Immigration ought to be legal, असं ठासून सांगणारी मी आजकाल माझ्या संकुचित विचारांना मागे टाकून No country belongs to itself, असं विधान करते. जरी मी खुद्द ॲरिझोना– मेक्सिको बॉर्डरवर हजर नसले तरी विचारांच्या सामर्थ्यावर माझा विश्वास आहे. मेक्सिकोच्या मळ्यातून जीवावर उदार होऊन अमेरिकेच्या तळ्यात येण्याचा अवैध प्रयत्न थांबू दे, मेक्सिकोमधील अराजक संपू दे, पसायदानाच्या लहरी या दोन देशांमध्ये उमटू दे हेच लोकनारायणा जवळ मागणे!

***भाग्यश्री बारलिंगे***, *मेसा, ॲरिझोना*
*bcbarlingay@gmail.com*

# कविता

## भोगवटा

काय भय असतं पाहा
अभयारण्यात सुरक्षित नि सुस्त बसलेल्या या वाघाप्रमाणे
इथली संख्या वाढून
त्याला स्थलांतरित करण्याच्या
तयारीला लागलेल्या कर्मचाऱ्यावर
गुरगुरत आहे हा वाघ
मातृभूमी ऊर्फ कर्मभूमी
सोडावा लागल्या धास्तीनं हा
बिथरून थरथरू लागलाय
किती केलं तरी
जावंच लागेल याला येथून
'एक्सेस' नियमानुसार जिथे टाकलीय तिथे
सरकारी कर्मचाऱ्याप्रमाणे
प्रश्न इतकाच...
तेथला भोगवटा कसा असेल?

***एच. ए. पाटील***
*श्री बालशिवाजी वाचनालय,*
*मु. पो. येळ्ळूर, ता. जि. बेळगाव*

## बाईचं जगणं

पोस्टमार्टेम टेबलावरील लाश
आणि
भोवताली धारदार शस्त्रांसह
सज्ज असलेले हात..
तसंच बाईचं जगणंही!
कायम
छोट्यामोठ्या गोष्टींचं
सक्तीचं पोस्टमार्टेम
ठरलेलंच..
फरक एकच
पोस्टमार्टेम
मृत्युनंतर केलं जातं
तर
बाईचं मात्र जिवंतपणीच
प्रत्येक क्षणाला!

***ज्योती कदम, नांदेड***
*मोबाईल : ९६०४४६६६९६*

## या जगण्याची कथा

आभाळाएवढं व्हावंसं वाटतं
कळ मातीची ढगांना
सांगावीशी वाटते
कोमेजलेल्या हातांवर
मी स्वप्नसुख धुंडाळतो
माय चुल्हीवर पोटाचं
भातकुल भाजते
या जगण्याची कथा
कोणा सांगावीशी वाटते
फळ्यावरचं गणित
डोस्कच फिरवतं
बा होतो कासावीस
डोळ्यात पाणी येतं
चातकागत मन
आभाळात नेतं
तरी माय म्हणे उंबरठा
जाय ओलांडून
सगळ्यांसाठी सुखी तू
संसार आण!

***ज्ञानेश्वर बाविस्कर***
*ता. धामनगाव, जि. जळगाव*
*मोबाईल : ९९२३५२१४४२*

१ ऑक्टोबर
ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त

## जर....

जर मी जगलेच सत्तर वर्षे....
तर लिहिन एका म्हाताऱ्या परीची
कथा...
कुणाला आवडो न आवडो...
त्यात असेल एक गाव....
परीकथेतला....
आजोबा म्हणायचे,
तुम्ही काहीही सांगाल, आम्हाला खरं
वाटलं पाहिजे ना?

परी सांगेल तिची खरीखुरी कहाणी,
परीकथेत असतील इतरही पऱ्या,
यक्ष, जादूच्या छड्या, चेटकिणी,
घडेल काही आक्रित,
नियती वाचवेल प्रत्येकवेळी परीला.....
परीला पडतील स्वप्न....अगदी
साधीसुधी....
ती खेळेल भातुकलीचा खेळ
बाहुला बाहुलीचे लग्न ही लावेल....

ती हरवेल कधी जंगलात, कधी
गर्दीत....
तिला सापडणार नाहीत हवे ते रस्ते...
ती रस्ता चुकेल, रडेल,
दुखेल, खुपेल तिलाही...
ती सहन करेल तोंड दाबून बुक्क्यांचा
मार...

आयुष्यात प्रत्येक गोष्ट मनाविरुद्धच
घडणार आहे,
हे माहित असूनही,
ती लावेल पत्त्यांचे
नवे नवे डाव आणि हरत राहील
वारंवार!

परी सांगेल तिची खरीखुरी कहाणी,
गाईल गाणी,
खेळेल ऐलोमा पैलोमा....

ती करेल स्वयंपाक, थापेल भाकरी,
कधी सुगरण असेल ती तर कधी
करपेल तिचा भात, पोळी कच्ची राहिल,
आडाचं पाणी काढायला जाताना...
तिचे पडतील ही दोन दात...
केस पांढरे होतील, सुरकुत्या पडतील
चेहऱ्यावर.....
परी म्हातारी होईल, तरीही तिला
काढावसं वाटेल आडाचं पाणी....
कुणी म्हणेल ही सहजपणे....
धप्पकन पडली त्यात
ती पडेल आडात, पाण्यात की
खडकावर माहित नाही...
तिने हातात गच्च धरून ठेवलेला
शिंपला पडेल त्याच आडात...

आणि आजूबाजूच्या फेर धरणाऱ्या
तरुण पऱ्या म्हणतील....
आडात पडला शिंपला... तिचा खेळ
संपला!

जर मी जगलेच सत्तर वर्षे तर लिहीन
एका म्हाताऱ्या परीची कथा...
जी आली होती जन्माला बाईच्या
जातीत... आणि मेली ही बाई
म्हणूनच!

आणि ही कथा तुम्हाला नक्कीच खरी
वाटेल
परीकथा असूनही..

***प्रभा सोनवणे,*** *पुणे*
*मोबाईल : ९२७०७२९५०३*

पुरुषभान जागवताना...

## संधीसाधू

आज
दिवसा–उजेळी
भर रस्त्यावर,
चौका–चौकात
टपलेली असते तिच्यावर
पापी नजरेची दुर्बीण..

कॉलेजच्या आवारात
फिरत असतात
तिची साईज मोजणारे
असंख्य डोळे..

बस–रेल्वे स्थानकावर
भिरकावत असतात अनेक जण
तिच्यावर पापी नजरा..

रेल्वेच्या जनरल डब्यात चढताना
अथवा
गर्दीच्या ठिकाणी
अनेक वासनांध संधीसाधू
तिला खेटून
करून घेतात संधीचे सोने..

मग तिने
फिरणेच सोडून द्यावे का ?

***तुषार पाटील निंभोरेकर,*** *जळगाव*
*मोबाईल : ७७२१८६६६३२*

# सुमित्राताई नावाचं 'शांत वादळ'

सविता मोहिते

**कराड येथे कार्यरत असणाऱ्या सविता मोहिते यांचं सुमित्रा भावेंविषयीचं हे हृद्य मनोगत.**

सुमित्राताईंचा कोल्हापूरला सत्कार झाला होता आणि त्या निमित्ताने लोकमतमध्ये त्यांची एक मुलाखत छापून आली होती. त्याला आता बरीच वर्षं झाली. पण त्यातून मला त्यांच्याबद्दल माहिती मिळाली आणि न भेटताच त्यांच्याशी मैत्रीही झाली. पुढे त्यांच्यासंबंधी खूप सारी माहिती गूगल आणि यूट्यूबवर मिळाली. मी त्यांच्या प्रतिभेने अक्षरक्षः भारावून गेले. त्यांची भेट घेण्याच्या कल्पनेने मला अगदी पछाडून टाकलं. खरं म्हणजे त्या डॉ. अनिल अवचट यांच्या अगदी जवळच्या मैत्रीण आणि बाबाची व माझीही दाट मैत्री. पण तरीही भेट काही झालीच नाही. आणि मग आला गीतालीताईंच्या भेटीचा योग! म्हणजे अगदी पहिल्याच भेटीत कराड ते पुणे एकत्र प्रवास आणि अविरत गप्पा असा तो अविस्मरणीय संयोग. गीतालीताईंमुळेच माझी सुमित्राताईंची भेट झाली. सुमित्राताईंच्या त्या पहिल्या भेटीवेळची माझी मानसिक अवस्था मला शब्दात वर्णन करता येणार नाही; पण इतकंच म्हणेन की माझ्या आयुष्यातील तो एक अविस्मरणीय दिवस होता आणि आहे.

मी त्या दिवशी सकाळी त्यांच्या घरी गेले होते. त्यांना माझ्या स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून कार्यरत असतानाच्या आणि इतर सामाजिक क्षेत्रात सहवासात आलेल्या तीन ते चार ग्रामीण महिलांच्या कथा ऐकवल्या. ह्या महिलांची धडपड, जिद्द, चिकाटी आणि 'नेव्हर से नेव्हर डाय' हा ॲटिट्यूड मला कसा नेहमीच अचंबित, प्रभावित करतो आणि त्यापैकी एका कथेवर मला लघुपट बनवायचा आहे, याबद्दल मी त्यांना सांगितलं. त्यातील त्यांना कोणती कथा भावली हे विचारून त्यावर आणि इतर अनेक विषयांवर आमच्या गप्पा झाल्या. त्यात स्त्रीवादी चळवळ, सिनेमाचं तंत्रज्ञान, सामाजिक प्रश्न अशा अनेक विषयांवरच्या चर्चा रंगल्या आणि दुपारचे बारा कधी वाजले हे कळलंच नाही. त्यांची जेवणाची वेळ झाली होती. मलाही त्यांनी आग्रहाने जेवू घातलं. पहिल्याच भेटीत मी त्यांच्या घरी जेवूनही आले! हे सर्व कल्पनेच्या पलीकडचंच होतं. त्यांच्याप्रमाणेच जेवणही एकदम सात्त्विक! जेवणानंतर आवराआवरी करताना दिसलं ते त्यांचं अगदी नीटनेटकं, स्वच्छ स्वयंपाकघर, फुलांनी आणि झाडांनी बहरलेली त्यांची बाल्कनी. निरनिराळ्या ठिकाणाहून गोळा केलेल्या त्यांच्या सुबक अशा देखण्या वस्तूंनी त्यात टाकलेली भर आणि घरातील सगळ्याच गोष्टींना असलेला एक आकर्षक, आत्मीयतेचा स्पर्श! त्यांच्याबरोबर बोलत बसले होते, तेव्हा त्यांच्या पलीकडचं हे काहीच नजरेस पडलं नव्हतं. डोळ्यासमोर आणि मनःचक्षूंपुढे केवळ त्याच भरून राहिल्या होत्या.

त्यांनी मला त्यांच्या अनेक चित्रपटांच्या संहिता लिहिलेल्या फाइल्स दाखवून संहिता कशी लिहायची याचं प्रात्यक्षिकच दिलं. अशी बरीच चर्चा, माहिती दिल्यानंतर त्या आत जाऊन एक पेन ड्राइव्ह घेऊन आल्या आणि तो टीव्हीला जोडून त्यांच्या अजून प्रदर्शित न झालेल्या सिनेमातील– 'वेलकम होम'मधील सीन्स दाखवायला सुरुवात केली. त्यात दिसणाऱ्या प्रत्येक गोष्टीचं महत्त्व, त्याची गरज हे सर्व समजावून सांगत माझं एक बौद्धिकच घेतलं. तिथे बसून मी अगदी मंत्रमुग्ध होऊन त्यांचा शब्द न शब्द मनात कोरून ठेवण्याचा प्रयत्न करत होते. त्यांचा बोलण्याचा ओघ थांबतच नव्हता; पण विश्रांतीची वेळ झाली असेल असं म्हणून मग मी आवरतं घेण्याचा विचार केला आणि

परत भेटण्याचं आश्वासन घेत, त्यांचा निरोप घेतला.

आतापर्यंत आयुष्यात प्रेम, आत्मीयता, राग, असहायता अशा अनेक भावनांचा अनुभव गाठीशी होता; पण भक्ती कशाला म्हणायचं ते मला त्या दिवशी अनुभवायला मिळालं. त्यांना चरणस्पर्श करून मनात भक्तिभाव आणि डोळ्यात तरळणारं पाणी घेऊन मी घरी पोचले.

दरम्यान, मनात हा भक्तिभाव तरळतच होता आणि अचानक खुद्द कराडमध्येच एका कार्यक्रमाच्या निमित्ताने त्यांच्या भेटीचा दुसरा योग आला. 'कासव' आणि त्यांचे इतर काही चित्रपट पाहून त्यांच्यासमवेत थेट चर्चासत्राच्या कार्यक्रमात! माझ्याप्रमाणे सर्वच जण त्यांच्या कलात्मक दृष्टिकोन, बौद्धिक झेप, त्यांच्या क्षेत्रात त्यांनी गाठलेली उंची आणि तरीही त्यांचं साधेपण या सगळ्याने भारावून गेले होते. प्रश्नोत्तराच्या कार्यक्रमानंतर प्रत्यक्ष भेट झाली; पण त्यांच्या भरगच्च कार्यक्रमामुळे घरी काही नेता आलं नाही.

आणि मग २२ मार्च २०२० पासून सगळे आपापल्या घरात बंदिस्त झाले. पण निर्मितीशील माणसाला कुठे असतं भिंतीचं किंवा तारेचं कुंपण? त्यांची क्रियाशीलता लॉकडाऊन असो वा नसो – आकाशात भरारी घेतच असते. ताईंचंसुद्धा घरात बसून अनेक प्रकल्पांवर काम चालूच होतं; पण ह्या संधीचा फायदा घेऊन मी मात्र दर पंधरा–वीस दिवसांनी फोन करून त्यांच्याशी बोलत राहिले, याबद्दल मला अतिशय समाधान आहे.

भेटीची वाट बघून शेवटी मी त्यांना म्हटलं, ''संहिता वाचनाचा राहू दे. ते होईल तेव्हा पाहू; पण मी तुमचं एखादं चित्रीकरण बघायला आले तर चालेल का?'' तर लगेच त्यालाही परवानगी मिळाली. त्या म्हणाल्या, ''मेमध्ये सिनेमाचं चित्रीकरण चालू होईल ते बघायला ये. माहितीपटापेक्षा ते बघायला तुला जास्त मजा येईल.'' मे महिन्याची वाट बघता बघता असाच एकदा फोन केला तर निरोप मिळाला की तब्येत बरी नसल्यामुळे एक महिनाभर त्या विश्रांती घेत आहेत. त्यानंतर फोन घेतील. न राहवून दुसऱ्याच दिवशी मी फोन केला. सोबत असणाऱ्या कुणा महिलेची क्षमा मागून त्यांना विनंती केली की, मी डॉक्टर आहे. त्यांना सोबतीची गरज असल्यास किंवा काळजीवाहक म्हणून कुणी हवे असल्यास मी केव्हाही त्यांच्याबरोबर येऊन राहायला तयार आहे. अर्थात, तो माझा भोळेपणा होता, सुमित्राताईंना माणसांची कमतरता भासेल याची किती शक्यता होती, याचं भान मला असायला हवं होतं. पण भावनाविवश अवस्थेत आपले तर्क हवेत विरून जातात तसं काहीतरी माझं झालं होतं. मग एक महिना संपण्याची वाट बघत बसण्याशिवाय इलाजच नव्हता. आणि परत एकदा सुमित्राताईंना भेटणं, त्यांच्या सेटवर जाऊन चित्रीकरण बघणं याबाबत स्वप्नरंजन करण्यात मी रमून गेले.

आणि अचानक सुमित्राताई अत्यवस्थ असल्याची बातमी येऊन धडकली. माझ्या पायाखालची वाळूच सरकली. सुमित्राताई परत भेटू शकणार नाहीत, ही कल्पनाच असह्य होणारी होती. रक्तापलीकडची नातीही किती घट्ट असू शकतात, खूप अल्प भेटीतही किती घट्ट बंध निर्माण होऊ शकतात, हे त्या दिवशी पहिल्यांदाच जाणवलं. मग अनेक दिवस ती अस्वस्थता तशीच अवतीभवती तरंगत राहिली. त्यांचे चित्रपट बघून त्याची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्याबद्दल लिहून आलेला प्रत्येक लेख वाचला. त्यातून त्या अजून अधिकच कळत, जाणवत गेल्या.

काय नाही दिलं सुमित्राताईंनी आपल्याला? एक कलात्मक दृष्टी? आवाज नसणाऱ्यांचा आवाज होणं? त्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठीचं माध्यम होणं? प्रश्नांना वाचा फोडणं? डोंगराखाली लपलेले प्रश्न उकरून काढून त्यांना प्रकाशात आणणं? अडचणींवर हार मानण्यास नकार देणं? स्त्रीत्वाचा आवाज बनून त्याची ताकद समाजाला दाखवून देणं? माध्यमाचा वापर समाजपरिवर्तनासाठी करता येतो हे दाखवून देणं? आणि माझ्यासारख्या ग्रामीण भागात काम करणाऱ्या स्त्रीला 'मनात आणलंस तर तूही हे करू शकतेस हा आत्मविश्वास देणं?

आता मनाला समजवावे लागणारच की सुमित्राताई आपल्यात शरीराने नाहीत; पण त्या जिवंत आहेत आपल्या सर्वांमध्ये – कायमच्या. त्यांच्या कामातून, विचारातून, कलेतून, चित्रपट आणि लेखनाच्या माध्यमातून त्या सतत आपल्यात असतीलच. ताई, खूप काही शिकायचं होतं तुमच्याकडून, बरंच काही जाणून घ्यायचं होतं; पण निदान भेट तरी झाली ना असं आता मनाला समजावायलाच हवं. काही अपूर्ण राहिलेल्या गोष्टी पूर्णत्वाला नेण्यासाठी उपाय असतात म्हणे. हे 'क्लोजर' आपल्या बाबतीत मला मिळेल असं वाटत नाही. काही गोष्टींचं सौंदर्य त्यातील अपूर्णतेतच असतं, असं म्हणतात. तसंच आपल्या भेटीचं!

***डॉ. सविता मोहिते,***

*मिळून साऱ्याजणी प्रतिनिधी, कराड*

*savitamohite@hotmail.com*

**मनोगत**

# सुमित्राताई देखने जंगल में

मीना गोखले

**सुमित्राताईंच्या सहवासाचा हा हृद्य अनुभव...**

'मोर देखने जंगल में' या बाएफच्या ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमावर आधारित कामावर चित्रपट बनवत असताना बाएफतर्फे माझा सुमित्राताईंबरोबर सुमारे एक ते दीड वर्ष रोज नव्हे; पण अधूनमधून आणि सातत्याने संपर्क आला, सहवास घडला आणि सुमित्राताई या संपन्न व संवेदनशील व्यक्तिमत्त्वाची ओळख झाली.

चित्रपटाच्या तयारीसाठी सुमित्राताई व सुनील या दोघांनी आमच्या कामाची पूर्ण माहिती करून घेतली. संस्थेतील अनेकांच्या मुलाखती घेतल्या, महाराष्ट्र व दक्षिण गुजरातच्या गावोगावी, आदिवासी वाडी–वस्त्यांवर, जंगलात ते आमच्या बरोबर फिरले आणि बाएफच्या कामाची नस बरोबर पकडली. सुमित्राताईंनी समाजसेवेचे प्रशिक्षण आणि अनुभव घेतला असल्याने त्यांना ते सहजसाध्य झाले व अंदाजे तीन ते चार महिन्यांच्या अभ्यासातून एक ओघवती व प्रत्येकाच्या मनाची पकड घेणारी संहिता तयार झाली.

या चित्रपटाचे बरेचसे शूटिंग आऊटडोअर होते. शूटिंगची जागा ठरविताना आसपासचा परिसर त्या अत्यंत बारकाईने बघत. शूटिंगच्या दिवशी सकाळी काही जण सर्वांच्या आधी तयारीसाठी जात. आणि पहिले महत्त्वाचे काम करीत : ते एक तात्पुरता आडोसा म्हणजे एक दिवसापुरेसे झावळ्यांचे किंवा गोणपाट वापरून बाथरूम तयार करीत. आपल्या सहकाऱ्यांचा व विशेषत: स्त्री सहकाऱ्यांचा इतका विचार करणारा दिग्दर्शक क्वचितच.

सुमित्राताईंची शिस्त म्हणजे शिस्त. शूटिंगसाठी दुसऱ्या दिवशी किती वाजता निघायचे, हे सगळ्यांना आदल्या दिवशीच्या रात्रीच्या जेवण्याच्या वेळी सांगितले जाई. दुसऱ्या दिवशी ठरलेल्या वेळेआधी



दहा मिनिटे सुमित्राताई स्वत: तयार होऊन गाडीपाशी असत, आणि गाड्या अगदी वेळेवर – ऑन डॉट सुटत. जर का एखादा कलाकार वेळेवर हजर नसेल, तर त्या कलाकाराला न घेता सुद्धा. मग तो कलाकार कितीही मोठा किंवा महत्त्वाचा असो. त्या भीतीने आपोआप प्रत्येक जण वेळेवर तयार असे. अगदी बाएफचे जीपचालकसुद्धा.

शूटिंगची तयारी करताना, त्यांच्या डोक्यात सर्व आराखडा प्रत्येक डीटेल्स सकट आधीच तयार असे. तयारी तर इतकी अचूक आणि विस्तृत असे की कुठली गोष्ट आयत्या वेळी सापडली नाही, असे कधीच घडले नसेल. कोणत्या खोक्यात कोणते सामान आहे, हे त्यांना पूर्णत: माहिती असे आणि हे मी प्रत्यक्ष अनुभवले आहे.

शूटिंग हे नेहमी नैसर्गिक वातावरणात होई. आजूबाजूला पूर्ण शांतता ठेवावी लागे. कधी कधी हे कठीण असे. परंतु ते अत्यंत आवश्यकच असे. एकदा शूटिंग चालू असताना अचानक पलीकडच्या रस्त्यावरून जोरात आवाज येऊ लागला. लगेच एकाला पिटाळले, तो

आवाज बंद करा हे सांगण्यासाठी. पण तो आवाज होता एका उसाच्या गुऱ्हाळाचा. आणि तो मालक म्हणू लागला की, माझ्या धंद्याची हीच वेळ आहे आणि मी माझा धंदा बंद केला तर घरी पोराबाळांना काय खायला घालू? सुमित्राताईंच्यातील मूळ खरा समाजसेवक जागा झाला आणि त्यांनी ह्यावर असा तोडगा काढला की, शूटिंग चालू असेपर्यंत गुऱ्हाळ बंद ठेवायचे; पण शूटिंग संपल्यावर सर्वांसाठी त्या दिवशी चहाऐवजी ह्या गुऱ्हाळवाल्याकडून उसाचा रस विकत घेतला जाईल. उसाच्या गुऱ्हाळाचा मालक फारच खूश झाला. तो बायकोपोरांना घेऊन शूटिंग बघायला आला आणि नंतर घरी आलेल्या पाहुण्यांप्रमाणे सर्वांची सरबराई केली.

त्यांच्या चित्रपटातील कलाकार कधीही चेहऱ्याला मेक-अप लावत नसत, हे तर सर्वांनाच माहिती आहे. पण प्रत्येक कलाकाराचा पेहराव हा अतिशय समर्पक असावा या बाबतीत त्या फार जागरूक असत. मला त्यांच्याच सहकाऱ्यांनी असे सांगितले आहे की, अनेकदा कलाकारांचे कपडे खरेदी करण्यासाठी त्या स्वत: जात किंवा स्वत: निवड करीत. कार्तिक म्हणजे सारंग साठे ह्या चित्रपटाचा मुख्य कलाकार. त्याचे शर्ट सुमित्राताईंनी स्वत: निवडले होते. तर कधी कधी त्या कलाकारांना सांगत की, तू तुझे नेहमीचे कपडे घालून ये. मला आठवतंय, राधिका आपटेला त्यांनी असेच सांगितले होते आणि ती प्रत्यक्ष शूटिंगच्या आधी वारंवार विचारत होती : मावशी, हे कपडे ठीक आहेत ना? चालतील ना?

कलाकारांच्या पेहरावाबरोबरच अवतीभवतीचा परिसर त्या इतका विचार करून ठरवित की, आम्ही अचंबित होत असू. कार्तिकच्या पुस्तकांच्या शेल्फवरती ठेवण्यासाठीची काही पुस्तके त्यांनी बाएफच्या वाचलयातून निवडली, तर काही स्वत:च्या घरून आणली. कार्तिकचे घर, कार्यालय ह्याचे शूटिंग बाएफच्या विविध कॅम्पस व कार्यालयातच झाले. परंतु त्या सर्वांमध्ये सुमित्राताईंनी असे काही छोटे छोटे बदल केले की त्याचे रूपच पालटून गेले. एक पेंटिंग, एक लँप शेड, एक झाडाची कुंडी, लाल गेरूने तयार केलेले वारली डिझाईन, एक भारतीय बैठक यामुळे तेच घर आणि कार्यालय बाएफचे न वाटता ते सुमित्राताईंचे घर वाटू लागले. आणि शूटिंग संपल्यावर बाएफचे सर्व जण म्हणू लागले की, आता आपण हे सर्व असेच ठेवूया.

सुमित्राताईंचा उल्लेख सुनील सुकथनकर शिवाय पूर्ण होऊच शकत नाही. सुनील आणि सुमित्राताई हे एक अजब रसायन होते. काम करताना सुमित्राताईंचे काम कुठले आणि सुनीलचे काम कुठले हे वेगळे करता येणारच नाही. त्यांच्यात नेहमी एकच विचार असे नाही, चर्चा होत, मी अशा चर्चा ऐकल्या आहेत. पण शेवटी एकमेकांना समजून घेऊन एकविचारानेच निर्णय होई.

खरे तर 'मोर देखने जंगल में' हा कमिशन्ड चित्रपट. बाएफच्या कामावर आधारित. पण तो कुठेही प्रचारकी न करता त्यांनी ग्रामीण विकासाबरोबर आदिवासी समाजाचे खरेखुरे चित्रण केले आणि समाजकार्य करताना कार्यकर्ते स्वत: कसे बदलतात याचा सुंदर मिलाफ साधत एक सर्वांगसुंदर चित्रपट तयार झाला. याचे प्रयोग आम्ही भारतभर दाखविले. ज्यांनी ज्यांनी तो पाहिला त्यांनी एकदाच न बघता अनेकदा पाहिला.

***मीना गोखले,***
*meenagokhale11@gmail.com*

अंक मिळाला नाही का?

'मिळून साऱ्याजणी'चा प्रत्येक अंक दर महिन्याच्या १ तारखेला पोस्टाने रवाना होतो. जर वर्गणीदारांना दर महिन्याच्या २० तारखेपर्यंत अंक मिळाला नाही तर त्यांनी सोमवार ते शुक्रवार दुपारी १२ ते ५ या वेळात 'मिळून साऱ्याजणी'च्या ७४४७४४९६६४ या मोबाईल क्रमांकावर आपली तक्रार द्यावी. म्हणजे आम्हाला आपला अंक परत पाठवता येईल. पुण्यातील वर्गणीदारांनी वर्गणीचे धनादेश पाठवले तरी चालतील; पण बाहेरगावाहून धनादेश पाठवताना चेकवर मॅग्नेटिक स्ट्रिप आहे ना हे बघावे. आपण वर्गणी भरल्यानंतर लगेचच आपला पावती क्रमांक, दिनांक, नाव-पत्ता आणि वर्गणीचा कालावधी संगणकावर नोंदवला जातो. एखाद्या महिन्यात अंक आपल्याला पोचला नाही, तर लगेचच आपली तक्रार आपण 'मिळून साऱ्याजणी'च्या कार्यालयात नोंदवावी म्हणजे आमच्याकडून काही चूक राहिली नाही ना, हे तपासता येईल.

**- व्यवस्थापक**

जीडीनिया मन
ऑनलाइन व्यवहारे

# ऑनलाईन खरेदी– विविध पैलू

कौमुदी अमीन

**इंटरनेट वापरून (उदा. इंटरनेट बँकिंग, ऑनलाइन पेमेंट्स) किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने (उदा. एटीम) केले जाणारे आर्थिक व्यवहार ही आता अनेकांच्या अंगवळणी पडलेली गोष्ट, पण काही जणांसाठी अद्यापही ही एक 'भीतीदायक' गोष्ट आहे. जे लोक इंटरनेटवरून नियमित व्यवहार करतात त्यांनाही यातील सर्व जोखमीच्या बाजू लक्षात आलेल्या असतातच असंही नाही. या पार्श्वभूमीवर इंटरनेटवरील आर्थिक व्यवहारांची ओळख करून देण्यासाठी कौमुदी अमीन यांची ही विशेष लेखमाला. कौमुदी अमीन वित्त भांडवल आणि फायनान्शिअल ॲप्लिकेशन्ससाठीचं सॉफ्टवेअर विकसन या क्षेत्रात कार्यरत आहेत. तुम्ही त्यांना लेखाच्या शेवटी दिलेल्या इमेलवर या लेखाचा संदर्भ देऊन आपले प्रश्न विचारू शकता.**

मागच्या लेखात आपण ऑनलाईन खरेदीची काही मूलतत्त्वं पाहिली. आता त्यातील इतर काही बारकावे पाहूयात.

आता घराचा उंबरठाही न ओलांडता भाजी–फळे, किराणा, कपडे, चपला–बूट इतकेच नव्हे तर अगदी फ्रिज, टीव्ही, वॉशिंग मशीनसारखी साधनेसुद्धा, ऑनलाईन म्हणजेच संगणकावर इंटरनेट द्वारा खरेदी करण्याची सुविधा आहे. या सर्व गोष्टी तुम्ही त्या त्या कंपनीच्या वेबसाइट वरून घेऊ शकताच; पण इतर सामूहिक बाजारपेठांच्या संकेतस्थळांवरूनही म्हणजे ॲमेझॉन, फ्लिपकार्ट किंवा मिंत्रा यासारख्या साईटवरूनही घेऊ शकाल.

थोडक्यात, म्हणजे विविध संकेतस्थळांवर जाऊन, वस्तूंच्या किमतींची तुलना करून, सर्वात स्वस्त स्थळावरून खरेदी करू शकाल. अगदी सामान्य बाजारपेठेप्रमाणे, तुम्हाला वस्तूंच्या गुणवत्तेनुसार आणि उपलब्धतेनुसार, वस्तूंच्या किमतींमध्ये फरक दिसतील.

आणखी एक महत्त्वाची सोय म्हणजे समजा तुम्हाला तुमच्या मापाचे बूट, कपडे, दुकानात मिळाले नाहीत तरी ते ऑनलाईन बाजारपेठेत नक्की मिळतील. आणि तेही अनेकदा दुकानाहून स्वस्त किमतीत!

महागड्या वस्तूंच्या खरेदीवर सोयीस्कर हप्त्याने फेडण्याचे देयक पर्याय मिळतील, तसेच तुम्हाला हवी असलेली वस्तू बाजारपेठेत नसेल तर, ती उपलब्ध होताच त्याची सूचना मोबाईलवर मिळू शकेल. सवडीने खरेदी करू शकाल, मनस्वीपणे ऑर्डर रद्द करू शकाल, वस्तूंची संख्या कमी–जास्त करू शकाल आणि सवलतींचा लाभ घेऊ शकाल. आणि सर्व खरेदी रोकडीविना, कार्डद्वारे करता येईल.

**१. तुम्ही मागच्या लेखात म्हणाला होतात की हप्ते भरून खरेदी करता येते. ते कसे?**

विशेष करून खरेदीच्या वस्तू जर अधिक किमतीच्या असतील, जसे की, टीव्ही किंवा वॉशिंग मशीन किंवा लॅपटॉप सारख्या वस्तूंची खरेदी असेल तर बहुतांश साईट्स तुम्हाला हप्त्यांची सुविधा देतील. समजा तुम्ही खरेदी रक्कम पंधरा दिवसांच्या आत; परंतु लगेच खरेदी वेळेस नाही, तर बहुतेकदा बिनव्याजी व्यवहार होतो. त्यानंतर ३–६–९ महिन्यांचे हप्ते भरण्याची सोय बरेच ठिकाणी आहे. अर्थात, या हप्त्यांवर व्याज लागू होते. जेव्हा तुम्ही संकेतस्थळांवर जाऊन खरेदीसाठी तुम च्या पिशवीत वस्तू जमा करता आणि पैसे चुकते करायच्या ठिकाणी किंवा पानावर जाता, तेव्हा देयकाचे अनेक पर्याय येतील, त्यातील एक पर्याय हप्त्याने पैसे भरण्याचा असू शकेल. मोठ्या खरेदीच्या वेळेस याचा विचार करा. तसेच मोठ्या खरेद्या ठरावीक प्रसंगी म्हणजे दसरा, दिवाळी, नववर्ष अशा वेळांना केल्यात तर, सूट, रक्कम परतावा अशा सुविधाही मिळतील. काही साईट्स वेगळे सभासदत्व फायदे देतात. ऑनलाईन खरेदी करू लागलात की, हळूहळू या साऱ्या गोष्टी उमगू लागतील.

**२. मी ऑर्डर रद्द केली तर काय घडते?**

अगदी साध्या सोप्या भाषेत सांगायचं तर, ऑर्डर रद्द केल्यावर पैसे परत येतात. तुम्ही ज्या कार्डवरून खरेदी केली असेल त्यावर पैशाचे परावर्तन दिसेल. ॲमेझॉन सारख्या बाजारपेठेवर हा परतावा अगदी २–५ दिवसात दिसतो. प्रत्येक साईटच्या नियमावलीनुसार पैसे परत आलेले दिसतील. ऑर्डर रद्द करताना, रद्द करण्याचे कारण द्यावे लागते. आपण आपल्या बाजूने वस्तू न उघडता, कपडे असतील तर त्यावरचे किमतीचे–मापाचे किंवा इतर कुठलेही शिक्के–खूणचिट्ठी, न काढता वस्तू जशास–तशी परत करावी लागते.

**३. पैसे भरण्याचे अनेक पर्याय म्हणजे कुठले?**

यात दोन भाग आहेत. पैसे चुकते करण्याचे पर्याय– यात क्रेडिट व डेबिट कार्ड, थेट बँक अकाउंट, रूपे, भीम यूपीआय इत्यादींचा समावेश आहे. आणि पैसे हस्तांतरण करण्याचे वाहन– म्हणजे हस्तांतरण वाहक, ज्याला पेमेंट गेटवे म्हणतात, जसे रेझरपे, सी.सी अवेन्यू, पेटीएम इत्यादी. प्रत्येक पर्याय निवडीत थोडाफार वेगळेपणा आहे. बहुतेकशा साईट्सवर या दोन्ही बाबींमध्ये बरेच पर्याय असतात. आणि ग्राहकाला निवडीचे स्वातंत्र्य.

**४. तुम्ही तर म्हणालात पेटीएम हे हस्तांतरण वाहक आहे. पण मी माझ्या मोबाईल फोनवरून पेटीएमच्या आधारे बिल भरणा किंवा खरेदी नंतर बिल चुकते करू शकते की. तर मग पेटीएम नक्की काय आहे?**

होय. पेटीएम हे हस्तांतरण वाहक आहे आणि बिल देयक देखील आहे. अनेक वित्तीय कंपन्यांनी त्यांच्या संबंधित धंद्यांमध्ये विस्तार केले आहेत. पेटीएम कंपनीची ही दोन आणि अनेक इतर उत्पादने आहेत.

**५. अलीकडे मास्टरकार्डबद्दल पेपरमध्ये बरेच काही लिहून येत आहे. आणि असंही छापून आलंय की, नवीन मास्टरकार्ड वाटप बंद करण्यात आले आहे. नक्की काय भानगड आहे ही? माझे क्रेडिट कार्ड मास्टरकार्ड कंपनीचे आहे, या पुढे ते वापरण्यात मला काही धोका आहे का?**

डेबिट अथवा क्रेडिट कार्डच्या मुख्यत्वे दोन डेटा बेस आहेत– विसा आणि मास्टरकार्ड. या दोन संस्थांकडे सर्व कार्डधारकांची माहिती संग्रहित असते. जेव्हा तुमच्या कुठल्याही खरेदी व्यवहारासमयी कार्ड वापरले जाते, तेव्हा तुमची माहिती या संग्रहित माहिती तुलनेत पडताळली जाते. या पडताळणीत निश्चित केले जाते की, वापरलेल्या कार्डचा धारक योग्य आणि विधिग्राह्य आहे. विसा व मास्टरकार्ड बहुद्देशीय कंपन्या आहेत. त्यांच्याकडे जगातील सर्व देशांमधील लोकांची माहिती आहे, जी त्यांनी योग्य आणि वैध कारणांसाठीच वापरणे अपेक्षित आहे. प्रत्येक देशाचे आधारसामग्री (डेटा) वापरण्याचे, संग्रहित करण्याचे आणि त्याची गोपनीयता राखण्याचे नियम वेगवेगळे आहेत. स्थानिक आधारसामग्रीसाठी अलग साठा करणे, असा भारतात नियम आहे. या नियमनाचे मास्टरकार्डकडून उल्लंघन झाले आहे. परंतु मास्टरकार्ड अतिशय शिस्तबद्धपणे आधारसामग्री जपणारी कंपनी आहे. आपली सर्व व्यक्तिगत माहिती त्यांच्याकडे आजही सुरक्षित आहे. परंतु स्थानिक माहिती साठा अलगीकरण न केल्याच्या नियम उल्लंघनाबद्दल त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. मास्टरकार्डच्या नवीन कार्डस्चे वितरण सध्या स्थगित केले आहे; परंतु तुमच्या सध्याच्या वापरातील कार्डांवर कसलेही प्रतिबंध नाहीत आणि ती कार्डस् वापरण्यात कसला धोकाही नाही.

**६. युनिफाईड पेमेंट इंटरफेस (यू. पी.आय) म्हणजे काय हो ताई?**

युनिफाईड पेमेंट इंटरफेस (यू. पी.आय) अर्थात, संयुक्त भरणा आंतरपृष्ठ म्हणजेच एकाधिक बँक खात्यांचे एका मोबाईल प्रयुक्तीद्वारे (ॲप्लिकेशन) आर्थिक व्यवहार करता येण्याची सुविधा. ही बँकेनेच तयार केलेली प्रणाली आहे. एका बँकेतून दुसऱ्या बँक खात्यात; अथवा, इतर पैसे भरणा माध्यमात हस्तांतरण करण्याची सोय. ही पद्धत जितकी सुविधाजनक तितकीच धोकादायक. यू.पी.आय माध्यमाद्वारे पैसे हस्तरांतरण सावधपणे करावे.

युनिफाईड पेमेंट इंटरफेसद्वारे कोणाकडूनही सहजपणे पैसे मागितले जातात. फसवणूक करणारा एखाद्या व्यक्तीला डेबिट दुवा (लिंक) पाठवून त्यावर निवड करण्यास सांगतात, पिन टाकल्यानंतर खात्यातून पैसे आपोआप कापले जातात. त्यामुळे कोणत्याही अनोळखी डेबिट विनंतीला वगळून टाका किंवा काढून टाका. त्याची निवड/ विनंती स्वीकारू नका.

**७. हल्ली म्हणजे आता कोरोना काळात फार जास्त लोक मदतीचे मेसेज पाठवतात. काळ खरंच वाईट आहे. अनेकांचे काम/धंदे, नोकऱ्या अक्षरशः नाहीशा झाल्या आहेत. अशा वेळी आपल्याला जमेल तेवढी मदत करावीशी वाटते. परंतु त्यातला खरेपणा आणि खोटारडेपणा कळत नाही. काय करावं?**

खरं आहे. परिस्थिती विषण्णता निर्माण करणारी आहे. त्यात पूर, आर्थिक मंदी; यांनी आणखी भर पडते आहे. अनोळखी व्यक्तीकडून आलेल्या व्हॉट्सअप, ईमेल, SMS, मेसेजमध्ये दिलेल्या टाचणांवरील निवड/विनंती स्वीकारू नका. प्रत्येकाने समाजाला किती आणि कसा परतावा करावा, हे ज्याचे त्याने ठरवावे. पण जे आपण देतो ते सत्पात्री असावे, असे मात्र प्रत्येकाला निश्चित वाटतेच. त्यामुळे खात्री करून घेतल्याविना हस्तांतरण करू नये.

परदेशी भेट देणे व घेणे, यामध्ये अनेक कर, जकात, परकीय चलन अदलाबदल; यांसारख्या खाचाखोचा असतात. त्या जाणून घेतल्याविना, कोणातरी फेसबुक/व्हॉट्सअपवर भेटलेल्या व्यक्तीबरोबर व्यवहार करणे अतिशय धोक्याचे आहे. या माध्यमातून व्यक्तीचे खरे नाव आणि त्याची माहिती मिळणे देखील अवघड असते. मग त्याचा हेतू, आर्थिक उद्देश कळणं तर दूरच... सावधता बाळगा, सतर्क रहा आणि भलेपणा करून स्वतःवर पस्तावायची वेळ येऊ देऊ नका!

***कौमुदी अमीन, पुणे.***
*kaumudi.amin@gmail.com*

कळा ज्या लागल्या जीवा

# भाकरीच्या शोधात शक्तिमान

सारिका

**आपण ज्या समाजात राहतो त्याच समाजात भुकेपुढे आत्मसन्मान, शिक्षण आणि इतर गोष्टी गौण ठरतात, हे सिद्ध करणारा एक समूह राहतो. प्रत्येक गावाच्या शहराच्या वळचणीला तात्पुरती वस्ती करून जगत असतात ही माणसे. हीसुद्धा आपल्यासारखीच माणसे आहेत; पण ही माणसांसारखे जीवन जगतात का? तर नाही, स्वतःचे गाव नाही, हक्काचं घर नाही, मुलांना शिक्षण नाही, अशा अवस्थेत कितीतरी पिढ्या जगत राहतात. शिक्षणाचा गंध नसलेल्या घरादाराचा पत्ता नसलेल्या आणि सगळ्या आयुष्याची हेळसांड झालेल्या या लोकांना कधी आणि कसे येईल आत्मभान? त्यासाठी आपणही काही देणं लागतो म्हणून अशांच्या आयुष्यांचा वेध घेणारी मालिका– कळा ज्या लागल्या जीवा...**

त्याची आई, मामी की काकू कुणीतरी स्वयंपाक आटोपून दुसऱ्या कुठल्यातरी कामासाठी उठून गेलीय तिथून. लोखंडी शेगडी, एक पेटलेलं लाकूड आणि फुललेला विस्तव शेगडीत. भाकरीची भलीमोठी चळत ठेवलेली आहे बाजूला. शेगडीतल्या विस्तवावर तो विडी पेटवतोय. काका, बाबा की आजोबा यांच्यापैकी कुणीतरी त्याला ती पेटवून आणायला सांगितलीय.

खडकाळ, ओबडधोबड जमिनीवर आजूबाजूला स्वयंपाकाची भांडी पसरलेली आहेत. काही एशियन पेंटच्या प्लास्टिकच्या रिकाम्या डब्यांमध्ये पाणी आहे प्यायचं. त्यावर जर्मनच्या प्लेट आणि कापड झाकलेले. गुडघ्यापर्यंत ढगळ शर्ट घातलेला एक लहानगा दोनतीन वर्षाचा– बहुधा त्याचाच लहान भाऊ असावा– स्वतःच्याच हाताने पाणी घेऊन पितोय तिथेच. साधारणपणे कुटुंबात बाळ पाच वर्षांचं होईपर्यंत दूध, पाणी, खाणं–पिणं यासाठी मोठ्यांवर अवलंबून असतं. मग कुटुंबातल्या वातावरणानुसार आर्थिक, सामाजिक ऐपतीनुसार हे अवलंबून राहण्याचं वय वाढत असतं वरचेवर. परंतु, भटक्यांच्या कुटुंबात मात्र मुलं लवकरात लवकर आपली कामे करायला लागतात. इतरांचीही करायला शिकतात. इतर सधन किंवा सामान्य कुटुंबातल्यासारखे खाण्यापिण्याचे लाड, हौसमौज यावर पैसा आणि वेळ खर्च करणं परवडत नाही, त्यांच्या आईबाबांना.

ताडपत्रीसारख्या मजबूत पांढरट मळकट कापडाने बनवलेले त्यांचे दहा–बारा तंबू. शहराबाहेर मोकळ्या मैदानात. त्याच्यासारखीच आणखी लहान लहान मुलं खेळताहेत आजूबाजूला. त्यापैकी कोणत्याही लहान मुलाला त्यांच्यातली मोठी माणसं अशी विडी पेटवण्याची, एकमेकांना तंबाखू–चुना नेऊन देण्याची, सुपारी–गुटखा पुडी दुकानातून आणून देण्याची कामं बिनदिक्कत सांगत असतात. 'एवढ्याशा मुलाला विडी पेटवायला सांगताय, तो पण शिकेल न लवकरच विडी–काडी तंबाखू.'

'तर,आमचे लेकरं कुटं काय हाफिसर बनणार हायेत का बाई? आमचंच काम शिकून पोट भरावं लागलं त्यानला बी. आज ना उद्या वडलंच की विडी', म्हणत त्याचे बाबा होते की काका पुन्हा आम्हाला फोटो दाखवण्यात गुंतून गेले. वय, बालपण अशा गोष्टींचा होणारा परिणाम हा विचारही मोठ्यांच्या मनात येत नसावा बहुदा किंवा त्यांनाही माहीत असावं या मुलांचं भविष्य आपल्यापेक्षा काही वेगळं नसणारंय.

कोरोनाकाळात सगळं जग घरात बंदिस्त झालेलं असताना हा शिक्कलकार समाज मात्र आपल्या उदरनिर्वाहासाठी भटकतोय या गावाहून त्या गावी. कुटुंबातली पुरुष मंडळी संध्याकाळच्या वेळी एका तंबूसमोर निवांत गप्पा मारत बसलीयत आणि त्यांच्या आजूबाजूला तरुण– म्हणजे सोळा सतरा अठरा ते वीस बावीस वर्षांची मुलं– तोंडात गुटख्यांचे तोबरे भरून इकडेतिकडे पचापच थुंकत त्यांच्या गोष्टी ऐकत, तर कोणी मोबाईलमध्ये काहीबाही बघण्यात गुंग आहेत. तरुण मुलांनी, पुरुषांनी डोळ्यात काजळ किंवा सुरमा घातलेला आहे आणि त्यांचे दात गुटखा, मावा पुडी खाऊन रंगलेले–किटलेले आहेत. आजूबाजूला विमल, सितारचा उग्र वास पसरलेला आहे.

रंगबिरंगी शर्ट, जीन्स पँट, वाढलेले ब्राऊनिश लालसर केस आणि चेहऱ्यावर बेपर्वाईचे भाव अशा आविर्भावात ते हसत, गमती करत हळू आवाजात कुजबुजत आहेत. विडी पेटवून आणणारा हा लहानगा मुलगाही टाईट जीन्स पँट, फुल बाहीचा शर्ट घालून हळूहळू या मोठ्या मुलांचं अनुकरण करू पाहतोय. हातातली विडी विस्तवावर पेटवून त्याने त्याच्याही नकळत ती दोन बोटांत पकडलेली. कोणत्याही क्षणी कुतूहलापोटी तो तिचा झुरका घेऊन बघू शकतो. यासाठी त्याला फार कोणी

रागावणार किंवा शिक्षा करणार नाही. तर, उलट तोंडभर हसून कौतुकच करतील मोठी माणसे. अशीच सगळी एकंदर परिस्थिती आहे.

काही स्त्रिया तंबूबाहेर चुलीवर स्वयंपाक रांधत आहेत. तरुण मुली, सुना एकमेकींसोबत गप्पा मारत भाकरी थापत आहेत. तर मध्यमवयीन स्त्रिया पान-तंबाखू चघळत गटागटाने बसलेल्या आहेत. एक दोन म्हाताऱ्या एकट्याच डोक्याला हात लावून, दूरवर नजर लावून आपल्याच विचारात मग्न बसलेल्या आहेत. सगळ्यांनी डोक्यावरून पदर घेतलेला आहे. तो जरासा लांबच म्हणजे खांदा झाकला जाईल असा आणि सगळ्यांच्या अंगात एकाच रंगाचे ब्लाऊज आहे, पिवळे धम्मक. कशिदा केल्यासारखे प्रिंटेड. मागच्या बाजूने बंद गळा, कोपरापर्यंत बाही असलेले. सगळ्यांनी वेगवेगळ्या रंगाच्या साड्या नेसलेल्या असल्या तरी ब्लाऊज मात्र सारखेच आहे, तरण्यांपासून म्हाताऱ्यापर्यंत. दुसरी वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट म्हणजे त्यांनी दातवन लावून दात काळेभोर केलेले आहेत. म्हाताऱ्या, मध्यमवयीन आणि वीस-बावीस वर्षांच्या तरुणींनीसुद्धा आपले दात काळे केलेले आहेत.

मध्यंतरी बॉलिवूडमधील सत्तर ते ऐंशीच्या दशकातील एका अभिनेत्रीच्या आजीविषयी एक लेख वाचण्यात आला होता. ती नाचगाणं करायची. त्यावेळी त्यांचे दात आणि ओठ काळे असणं हे एक सौंदर्याचं लक्षण मानलं जाई आणि मुली, स्त्रिया दातवन लावून आपले दात आणि ओठ काळे करीत असत. कदाचित, तीच सौंदर्याची धारणा यांच्यातही अजूनपर्यंत टिकून आहे. प्रत्येकीचे दात आणि ओठ काळे, कान जवळ-जवळ सात ते आठ ठिकाणी टोचलेले आणि त्यात बाळ्या अडकवलेल्या, हातातल्या सगळ्या बोटात अंगठ्या, गळ्यात मोत्यांनी विणलेल्या जाडसर पट्ट्या. एवढा सगळा साज घालूनच त्या रोजची कामे करतात. कान टोचणे आणि त्यात बाळ्या अडकवणे म्हणजे त्यांच्यात सौभाग्याचे लक्षण.

बाहेरच्या जगाशी जराही संबंध नसलेल्या या बाया. काळ्यासावळ्या, मजबूत बांध्याच्या, कान, नाक टोचलेल्या, गळ्यात कानात, नाकात, हातात ब्लॅक मेटलचे दागिने, हातात खूप साऱ्या रंगीत काचेच्या-धातूच्या-प्लास्टिकच्या बांगड्या. काळे दात अन् काळे ओठ असलेल्या बाया एका जागी बसून गमतीजमती करत आहेत. हसत आहेत. आपापसात कुजबुजत आहेत काहीबाही. त्यांचं स्वतःचं असं एक वेगळं विश्व आहे काहीतरी. म्हाताऱ्या, मध्यमवयीन, तरुण, लग्न झालेल्या, न झालेल्या सगळ्यांना सामावून घेणारी एक टीमच आहे ती. एक वीस-पंचवीस वर्षे वयाची, मनोरुग्ण दिसणारी मुलगी आहे त्यांच्यात. तिचे केस कापलेले आहेत. गळ्यात-कानात दागिने नसलेली, पंजाबी ड्रेस आणि डोक्यावरून ओढणी घेतलेली आहे तिने. शांत आणि निर्विकार चेहऱ्याने बसलेली आहे ती, त्यांच्याच घोळक्यात. अशा वेडसर, अपंग, देखण्या, लहान, मोठ्या सगळ्या मुलींना सामावून घेणाऱ्या बायांचा तांडाच आहे हा. धर्माने मुस्लीम; पण महाराष्ट्रातल्या डोंबारी जमातींपैकी एक जमात. बहुतेक शिक्कलगारच. सय्यद शेख असे नाव त्यांच्यातल्या कुटुंबप्रमुखाने सांगितले. पूर्वी हे लोक धातूं वितळवून शस्त्र बनवायचे. घिसाडी समाजाप्रमाणे लोखंडी वस्तू तवा कढई, विळी, सुरे बनवायचे. काही पिढ्यांनी शारीरिक कसरती चमत्कार दाखवणे जसे, दातांनी-केसांनी ट्रक ओढणे, पापणीच्या साह्याने जड वस्तू उचलणे, हातांनी कोपरानी विटा फोडणे- दगड फोडणे अशी कामे केली. अजूनही करतात. वेगवेगळ्या नटनट्या, राजकीय सत्तेत असलेल्या व्यक्ती यांच्यासमोर आपले शक्तिप्रदर्शन करून, त्यांच्या मदतीने सार्वजनिक कार्यक्रम करून पोटासाठी पैसे मिळवले. त्याची छायाचित्रे अजूनही जतन करून ठेवलेली आहेत त्यांच्याकडे. ''ये देखो मॅडम, ये आग मे से कुदी मारते हम लोग. ये देखो ये हनुमान उडी देखो! और ये दातोंसे रस्सी बांधके ट्रक खिंचते मॅडम'' वेगवेगळ्या चमत्कृतीपूर्ण शारीरिक कसरती करतांनाचे फोटो लॅमिनेशन करून फाईलला लावलेले. अतिशय उत्साहात दाखवत होते ते. आम्ही ते लक्षात ठेवून कदाचित त्यांना एखादा कार्यक्रम वगैरे मिळवून देऊ अशी आशा वाटत असावी त्यांना. मोतीबिंदू होणे, डोक्यावर टक्कल पडणे, लैंगिक समस्या अशा अनेक व्याधींवर त्यांच्याकडे औषध आहे असे ते म्हणतात. कुठून तरी जंगलातून औषधी जडीबुटी मिळवून त्याची वेगवेगळ्या प्रकारची औषधे तयार करतात. तेल तयार करतात. त्यात कितपत तथ्य आहे माहीत नाही. ''आपके चष्मे का क्या नंबर है सर? हमारे पास ये दवाई है रात को सोते समय पाव को मालीश करना- चष्मे का नंबर छुट जाएगा. अगर मोतियाबिंद है तो एक काजल देता मै आपको सोते समय आँखो मे लगाव सर ऑपरेशन करना नही पडेगा ! ॲडवान्स देदो आभी आप कलतक बनाके लाके देता ! आप जहाँ बोलो वहाँ आके लाके देता साब!''

मध्यंतरी यूट्यूबवर ट्यूबलाईटच्या काचा खाताना एका माणसाला पाहिलं होतं. तर माणसांनी भरलेली बैलगाडी, ट्रक, रोडरोलर छातीवर घेणाऱ्या, हातांनी लोखंडी पहार वाकवणाऱ्या मुंबईच्या एका शक्तिमान नगरसेवकाविषयी वाचले होते. एका प्रयोगाच्या वेळी रोडरोलर छातीवरच थांबला आणि डोळ्यात रक्त साकळू लागले होते. ऐनवेळी त्यांच्या एका शिष्याने तो रोलर बाजूला केला. यांच्याही आयुष्यात असे अनेक प्रसंग येत असतील. जीवावर बेतत असेल.

(पान ५६ वर)

निष्पर्ण नीडी

# खेरून

## प्रियांका तुपे

'महारूप मेरा भडवा था (भडवा– किराए से मेरे मकान मे रहता था) हम नीचे रहते थे, उपर के दो कमरे महारूप और उसके परिवार को दिए थे। महारूप की बेटी खेरून सोलह– सतरहा साल की होगी। माशा अल्ला क्या खुबसूरत और प्यारी बच्ची थी। चाचा– चाचा करके बुलाती थी मुझे। मेरे ट्युशनमें आके बैठती थी, हर रोज शाम को मुझे चाय पिलाती थी। बडे हक से डाटती भी थी। चाचा, पहले चाय पियो.. बाद मे पढाओ.. ये चाय ठंडी हुई तो मैं दुसरी नही बनानेवाली।' टेबलावर ठेवलेल्या पृथ्वीगोलाकडे पाहत शून्यात नजर लावून मास्टरजी बोलत होते.

'उस दिन सुबह मैं जा रहा था अपनी ट्युशन में साफसफाई करने, खेरून उपर बाल्कनी में कपडे सुखने के लिए डाल रही थी। नीचे सब लोग थोडी खुसफुस कर रहे थे.. कुछ अजीब सा लग रहा था.. लेकीन मुझे तो वैसे भी सुननेमें तकलीफ होती है, ठीक से सुनाई नही देता, तो पता नही चल रहा था, क्या हो रहा हैं, बस माहोल कुछ ठीक नही लग रहा था। जैसे मैं ट्युशन की तरफ जाने लगा, एकदम से जोर जोर से आवाज आई, पत्थर गिरने लगे.. मानो पत्थरों कि बरसात ही हो रही थी.. मोहल्ले के सब लोग.. मिया, भाई, बच्चे, औरत, बहने सब भागने लगे। मैं भागते भागते अपनी घर कि तरफ आया तो खेरून ने चिल्लाकर कहा, चाचा भागो, टोला आया हैं। मेरी बीबी और बच्चे पहलेही बाकी लोगो के साथ भाग चुके थे। वो सब लोग अपनी जान बचाने के लिए बाजू कि एसआरपी कॉलनी में घुस रहे थे। पुलीस उन्हे अंदर लेने बजाय बाहर ही ढकेल रही थी। इधर टोले ने घरो को आग लगाना, बच्चो को काट के आग में फेकना, औरत–बहनों को नंगा करना शुरू किया था। मैं अपनी बीबी और बच्चो को ढुंढ रहा था। बाकी लोगो को भी घर छोडने के लिए चिल्ला–चिल्लाकर बोल रहा था। इतने में मेरी नजर गयी, कि टोला मेरी तरफ आगे बढ रहा है, तो मै भाग भाग के उपर जा के पानी कि टँकी में कुदा, शाम तक वही छिपे रहा। शाम को दो भाई मुझे वहा से निकालकर कॅम्प मे ले गये शाहआलम में। वहा महारूप कि बीवी रो रही थी, क्योंकि खेरून का कुछ पताही नही था। इतने में किसीने आकर कहा.. एक लडकी मिली हैं, मास्टरजी, जिंदा हैं लेकीन बहोत बुरी हालात में, तुरंत हॉस्पिटल भगाना पडेगा मास्टरजी। मैं भागता भागता गया। लडकी कि पुरे बदन पे सिगरेट के दाग.. चेहरा खराब किया था, कपडे फाडे थे, रेप हुआ था उसका.. दो औरते थी उसके पास, लेकीन जैसे ही कोई उसे हाथ लगाए, वो जोर जोर से चिल्लाती थी, किसी को अपने पास आने न दे रही थी। उसे सांस लेने में तकलीफ हो रही थी। जैसे ही मैने उसके मूँह पर से हाथ फेरा, उसने पहचान लिया, उसने झट से मेरा हाथ पकडके बोला, चाचा आप हो नं, आप ठीक हो नं? मेरी आँखो से आसू आने लगे, वो मेरी खेरून थी।

मैने उस कॅम्प के पुलीस से बात करी, की मैं इसका चाचा हूं, और इस बेटी को हॉस्पिटल लेके जा रहा हूं... पुलीस ने मना कर दिया, वो बोले हम इसके माँ–बाप के बिना इसे आपके हवाले नही करेंगे। अब उसके अम्मी–अबु तो दुसरे हमारेवाले कॅम्प में थे। बुलाने में समय बरबाद होगा, इधर खेरून कि हालात और खराब हो रही हैं। महारूप याने खेरून के बाप को बुलाने के सीवाय और कई चारा नही था हमारे पास.. हम गए, और महारूप से कहा, चलो खेरून मिल गयी हैं, लेकींन बुरी हालात में है, जलदी हॉस्पिटल लेके जाना पडेगा। वो हिलने को भी तयार नही था, उसे लग रहा था, पाटीया कि बीचवाली गली के खाचे में टोले ने खेरून को भी जला दिया हैं। हमने गिडगिडाकर उसे कहा, खेरून जिंदा हैं, तुम चलो लेकीन वो नही आया। हम फिर भागते भागते गए, दुसरे कॅम्प में, जहा खेरून पडी थी। आके देखा तो खेरून वहा नही थी, पुलीस से पुछा, खेरून किधर हैं? वो बोले कौन खेरून? यहा एक लडकी थी, तीन–चार मर्द उसे रिक्षा में डाल के चले गये। हमने पुलीस से पुछा, आपनें कैसे जाने दिया? हम तो उसके बाप को लाने गए थे पर वो आया ही नहीं। पुलीस ने कुछ जवाब नहीं दिया। हम वैसे ही आधी रात में सारे कॅम्प धुंडे, लेकीन नही मिली खेरून। कई दिनो तक हम रोज कॅम्प में, हॉस्पिटल में जाते रहे, लेकीन नही मिली मेरी खेरून, पता नहीं इन लोगों ने मेरे खेरून का क्या हाल बनाके रखा होगा, कही उसे बेच दिया होगा।

लेकींन मेरा दिल कहता हैं बेटे, खेरून अभी भी जिंदा हैं, खेरून बडी हिम्मतवाली थी, इतना कुछ होने के बावजूद उसने सास नहीं छोडी थी, वो जिंदा हैं।'

(गुजरात का नरोडा पाटिया हत्याकांड जिन्होने अपनी आँखो से देखा हैं, वो विक्टीम और विटनेस नाजीर खान याने मास्टरजी, जो अभी ६६ साल के हैं, कपकपाते हुए यह कहानी हमे बता रहे थे, मेरी और सलीम भाई की आँखे बह रही थी।)

नरोडा पाटिया– गोध्रा हत्याकांड के बाद अहमदाबाद में बहोत दंगे हुए, नरोडा पाटिया के करीबन ७० लोगों को, जिसमें औरतें, बच्चें ज्यादा थे... उनको जिंदा जला दिया था।

*tupriya2911@gmail.com*

(पान २१ वरून)

प्रवास कसा झाला, त्या कुठवर पोचल्या आहेत, याची उत्सुकतासुद्धा तितकीच होती. वर्गातल्या आपल्या नंबराप्रमाणेच आपण कुठंतरी मध्यभागी असणार असा तिचा अंदाज होता!

+ + +

हीरक महोत्सवाची संध्याकाळ :

कार्यक्रम सहाला सुरू होणार असला तरी उत्साहाच्या भरात सर्वच जण लवकरच जमले; पण कॉलेजच्या बाहेर. प्रत्येक जण तिथं जमणाऱ्या गर्दीत आपल्या ओळखीचे चेहरे शोधण्यात गर्क होते आणि एक नजर कॉलेजच्या गेटपाशी – जिथं येणारी प्रत्येक व्यक्ती प्रथम जात असे आणि मग हळूहळू गर्दीत मिसळून जात असे.

पांढऱ्या कपड्यातल्या शोफरनं आदबीनं दरवाजा उघडून धरला आणि गाडीतून मेघा अलगद उतरली हे बऱ्याच जणांनी बघितलं; पण तोवर दीपा आणि नंदिता पोचल्या नव्हत्या. ओळखीच्या चेहऱ्यांच्या चमूत मेघा मिसळते तोच एका लक्झरी प्रायवेट टॅक्सीतून दीपा गेटवर उतरली आणि ते मेघानं दुरून टिपलं. दीपासुद्धा गर्दीत इतरांसारखीच हरवून गेली. थोड्याच वेळात आपल्या नेहमीच्या जलद चालीनं नंदितासुद्धा गेटवर पोचली तेव्हा गर्दीतून दीपा आणि मेघानं तिला पाहिलंच.

यथावकाश कार्यक्रम सुरू झाला. रीतीनुसार भावनांनी लडबडलेली स्मरणरंजक भाषणं तर झालीच; पण माजी विद्यार्थ्यांचं विविध कलागुणदर्शन वगैरे संपून खरा कार्यक्रम सुरू झाला. कॉलेजच्या विस्तीर्ण पटांगणात जणू खाद्यजत्राच लागली होती, परंतु त्यापेक्षा महत्त्वाचं म्हणजे भरपूर मोकळी जागा आणि अनेक मोठी वर्तुळाकार टेबलं जिथं तिथं मांडून ठेवलेली. मग काय विचारता? प्रत्येक जण खाण्याच्या प्लेटा भरून आपल्या मित्र–मैत्रिणींच्या कंपूत टेबलांभोवती बसून गप्पांचा फड जमवू लागली. अजूनही बरीच टेबलं मोकळी होती, कारण बफे काऊंटरर्सवर मोठ्या रांगा हळूहळू पुढं सरकत होत्या.

तशाच एका रांगेत त्या तिघी एका पाठोपाठ आल्या आणि त्या सायंकाळी प्रथमच एकमेकींना भेटल्या. ओळखीच्या नैत्रपल्लवी पलीकडची तर त्यांची ओळख होतीच आणि म्हणूनच एकमेकींशी संवाद करू लागल्या.

अगदी सुरुवातीलाच त्यांना एक गोष्ट नक्की जाणवली की, कॉलेजच्या दिवसांत अजिबातच समान नसलेले आयुष्याचे संदर्भ आता अगदी तितके टोकाचे वेगळे राहिले नव्हते. अर्थात, तसं हे सुद्धा थोडं अतिरेकी विधानच म्हणायला हवं. कारण मेघा तिच्या शोफर ड्रीवन कार मधून हिंडते हे तिनं वेगळं सांगण्याची गरज नसावी असा तिचा थाट इतर दोघींना तत्क्षणीच जाणवला होता. आणि दीपा लक्झरी टॅक्सीतून इथं आली होती, पण ती शेवटी टॅक्सीच होती याची नोंद मेघानंही घेतलीच होती. नंदिता पायी आली होती (रेल्वे स्टेशनवरनं का होईना!) हे सुद्धा इतर दोघींनी पाहिलंच होतं की! पण विषय तो नव्हेच. त्यांच्या ज्या गप्पा सुरू झाल्या त्यामधून नंदितानं तिचा जो आजवरचा प्रवास उलगडला आणि ज्या भविष्याबद्दल ती आत्मविश्वासं बोलली त्यामधून खरं तर त्यांच्यातील टोकाचे भिन्न आर्थिक–सामाजिक संदर्भ थोडे विरलेले तिघींनाही जाणवले; आणि त्याचवेळी आता या ओळखी पुढं न्यायला काही हरकत नाही, अशी भावनाही तिघींच्या मनात एकाच वेळी आली! इथपर्यंत, की तिघींनीही एकमेकींचे टेलिफोन नंबर्स एक्सचेंज केले. आणि एकमेकींच्या संपर्कात राहण्याची वचनंही दिली.

+ + +

ती संध्याकाळ तर संपली. पण काही गोष्टी मनात रुंजी घालतच राहिल्या. खासकरून दीपाच्या! नंदिता केव्हाच तिच्या आव्हानांनी भरलेल्या आयुष्यात अलगद विलीन झाली आणि मेघा तिच्या ऊबदार ऐहिक जगात. दीपाला राहून–राहून त्या संध्याकाळच्या त्या तिघींच्या भेटीचं आणि चुटपुटत्या संवादाचंच अप्रूप


## चांगलं बाप–लेक नातं निर्माण करण्यासाठी...

बाप–मुलाचं नातं बहुआयामी, बहुपदरी असतं. त्यातला एक–एक पदर उलगडून दाखवणारे अनेक लेख या पुस्तकात आहेत.

एस. एम. जोशी, धनंजय गाडगीळ, व्ही. शांताराम, रा. चिं. ढेरे, रॉय किणीकर, भालचंद्र पेंढारकर आदी मातब्बरांच्या मुलांचे तसेच जयंत नारळीकर, अच्युत गोडबोले, ऐश्वर्य पाटेकर, प्रा. डॉ. नारायण भोसले यांचे आत्मकथन सांगणारे असे एकतीस लेख या पुस्तकात आहेत.

चांगलं बाप–लेक नातं निर्माण करण्यासाठी 'बाप–लेक नात्याचा कॅलिडोस्कोप' हे पुस्तक आपल्याला नक्कीच मदतीचा हात देईल.

**बाप–लेक नात्याचा कॅलिडोस्कोप**
संपादक : गीताली वि. मं.
मूळ किंमत : रुपये ५५०/–
सवलतीत : रुपये ४००/–
गुगल पे : ९९२१२७२५४६

**घरपोच पुस्तकासाठी संपर्क**
अमित प्रकाशन, २०७, १२ अ, साफल्य, डिफेन्सकॉलनी, जनवाडी, गोखलेनगर, पुणे ४११०१६



वाटत राहिलं. तसं तिला अंतर्यामी कुठंतरी सारखं जाणवत राहिलं की,

(पान ५५ वर)

(पान २१ वरून)

त्यांच्यात काहीतरी प्रबळ बंध तयार झाले आहेत– आयुष्याच्या रेट्यात. पण ती त्यावर नेमकं बोट मात्र ठेवू शकत नव्हती. तिला ही सुद्धा खात्री नव्हती की, तिच्या त्या भावना इतर दोघींच्याही होत्या की केवळ तिच्याच. पण जे असेल ते असो, तिला इतकी नक्की खात्री होती की, त्या तिघींना परत एकमेकींना भेटायला आवडेल. आणि म्हणूनच तिनं ते दोन कॉल्स केले!

+ + +

पहिला नंदिताला :

दीपा : ''छान वाटलं ना गं इतक्या वर्षांनी भेटल्यावर आणि ते सुद्धा आपल्या कॉलेजात?''

नंदिता : '' हो ना गं. मस्त वाटलं, सगळ्या जुन्या मित्रमैत्रिणींना भेटून''

दीपा : ''भेटायला हवं गं आपण तिघींनी निवांतपणे''

नंदिता : ''हो नक्की. तू ठरव. मी येईन.''

त्या कॉलनंतर दीपाचा हुरूप तर वाढलाच, पण फोन उचलून मेघाला कॉल करण्याचा एक कॉन्फीडन्सही आला. आणि मेघानंसुद्धा भेटण्याची तितकीच तयारी दाखविली. एवढंच नाही तर तिच्या वरळीस्थित क्लबम ध्येच भेटण्याचा प्रस्तावही दिला.

अशा तऱ्हेनं त्यांच्या भविष्यातील वारंवार भेटींची मालिका एका अर्थानं त्या क्लबमधल्या पहिल्या मिटींगमध्ये सुरू झाली.

मेघाच्या सोशली हाईपरॲक्टीव आयुष्यात खरं तर 'त्या' तिघींचं भेटणं बसंत नव्हतं, पण का कोण जाणे ती त्यांना भेटलीच. अर्थात, तिच्या क्लब मध्ये! त्याचा काय अर्थ होता तो नंदिता आणि दीपाला त्यांच्यापरीनं सम जलाच, पण त्या भेटीला मेघानं होकार देण्यामागचा तिचा 'एकटेपणा' मात्र त्यांना तेव्हा जाणवला नाही इतकं मात्र खरं.

दीपा तर सरळ सरळ आपल्या स्वत:च्या एकटेपणाचं उत्तर या भेटीत शोधत होती, हे स्वच्छच होतं. कारण या भेटीचा घाटच तिनं घातला होता. आणि कॉलेजच्या स्नेहसंमेलनाला तू जाच असा आग्रह जेव्हा सुजयनं धरला होता, तेव्हा त्याचीही तीच भावना होती, हे तिला कळलंच होतं.

नंदिताचं मात्र वेगळं होतं. तिच्या आजच्या बदललेल्या परिस्थितीत– म्हणजे सामाजिक आणि मुख्यत्वेकरून आर्थिक – तिला आपल्या स्वत:ला अजमावायचं होतं.

ते काहीही असो, त्या तिघी त्या दिवशी तिथं भेटल्या– मेघाच्या वरळीच्या क्लबमध्ये. त्या तिघी तिथं असताना मेघाच्या नित्याच्या ओळखीच्या मैत्रिणी तिला तिथं भेटल्याच; पण कटाक्षानं तिनं त्यांची दीपा–नंदिताशी ओळख मात्र करून दिली नाही. याची त्या दोघींना जाणीव झाली. आणि त्यांनी निग्रहानं ती दूर सारली.

पण त्या भेटीत तेवढंच झालं नाही. गप्पांच्या ओघात दीपानं सुजयच्या हुद्द्याचा आणि स्वत:च्या करिअरचासुद्धा अनेकदा अभिमानपूर्वक उल्लेख केला आणि मेघाला कुठंतरी नक्की जाणवलं की दीपा कॉलेजच्या तुलनेत काही पायऱ्या वर चढली आहे.

नंदितानं मात्र तसा सावधंच पवित्रा घेतला. म्हणजे दहिसर ते अंधेरीचा तिचा प्रवास सांगताना तिला अभिमान वाटत नव्हता असं नव्हे, पण ती जाणून होती की, अजून किती मोठा पल्ला पुढं बाकी आहे. असं असून सुद्धा नंदिता उत्कर्षाच्या फास्ट ट्रॅकवर आहे याची नोंद दीपानं आणि खासकरून मेघानं घेतलीच.

त्या भेटीत इतकं नक्की झालं–

मेघाची सुपीरिऑरिटी कायम राहिली; पण तिला एवढं मात्र नक्की कळलं की दीपा आणि नंदिता सुद्धा प्रगतीपथावरच आहेत. त्या दोघींशी खरी मैत्री व्हायची शक्यताही तिला दिसली.

दीपाला एक ग्रुप मिळाला.

नंदिताचा आत्मविश्वास वाढला.

मग नंतरच्या भेटी मेघाच्या क्लबशीच मर्यादित राहिल्या नाहीत. दीपानंच त्या घडवाव्यात अशीही परिस्थिती राहिली नाही. प्रत्येक भेटीत पुढची तारीख ठरत गेली आणि त्या वारंवार भेटू लागल्या.

+ + +

मेघा–आशुच्या वरळी सी–फेसवरच्या प्रशस्त फ्लॅटवर एक दिवस त्या जमल्या. मेघा आणि दीपा गप्पा मारता मारता नंदिताची वाटही बघत होत्या आणि कायम वेळेवर येणारी नंदिता त्या दिवशी तब्बल दीड तास उशिरानं आली.

''सॉरी, एकदा मंत्रालयात गेलं ना, की आपली वेळ आपल्याच हातात राहत नाही.'' – नंदिता.

''का गं? आज एकदम मंत्रालयात?'' – मेघा

''अगं, इंडस्ट्रीज सेक्रेटरींना भेटलो शेखर आणि मी. अंधेरीचा गाळा फारच छोटा पडायला लागला ना. म्हणून शेखर म्हणाला आपलीच स्वत:ची फॅक्टरी बांधूया– जव्हारला. शासनालाही त्या मागासलेल्या भागाचा विकास करायला, असे उद्योजक हवेच आहेत ना. सेक्रेटरी साहेबांनी स्वत:च इंटरेस्ट घेतलाय. म्हणाले जमीन आम्ही देतो. फायनान्सेस पण ॲरेंज करतो. तुम्ही लगेच कामाला लागा. ते करायचं तर आहेच गं, पण फार मोठी उडी आहे. पण शेखरनं एकदा मनावर घेतल्यावर आणि शासनाचा भक्कम पाठिंबा असताना यश नक्कीच आहे. पण मेहनतसुद्धा.'' – नंदिता.

''वॉव. हार्टी काँग्रॅच्युलेशन्स् नंदिता'' – मेघा आणि दीपा एकत्रच.

''ए, वुई मस्ट सेलेब्रेट हं. थिस् इज् रिअली स्पेशल'' – मेघा.

''म्हणजे काय? प्रश्नच नाही''– दीपा.

''अगं, आता कुठं सुरुवात आहे. खूप अंतर अजून कापायचं आहे'' – नंदिता.

पण नंदिताचं ऐकलं तर ती मेघा कुठची? तिथल्या तिथं तिनं आशुला फोन लावला आणि दीपा आणि मेघाला त्यांच्या नवऱ्यांना लावायला लावला. येणाऱ्या शनिवारी रात्री सेलेब्रेशन पार्टीसुद्धा ठरवली– तिच्याच घरी.

तशीच पार्टी मग दीपानं ठेवली, तिच्या नव्या कोऱ्या पवईच्या ३० व्या मजल्यावरच्या आलिशान फ्लॅटमध्ये.

\+ + +

त्या कॉलेजच्या हीरक महोत्सवी समारंभालासुद्धा १५–१६ वर्षं होऊन गेली, पण त्या निमित्तानं त्या तिघींच्या भेटी महिन्यातून दोनदा तरी होऊ लागल्या. काही नैमित्तिक प्रसंग सोडले, तर त्यांच्या प्रत्येक भेटी या त्या तिघींच्यातच सीमित होत्या. सुरुवातीला एकमेकींचा अंदाज घेण्यासाठी आणि घेता घेता हळूहळू त्यांना या भेटींची सवयच जडली. शिवाय रोजची

फोनाफोनी चालू होतीच. तिघींचे कित्येक विषय आता कॉमन होऊ लागले. म्हणजे आर्थिक उन्नती, मुलांच्या शाळा–कॉलेजांतील प्रगती, नवनवीन खरेद्या वगैरे. मजेत चालले होते दिवस.

\+ + +

नंदिता–शेखरचा व्याप वाढतच होता. जव्हारनंतर दोन नवीन फॅक्टऱ्या झाल्या. सिल्वासा आणि दमणला. आणि मग 'तो' दिवस आला. अशाच नेहमीप्रमाणे तिघी भेटल्या होत्या तेव्हा नंदिता म्हणाली, ''मेघा, आपण आता नेबर्स होणार बरं का,''

मेघा एकदम् गोंधळून, ''म्हणजे? मला नाही कळलं.''

''अगं, सेंचूरीचा नवा प्रोजेक्ट आहे ना, स्काय व्ह्यू, प्रभादेवीला? त्यात पेंट हाऊस घेतलंय आम्ही. येत्या दिवाळी अगोदर होऊ मूव्ह. म्हणजे तसे शेजारीच होणार ना आपण?'' – नंदिता.

''अरे व्वा. काय छान बातमी दिलीस. म्हंजे आता आम्ही पवईकरच गावकुसाबाहेरचे राहणार. पण जोक अपार्ट– फारच मस्त झालं गं, नंदिता'' असं दीपा म्हणाली. आणि ते बरंच झालं. मेघाला भानावर यायला तेवढाच अवसर मिळाला.

''ग्रेट न्यूज, नंदिता. खरंच फार आनंदाची बातमी आहे. हार्टी काँग्रॅच्युलेशन्स टू यु ॲन्ड शेखर''– मेघा.

आणि मग, स्पष्टवक्तेपणाचा एरवी स्थायी भाव नसलेली दीपा म्हणाली, ''मेघा खरंच तुला कशाचा आनंद झाला आहे? नंदिताच्या उत्कर्षाचा, का आता ही मैत्रीण खरी माझ्या तोलामोलाची झाली आहे या रियलायझेनचा का नुसताच तोंडदेखला?''

मेघाला लागलेला हा दुसरा शॉक– केवळ दहा मिनिटांच्या अवधीत! आता मेघाला बोलणं भागच होतं. पण, त्या आधीच नंदिता म्हणाली, ''अगं असं काय बोलतेयंस दीपा? तिनं साधं काँग्रॅच्युलेशन्स केलंय आणि तुला त्यात काय गं विपरीत दिसलं?''

''हूंऽऽ जणू काही तुला काहीच दिसलं नाही!'' – दीपा.

''जाऊ दे गं. व्हाय कॉप्लीकेट द इश्यू? तिनं अभिनंदन केलं आणि मी स्वीकारलं. विषय संपला''– नंदिता.

आता मात्र मेघाला काहीतरी प्रतिक्रिया देण्यावाचून गत्यंतरंच नव्हतं. म्हणून ती म्हणाली, ''दीपा, तू मला प्रश्न विचारलास म्हणून उत्तर देते – मला खरंच मनापासून आनंद झाला आहे.''

''ठीकंय''– दीपा.

त्यानंतर होणाऱ्या गप्पा जुजबीच असणार होत्या आणि त्या तशा झाल्या आणि पुढच्या भेटीचा वादा पक्का करत त्या तिघी पांगल्या.

\+ + +

दीपानं विचारलेले प्रश्न नंदिताला स्पर्शून गेलेच होते. त्यामुळं तिच्या मनात ते अनुत्तरीतच राहिले – अगदी मेघाच्या उत्तरानंतरही.

दीपाचा तर प्रश्नच नव्हता. तिला खात्रीच होती की तिच्या प्रश्नांची उत्तरं मिळाली नव्हती.

मेघा मात्र खरं उत्तर मनातल्या मनात शोधत राहिली. पण तिलाही ते मिळालंच नाही!

\+ + +

आज चाळीस वर्षं झाली त्यांच्या ओळखीला. मैत्रीलासुद्धा तीन दशकं. त्या अजूनही तशाच नित्य भेटताहेत. सतत संपर्कात आहेत. पण ती खरंच मैत्री आहे का? त्यात एकमेकींबरोबर केलेली मजा आहे. देश–परदेशातल्या ट्रीपा आहेत. कुटुंबासमवेत नैमित्तिक पार्ट्यासुद्धा आहेत. पण एकमेकींच्या सुख–दु:खांची फारशी देवघेव नाही. एकमेकींच्या मदतीची गरजही नाही आणि तसे प्रसंगही नाहीत. साहित्य–कला वगैरेंच्या रुचीसुद्धा फारशा समान नाहीत. आयुष्य, समाज, जगाच्या विषयांवर संवादही नाहीत. तरीही जगासाठी चाळीस वर्षांची मैत्री आहे. एकदा केव्हातरी दीपानं निर्माण केलेलं वादळही पेल्यातलंच होतं आणि त्यांच्या मैत्रीचा सागरही बशीत मावणाराच आहे.

दीपा अजूनही एकटीच आहे.

मेघा सुद्धा.

आणि नंदिताही!

***अभय वळसंगकर***, पुणे

*मोबाइल : ९०११०४०६१०*

# ‘तरुण तेजपाल’ जजमेंटच्या निमित्ताने

मनीषा तुळपुळे, प्रीती करमरकर

**मे महिन्यात तरुण तेजपाल खटल्याचा सेशन कोर्टात निकाल लागला. या वादग्रस्त निकालाच्या संदर्भात स्त्री मुक्ती संपर्क समिती, पुणे तर्फे २१ जून २०२१ रोजी चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. त्यात ॲड. मनीषा तुळपुळे यांनी या निकालपत्रावर चिकित्सक मांडणी केली होती ती इथे लेख स्वरुपात देत आहोत.**

दि. २१ मे २०२१ रोजी मापुसा (गोवा) येथील सेशन कोर्टाने तरुण तेजपाल केसमध्ये निकाल दिला जो खूप चर्चेत आहे. एकूणच महिलांवर होणारे अत्याचार आणि विशेषत: लैंगिक अत्याचार, त्यासाठीचे कायदे, अंमलबजावणी, पोलिस व न्याय यंत्रणेचा दृष्टीकोन या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. त्या अनुषंगाने या निकालातील जाणवलेल्या काही महत्त्वाच्या बाबी व विश्लेषण आपणा सर्वांच्या विचारार्थ चर्चा व कार्यवाही यासाठी आपल्यापुढे ठेवत आहोत. एकूण ५२७ पानांचे हे निकालपत्र समोर आहे. इतर दस्तऐवज नसल्याने निकालपत्रात जे म्हटले आहे, त्यावरच आधारित ही मांडणी आहे.

**पार्श्वभूमी**

गोव्यामध्ये ७ ते ११ नोव्हेंबर २०१३ या काळात ‘थिंक फेस्ट’ हा कार्यक्रम तहलका तर्फे आयोजित केलेला होता. तेव्हा तहलका डॉट कॅामचे मुख्य संपादक तरुण तेजपाल यांनी तहलका मध्येच काम करणाऱ्या एका महिला पत्रकाराचा विनयभंग केला आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला असे आरोप झाले. या बातमीची दखल घेऊन गोव्याच्या पोलिसांनी प्राथमिक चौकशी सुरु केली. त्यात त्यांना असेही समजले की सदर पीडित पत्रकाराने ‘तहलका’च्या कार्यकारी संपादक शोमा चौधरी यांना या प्रसंगाची संपूर्ण माहिती देणारी मेल पाठवली होती. पोलिसांनी ताबडतोब शोमा यांना ही माहिती पाठवण्यास सांगितले. शिवाय इतरही सूत्रांकडून माहिती मिळवली. या सर्व तपासाच्या आधारे प्राथमिक चौकशीतून आरोपीने गुन्हा केला असे प्रथमदर्शनी लक्षात आले व तशी तक्रार पोलिस निरिक्षक सुनिता सावंत यांनी दखल केली.

**खटल्याचा तपास आणि साक्षी पुरावे**

दि. ७-११-२०२१ रोजी हॅाटेल ग्रँड हयात (बांबोलिन) येथे अमेरिकन अभिनेता रॅाबर्ट दी नीरो यांना त्यांच्या खोलीत जाऊन भेटण्यासाठी, तरुण तेजपाल या महिला पत्रकाराला लिफ्टमधून घेऊन गेला. लिफ्टमध्ये त्याने तिचा विनयभंग तसेच  बलात्कार केल्याचा आरोप आहे. पोलिसांनी तपासात अनेक साक्षीपुरावे गोळा करून कोर्टाला सादर केले. त्यात फिर्यादी पक्षाने एकूण ७१ साक्षीदार तपासले. गुन्हा घडण्याच्या वेळचे संबधित लिफ्टबाहेरचे सीसीटीव्ही फूटेज, या महिला पत्रकाराने तहलकाच्या कार्यकारी संपादकाकडे दिलेली तक्रार आणि तरुण तेजपाल याने दिलेला अधिकृत व वैयक्तिक माफीनामा असे सर्व पुरावे दिले.

कोर्टामध्ये तक्रारदार महिलेने साक्ष देताना तिच्यावर लिफ्टमध्ये गुदरलेला प्रसंग सांगितला. आरोपीने तसे करू नये असे ती वारंवार विनवत असल्याची माहिती तिने कोर्टाला दिली. या प्रसंगाची माहिती तिने आपल्याला सांगितल्याचे साक्षीदारांनीही कोर्टात नमूद केले. आरोपीने त्याच्यावरील आरोप साफ नाकारले. त्याने त्याची बाजू मांडण्यासाठी चार साक्षीदार, व्हॅाट्सअॅप मॅसेजेस, इ मेल वगैरे कोर्टात सादर केले. तक्रारदार महिला म्हणते तसे काही घडले नाही. लिफ्टमध्ये तर काहीच झाले नाही. दुसऱ्याच एका ठिकाणी तिने माझ्यासोबत दारु पिऊन थोडीशी गंमत केली होती एवढेच आरोपीने बचावात सांगितले. त्यात तक्रारदार महिलेनेच तिच्या लैंगिक अनुभवांबद्दल सांगितल्याचे आरोपी म्हणाला.

**आरोपीची मुक्तता कशाच्या आधारावर?**

निकालपत्रात कोर्टाने म्हटले आहे की फिर्यादी पक्षाने सबळ पुरावे सादर केले नाहीत. तसेच तक्रारदारासकट त्यांनी सादर केलेले साक्षीदार विश्वासार्ह नाहीत तर आरोपीचा बचाव व त्याने सादर केलेले साक्षीदार विश्वासार्ह आहेत म्हणून कोर्टाने आरोपीला संशयाचा फायदा देऊन गुन्हयाच्या आरोपातून मुक्त केले.

**कोर्ट प्रक्रियेतील काही आक्षेपार्ह मुद्दे**

पीडितेच्या ‘चारित्र्याचा पंचनामा’ ही यातली सर्वात गंभीर बाब. या प्रक्रियेकडे पाहता असे लक्षात येते की पीडित

महिला आणि तिच्या साक्षीदारांनी साक्ष दिली आणि ते उलट तपासणीला सामोरे गेले. तिने घडलेला प्रसंग सांगितला आणि साक्षीदारांनी तिने तसे घडल्याचे त्याच रात्री त्यांना सांगितले होते असे नोंदवले. त्यात काही छोटया विसंगती आहेत. पण मूळ गुन्हयाच्या घटनेला धक्का लागेल असे त्यात काही नाही. तरीही कोर्टाला पीडिता आणि तिचे साक्षीदार विश्वासार्ह वाटत नाहीत. या उलट आरोपीने साक्ष दिलेलीच नाही. त्याने CRPC ३१३ खाली स्टेटमेंट दिले आहे. ज्याला पुराव्याच्या दृष्टीने (Evidential Value) काहीही किंमत नाही. त्याने आणलेले साक्षीदार या स्टेटमेंटवर आधारित साक्ष देतात, ते मात्र कोर्टाला विश्वासार्ह वाटतात. मुळात स्टेटमेंट ही गोष्ट पुराव्यात ग्राह्यच नाही तर त्यावर आधारित साक्षी ग्राह्य कशा मानल्या गेल्या? फिर्यादी किंवा आरोपी जे कोर्टात सांगत आहेत, त्यासाठी प्रत्यक्ष पाहिलेले कुणी साक्षीदार नाहीत. दोन्हीकडच्या साक्षी ऐकीव साक्षी (क्शरीरू) आहेत. मग फिर्यादीचे साक्षीदार विश्वासार्ह नाहीत आणि आरोपीचे आहेत हा निष्कर्ष कसा काढला जातो?

**आरोपीच्या माफीनाम्याकडे दुर्लक्ष –**
पीडितेने तहलकाच्या कार्यकारी संपादक शोमा चौधरी यांना दिलेली तक्रार, आरोपीने दिलेला अधिकृत माफीनामा आणि वैयक्तिक माफीनामा कोर्टाच्या रेकॉर्डवर आहे. साक्षीदारांनी याला दुजोरा दिला आहे. पण आरोपीचे म्हणणे असे की हा माफीनामा माझ्याकडून जबरदस्तीने घेतल्यामुळे कायद्यानुसार हा कबुलीजबाब म्हणून ग्राह्य मानता येणार नाही. साक्षीदार शोमा सुद्धा म्हणतात की पीडितेच्या दबावामुळे तो माफीनामा त्यांनी स्वत:च आरोपीच्या वतीने तयार केला. हे सर्व 'प्रशासकीय हेतूने' केले कारण पीडितेची 'पॉश' खालील तक्रार क्लोज करणे आवश्यक होते. या माफीनाम्यात पीडितेने सांगितलेल्या प्रसंगाचा उल्लेखही नाही. कोर्टाने हा मुद्दा उचलून धरत हा माफीनामा गैरलागू ठरवला. खरे म्हणजे शोमा यांनी आरोपीवर दबाव आणून माफीनामा दिला, अशी साक्ष दिल्यावर तिलाच फितुर म्हणून घोषित करण्यासाठी सरकारी पक्षाने अर्ज द्यायला हवा होता, तिने आरोपीला मदत केली म्हणून तिला सहआरोपीच करायला हवे.

कोणतीही माफी तक्रारीच्या अनुषंगाने दिली जाते, या साध्या गोष्टीची दखल कशी कोणी घेत नाही? हा तांत्रिक अर्थाने कबुलीजबाब नसला तरी महत्वाचा पुरावा नक्कीच आहे. एकीकडे कार्यकारी संपादक पीडित महिला आणि इतर स्टाफला सांगते की महिलेची तक्रार खरी असल्याचे आरोपीने स्वीकारलेच आहे म्हणून विशाखा खाली चौकशीची गरज नाही तर दुसरीकडे ती म्हणते की माफीनामा दबावाखाली दिला. हा दुटप्पीपणा न्यायालयाच्या लक्षात आला नाही का?

**पीडितेची वैद्यकीय तपासणी – नेमकी कशासाठी?**
कोर्टाने आणखी एका गोष्टीवर बोट ठेवले आहे ते म्हणजे पीडितेची वैद्यकीय तपासणी. ही तपासणी करून घेण्यास तिने का नकार दिला? पोलीसांनी तसे पत्र देऊनही ती का आली नाही? मेडिकल' केली असती जखमेचे निशाण व गुन्हयाचे पुरावे मिळाले असते असे मुद्दे कोर्टाने उपस्थित केले, ज्याबद्दल बोलणे फारच आवश्यक आहे. मुख्य म्हणजे बलात्कार झाला की नाही, तिने प्रतिकार केला की नाही वा तिच्या शरीरावर जखमा आहेत की नाही याची उत्तरे मिळवण्यासाठी वैद्यकीय तपासणी करत नाहीत. पीडितेला वैद्यकीय उपचारांची गरज असेल का ते पाहण्याचा वैद्यकीय तपासणी हा एक भाग आहे. वैद्यकीय तपासणीचा अहवाल आरोपपत्रात जोडणे हे पोलिसांना बंधनकारक आहे. वैद्यकीय तपासणी करून घेणे हे पीडितेला अनिवार्य नाही म्हणूनच तर या अहवालात पीडितेची संमती घेण्यासाठी एक फॉर्म जोडलेला असतो. पोलिसांनी पीडितेला वैद्यकीय अधिकाऱ्यांसमोर न्यायचे असते. तिची संमती नसेल तर वैद्यकीय अधिकाऱ्याने या गोष्टीचे महत्व तिला समजावणे, समुपदेशकाकडून समुपदेशन करणे अपेक्षित आहे. तरीही तिचा नकार असेल तर तसे फॅर्ममध्ये लिहून तिची सही घेऊन व स्वत:ची सही शिक्का मारून त्याची प्रत पीडितेला व पोलिसांना पाठवणे आवश्यक असते. पण पीडितेला असे समजावून सांगण्याची प्रक्रियाच होत नाही. दुसरे म्हणजे वैद्यकीय तपासणीत बलात्कार झाल्याचा पुरावा मिळतो का? तर तसा पुरावा मिळतोच असे नाही. तिच्या शरीरावर जखमा सापडल्या तरच तिने विरोध केला म्हणजे तिची संमती नव्हती अन्यथा होती असा निष्कर्ष काढता येत नाही. तिचा प्रथमच शारिरीक संबंध आला का ती शारिरिक संबंधना सरावलेली आहे या निष्कार्षांसाठी वैद्यकीय तपासणी नाही.

वैद्यकीय तपासणीत पीडिता हिस्ट्री देते. त्याची नोंद करणे, निरिक्षण नोंदवणे व 'मेडिकल ओपिनियन' देणे हे काम असते. वैद्यकीय अधिकरी हा स्वतंत्र साक्षीदार असतो, या अहवालासंबधी एक तज्ञ म्हणून तो कोर्टात माहिती देतो.

**पीडितेकडून विलंब?**
कोर्टाने पीडितेबद्दल आणखी एक आक्षेप नोंदवला आहे, तो म्हणजे तिने पोलीस तक्रार करून वैद्यकीय प्रक्रिया वगैरे त्वरेने केली नाही. खरे म्हणजे ती सांगते की या सर्व घटनेचा बसलेला धक्का, त्यातून बाहेर पडून काय करायचे याचा विचार करणे हे कठीण होते. आरोपी सत्ता स्थानावर होता. तिने व्यावसायिक जबाबदाऱ्या पार पाडल्या नसत्या तर तो ठपका ठेवला गेला असता, रोजी रोटी गेली असती. घरी तशी परिस्थिती नव्हती. आधी तिने कामाच्या ठिकाणी तक्रार केली. पण त्याची तड लागेना तेव्हा पोलीस स्टेशन गाठले. शिवाय तक्रार केल्यावर आरोपी काय करेल ही तिची भीती नंतर खरी ठरली. मात्र आरोपीनेही तत्परता दाखवलेली नाही. एफआयआर दाखल झाल्यावर तो रद्द करण्यासाठी तोही त्वरेने कोर्टात गेलेला नाही. आरोप दाखल केल्यावर तो दाद मागायला कोर्टात

केला. मात्र त्याबद्दल कोर्ट काही बोलत नाही.

७ व ८ नोव्हेंबर २०१३ ला घटना घडली. २१ नोव्हेंबर २०१३ ला तक्रार दाखल झाली व २१ मे २०२१ ला निकालपत्र आले. ही दिरंगाईची गोष्ट नाही का? याची जबाबदारी कोणाची?

**पीडितेने कसे वागायला हवे होते?**

तक्रारदार महिलेचे वर्तन पीडितेसारखे नव्हते असे म्हणत कोर्टाने तिच्यावर अनावश्यक टिप्पणी केली आहे. तिच्यावर आघात झाला आहे किंवा ती भयग्रस्त आहे असे तिच्या वर्तनावरुन वाटत नाही असे अत्यंत व्यक्तिनिष्ठ मत सेशन कोर्टाने नोंदवले आहे. हा निकाल म्हणजे बलात्कार पीडित महिलांनी कसे वागावे यासाठीचे manual असल्यासारखा आहे, असा कडक शेरा मुंबई हायकोर्टाने त्यावर मारला आहे.

**अन्य आक्षेप**

पीडितेने कायदेविषयक सल्ला घेतला यावरही सेशन कोर्टाने बोट ठेवले आहे. पीडितेला कायदेविषयक सल्ला घेण्यास कायद्याने आडकाठी आहे का? तर नाही. कायदा काय सांगतो? दिल्ली डोमेस्टिक वर्कर्स युनियनने दाखल केलेल्या याचिकेत १९९५ मध्ये सुप्रिम कोर्टाने निकाल दिला आहे. यामध्ये कोर्ट आधुनिक न्यायव्यवस्थेची चर्चा करते जसे आरोपीसाठी रिफॉर्म्स आहेत, तसेच पीडितांसाठी पुर्नवसन आहे. पीडितांना त्यासाठी मोफत आरोग्य सुविधा, समुपदेशन कायदेविषयक सल्ला व नुकसान भरपाई मिळायला हवी. त्याच अनुषंगाने कायद्यात बदल झाले आहेत. पीडितेची वैद्यकीय चाचणी, कायदेविषयक मदत, नुकसानभरपाई याच्या तरतुदी आल्या आहेत पण अंमलबजावणी यंत्रणेतील लोकांची मानसिकता तशीच आहे. त्याचेच प्रतिबिंब या निकालपत्रात दिसते.

आरोपी व त्याच्या साक्षीदाराने सतत कोर्टाला सांगितले की तिचे अनेक पुरुषांशी लैंगिक संबंध आहेत, तिच्या लैंगिक आवडी निवडी विषयी ती गप्पा मारत असे, ती दारु पिते वगैरे. सरकारी पक्षाने यास जोरदार आक्षेप घेतला कारण या साठी तिच्या फोन मधील what's app चॅटचा वापर केला गेला व कोर्टाने आरोपीला ह्या चॅटचा access दिला ही गंभीर बाब आहे.

पीडितेच्या चारित्र्यासंबंधी आणि sexual History विषयी कोणतीही शेरेबाजी करु नये असे निर्देश आहेत. मात्र आरोपीतर्फे असा युक्तीवाद केला गेला की लैंगिक संबधाला संमती होती हे सिध्द करण्यासाठी तिच्या चारित्र्याचा, sexual History चा आधार घेता येणार नाही मात्र वस्तुस्थिती कोर्टापुढे आणण्यासाठी तसे करण्यास कायद्याने बंदी नाही. कोर्टाने ही बाब उचलून धरली. पण ट्रायलचा साधा नियम कोणीच लक्षात घेतला नाही, तो म्हणजे relevant facts विषयीचे कोर्टापुढे साक्षी पुरावे देताना हा जो काही प्रकार घडला त्याचा खटल्याशी काही संबंध नव्हता.

या शिवाय तिच्या प्रतिकाराचा पुरावा नाही, तिचे कपडे फाटले नाहीत, जखमा नाहीत, तिने काही अवयव हाताने का झाकले नाहीत? आरडा ओरडा का केला नाही? लिफ्टवर हात का आपटले नाहीत? लिटमधील इमर्जन्सी बटन का दाबले नाही? हे सर्व प्रश्न पीडितेला विचारले तेव्हा तिने सांगितले की हे अनपेक्षित होते आणि मी त्यांना तसे न करण्यासाठी विनवत होते. पण तिचे हे म्हणणे ग्राह्य मानायला कोर्ट तयार नाही. त्याचवेळी ती सांगते की त्याने मला पाठमोरी केले, जेणेकरुन तो काय करतो हे मला दिसू नये. त्यावेळेस तो काय करतो आहे हे कळावे आणि लिफ्ट थांबताच पळावे, याचाच मी विचार करते होते. पण असे कोणी म्हणत नाही की हा लिफ्टमध्ये इतक्या पटकन अशा कृती करतो म्हणजे हा सरावलेला दिसतो.

आरोपीच्या सर्व युक्तीवादात ती फेमिनिस्ट आहे म्हणून हा सर्व बनाव तिने रचला. असे आरोप करुन तिला फायदा मिळवता आला असता हेही सांगितले गेले. थोडक्यात आरोपीवर खटला आहे हे कुठे दिसतच नाही. तर पीडितेवरच खटला आहे आणि तेही एका फेमिनिस्ट व्यक्तीला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केल्याप्रमाणे खटल्याचे कामकाज झालेले वाटते.

**पुढे काय?**

दरम्यान निकालपत्रावर अपिल केले गेले आहे. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता गोवा सरकारतर्फे आपिलाचे कामकाज बघत आहेत. त्यांनी हायकोर्टात यातले काही महत्वाचे मुद्दे मांडले जसे की पीडितेच्या वागण्यावरची टिप्पणी, पीडितेच्या चारित्र्यावरचे आरोप, आरोपीचे वकील तिला अपमानास्पद प्रश्न विचारत असताना कोर्टाने बघ्याची भूमिका घेणे इत्यादि. उच्च न्यायलयाने अपीलासाठी परवानगी देत त्या संदर्भात तरुण तेजपाल यांना नोटीस बजावली आहे तसेच पीडितेच्या ओळखीबाबत निकालपत्रात असलेले तपशील काढून टाकायचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत.

एकूणच हे सर्व पाहिल्यावर आपण कुठे आहोत हे लक्षात येते. सर्वात महत्वाचे म्हणजे न्यायाधीश, वकील, पोलीस व वैद्यकीय अधिकरी यांचे gender sensitization आवश्यक आहे, लैंगिक गुन्ह्यासंदर्भात पितृसत्ताक मानसिकता सोडून संवेदनशीलतेने या कडे बघण्याचा दृष्टीकोन निर्माण होण्यासाठी अशी प्रशिक्षणे अनिवार्य असायला हवीत तसेच यंत्रणांच्या कामकाजाबाबत सोशल ऑडिटही व्हायला हवे. त्याआधी अशा प्रकारच्या निकालपत्रांचा अभ्यास मोठया प्रमाणात व्हायला हवा. जस्टीस वर्मा समितीच्या सुधारणांची अंमलबजावणी तसेच 'सेहत' सारख्या संस्थांनी केलेल्या अभ्यासांची दखल घेऊन योग्य ते बदल झाले तरच पुढची वाट सुकर होईल.

***मनीषा तुळपुळे***, *ठाणे*
*mtupule@gmail.com*
***प्रीती करमरकर***, *पुणे*
*preetikarmarkar@gmail.com*


(पान १५ वरून)

झाला पण लवकरच ते सहजीवन संपुष्टात आलं. अरुणाताईंचा खरा प्रदेश इथूनच सुरू होतो. बालपणी शालेय जीवनात 'मी काहीही चूक केली नाही. मी छडी खाणार नाही' म्हणून आपल्या भूमिकेवर ठाम राहणारी कावळेबाईंची छडी न खाणारी 'बंडखोर' अरुणा पुढे कॉलेज जीवनातही तशीच राहिलेली. अकरावीत साडी हा गणवेश अनिवार्य, पण अरुणाला त्या फुलपाखरु काळात साडी मुळीच नेसायची नव्हती. तो मुद्दा त्यांनी आपल्या काही मैत्रिणीसोबत मॅडमला पटवून देण्याचा प्रयत्न केला. कॉलेजला जायचं पण ड्रेस घालून. मॅडम शिक्षा करायच्या, दंड ठोकायच्या. पंधरा ऑगस्टला तर नोटीसच फिरवली गेली. साडी परिधान केल्याशिवाय शाळेत यायचं नाही. मैत्रिणी माघारी फिरलेल्या; पण बंडखोरी अंगात भिनलेली अरुणा आपल्या मतावर ठाम. शाळेत तर जायचं, भाषणही द्यायचं, हार मानायची नाही. साडी सक्तीची का? या प्रश्नाला समाधानकारक उत्तर नव्हतं. मॅडमनी फतवा काढला 'तुला झेंडावंदनाला उपस्थित राहता येणार नाही. तू नियमभंग केलास'. प्राचार्यांनी त्यावेळी विचारलं, 'अरुणा, साडी कुठाय?' 'सर, आज पंधरा ऑगस्ट, झेंडावंदन करण्याचा मला अधिकार आहे. आज मी इथे विद्यार्थी म्हणून नाही. तर एक नागरिक म्हणून आले. कुठल्याही भारतीय नागरिकाला कुठेही झेंडावंदन करण्याचा अधिकार तर आहेच ना ?' सर निरुत्तर. झेंडावंदन झालं, भाषणही झालं आणि अकरावीला साडी ऐच्छिक बाब म्हणून जाहीर झाली. अरुणाच्या प्रदेशात ही बंडखोरीची पेरणीच होती.

मी कुणाची तरी बायको फार नंतर, आधी मी माझ्या मुलांची आई आहे. माझ्या आईची लेक आहे. मी अरुणा आहे. माझं स्वतंत्र अस्तित्व आहे, ही जाणीव तीव्र असलेल्या अरुणाताई त्या दिवशी भल्या पहाटे अंगावरच्या वस्त्रानिशी घराबाहेर पडलेल्या अंगावरचं वस्त्र फाटलेलं, शरीर जखमी आणि मन पेटलेलं यातूनच एक ध्यास डोळ्यापुढं ठेवणारी कार्यकर्ती उभी राहते. स्वबळावर समाजव्यवस्थेत पिचलेल्या महिलांच्या घरी भक्कम आधार म्हणून उभ्या राहतात. आई आणि मुलींना बलस्थान ठरवून 'माहेर'सारखी संस्था उभी करतात. अठरा-अठरा तास झोकून काम करतात. महिलांच्या समस्यांना वाचा फोडणारे 'आकांक्षा' मासिक काढतात. प्रथमच अखिल भारतीय जल साहित्य संमेलन आयोजित करतात. त्यासाठी जपान, अमेरिकेसारख्या देशामध्ये पेपर वाचण्याची संधी घेतात. एक गाव एक पाणवठा, नामांतर, अश्वमेध यज्ञ, हुंडाविरोधी चळवळ, बलात्कार विरोधी चळवळ, परित्यक्त्या महिला परिषद अशा अनेक चळवळीच्या मुशीतून तयार होते, अरुणा नावाची 'चळवळी बाई' अशा वैविध्यपूर्ण कामगिरीचा चढता आलेख पायाखालून गेला आहे आजवर. तरी संपादक, लेखक, सामाजिक कार्यकर्ती यात उठून दिसतात त्या चळवळीतल्या अरुणाताईच. विदर्भातल्या पहिल्या स्त्री प्रकाशक. जगानं नोंद घेतलेल्या जलसाहित्य संमेलनासारखंच परत त्या स्वतःला 'दक्षिणायन'च्या चळवळीत स्वतःला वाहून घेतात. दक्षिणायनची दोन दिवसीय नॅशनल कॉंफरन्स नागपूरला घ्यायचे ठरले, तेव्हा डॉ. गणेश देवी यांनी त्यांच्या शीरावर मुख्य आयोजकाची धुरा सोपवली, ती त्यांनी लीलया पेलली. त्या

## स्मरणांजली

**सतीश काळसेकर**



लघुअनियतकालिकांच्या चळवळीतील एक बिनीचे शिलेदार अशी ओळख असणाऱ्या सतीश काळसेकर यांचं निधन चटका लावणारं आहे. सकस साहित्यातून समाजमनाला आकार द्यायचा प्रयत्न करणाऱ्या लेखक-समीक्षकांच्या यादीत सतीश काळसेकरांचं स्थान फार वरचं होतं. 'आपले वाङ्ममयवृत्त' या वाङ्मयीन नियतकालिकाचे ते अनेक वर्षं संपादन करत होते. इंद्रियोपनिषद् (१९७१), साक्षात (१९८२), विलंबित (१९९७) हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'वाचणाऱ्याची रोजनिशी' या त्यांच्या पुस्तकांविषयीच्या पुस्तकाला २०१० चा साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला होता. साहित्य हा श्वास असलेल्या या मनस्वी व्यक्तिमत्वाला 'मिळून साऱ्याजणी'ची आदरांजली!

**विलास चाफेकर**



समाजसेवक, खेळाडू, पत्रकार, शिक्षक आणि नाटककार असं बहुआयामी व्यक्तिमत्त्व असणाऱ्या विलास चाफेकर या साऱ्याजणीच्या स्नेह्याचं नुकतंच दुःखद निधन झालं. लहानपणापासून जडलेले आजार आणि वास्तवाचे चटके सोसल्यावरही त्याच्या वेदनांना कटुतेऐवजी करुणेची किनार लाभली, हे त्याचं मोठेपण. प्रखर इच्छाशक्ती, दुर्दम्य आत्मविश्वास, स्पष्ट विचार आणि समाजाविषयी अपार पण डोळस माया या गुणांमुळे त्याचा लोकसंग्रह अमाप होता. हातगाडी व्यावसायिकांसाठी जाणीव संघटना, वंचित विकास संस्था, वेश्या वस्तीतल्या मुलांच्या शिक्षण व संगोपनासाठी नीहार संस्था, आदिवासी मुलांसाठी चंडिकादेवी वसतीगृह, लातूरमध्ये सबला महिला केंद्र, एकाकी स्त्रियांसाठी अभया प्रकल्प अशा अनेकानेक संस्थांचं जाळं त्यानं उभारलं, त्यानं उभारलेल्या संस्थांमधून हजारो कार्यकर्ते त्याचं काम पुढं नेत आहेत. ते कार्य तसंच तेवत ठेवण्यात हातभार लावणं ही विलासला खरी आदरांजली!

दोन वर्षात असंख्य कार्यक्रम घेतले. शेतकऱ्यांना 'साल्या' शिवी देणाऱ्या मंत्र्यालाही सोडले नाही. गांधीचा पुतळा केवळ द्वेषापायी मध्यप्रदेशात उखडला गेला, तेव्हा संविधान चौकात मुर्दाबादचे नारे लावून विरोधकांना विचारात पाडणाऱ्या अरुणाताई त्यांचा प्रदेश आणखीच सुपीक करून जातात.

दक्षिणायनसाठी देशभरातून पाच हजार कार्यकर्ते जमतात आणि दीक्षाभूमी ते धनवटे नॅशनल कॉलेजपर्यंतचा परिसर दणाणून सोडतात. एकाच वेळी नागपूरातल्या पंचवीस महाविद्यालयातून एकाच वेळी स्वातंत्र्य आणि संविधान यावर चर्चा आयोजित होणारी देशातली ही एकमेव घटना असावी. अरुणाच्या प्रदेशाचं वैशिष्ट्य हे असं आहे.

अभिव्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी होत असताना अरुणाताई स्पष्ट बोलतात प्रत्यक्ष वागतात, लिहितात. साहित्याकडे, कलाकृतीकडे त्या गांभीर्याने पाहतात. श्रमजीवींसाठी दूरदृष्टीने धडपडतात. निरपेक्षवृत्तीनं जगतात. नाही म्हणायचं धैर्य ठेवतात. जाब विचारण्याची हिंमत ठेवतात. संकटावर संकट येतात त्याला शिताफीनं हुलकावणी देत अरुणाचा हा प्रदेश समृद्ध होत आहे. त्याचं नंदनवनच होत आहे.

स्त्री ही स्वतंत्र असून स्वबळावर आपलं स्वतंत्र जग उभारू शकते, हा विश्वास त्यांना आहे. म्हणून त्या लिहितात मागून येणाऱ्या पिढ्यांसाठी, मनामनात सूर्य पेरून ठेवण्यासाठी त्या लिहितात. लिहिणं म्हणजे जतन करणं, चिरंतन होणं, हेही अरुणाताईंनी जपलं. लेखनातून त्यांच्या 'विमुक्ता', 'मुन्नी' अशा कादंबऱ्या जन्माला येतात. 'विमुक्ता'मध्ये बसू नावाच्या कमालीच्या संवदेनशील स्त्रीने आपल्या जीवनमार्गावर वाटचाल करताना केलेल्या संघर्षाची अंतर्मुख करणारी कथा आहे. वाट्याला आलेल्या दु:ख भरल्या प्रसंगावर मात करून जिद्दीने आयुष्याला सामोरे जाण्याचे शिक्षण देणारी, विशेषत: स्त्रीचे सबलीकरण करण्याची क्षमता बाळगणारी ती कादंबरी आहे. त्यांची 'मुन्नी' म्हणजे अतिशय धीट, रोखठोकपणे उभे केलेले वेश्यावस्तीमधले हादरवून टाकणारे बीभत्स वास्तव जसे या कादंबरीत आहे; तसेच एका ध्येयवादी बेडर समाजसेविकेची, त्या बीभत्स वास्तवाला छेद देऊन त्यातूनच एक तरी तेजस्वी मूर्ती घडवण्यासाठी चाललेली कृतिशील यशस्वी झुंजही यामध्ये आहे.

'माझा लेखनाचा गाभा स्त्रीकेंद्रीच आहे. मला प्रत्येक स्त्रीमध्ये काहीतरी वेगळं दिसतं आणि ते मी शोधण्याचा, टिपण्याचा प्रयत्न करते. युगानुयुगे स्त्रीच्या नशिबी हे असले भोग का?' असा प्रश्न अरुणा सबाने आपल्या लेखनातून विचारतात.

वेश्यावृत्ती हा समाजाचा आद्य व्यवसाय आहे. तो टीकेचा, दुर्लक्ष करण्याचा तर काहींच्या गरजेचा विषय. 'वेश्या ही घरंदाज स्त्रियांच्या अब्रूची सर्वात मोठी संरक्षक आहे', असे बर्ट्रांड रसेलने म्हटले आहे. पण या संरक्षक स्त्रीची स्वत:ची काही दु:खं, वेदना आणि व्यथा आहेत ही गोष्ट फारशी कोणाच्या गावी नाही. अरुणाताई त्या गावात वावरतात आणि त्या स्त्रियांची वेदना बोलकी करतात. शिवाय, समजूतदार म्हणवणाऱ्या घरातल्या स्त्रियांचेही प्रश्न असतात. त्यांच्यातील वाद. त्यांची मारलेली मनं आणि फोडून काढलेले देह असतात. आपली कुटुंबव्यवस्था केवळ व्यक्तींना संरक्षण देत नाही. तिला ती प्रसंगी कैदीही बनवते. त्यांच्या घरांना दारे असतात; पण बाहेर पडण्याचा रस्ता नसतो. अरुणाताई याही स्त्रियांना भेटतात आणि त्यांची कुचंबणा समजून घेतात त्यांच्या मनात सूर्य पेरत जातात. कारण, त्यांना माध्यान्हाचा तळपता प्रखर सूर्य बघण्याचा ध्यास लागला आहे.

***मंजुषा सावरकर,*** *नागपूर.*
*मोबाइल : ९४२३४११२५६*

---

(पान २३ वरून)

त्यांना मिळाला. अर्थात, मतदानाच्या निर्णयाबाबत कुटुंबातील पुरुषांचे मत हे निश्चितपणे प्रभाव टाकणारे असते. मतदाराच्या भूमिकेतून निर्णयप्रक्रिया सहभागाकडे जाणे स्वातंत्र्यानंतर खूप लवकर होणे आवश्यक होते. जागतिक पातळीवरही महिलांच्या निर्णय प्रक्रियेतील  सहभागात भारत खूप मागे आहे. महिला सबलीकरणाची भाषा. सबलीकरण हा धोरणामधला कळीचा शब्द झाला आहे. पण महिलांचा निर्णयप्रक्रियेत सहभाग हा सबलीकरणाचा कणा आहे, हे कसे विसरले जाते? म्हणूनच १२ सप्टेंबरला या बिलाला पंचवीस वर्षे होत असताना सर्वच राजकीय पक्षांनी आरक्षणाचा आग्रह धरणे अत्यावश्यक झाले आहे. सत्ताधारी भाजपाने निवडणूक जाहीरनाम्यात दिलेल्या आश्वासनानुसार लोकसभेत हे बिल मंजूर करणे ही त्यांची नैतिक आणि राजकीय आणि देशाच्या लोकशाही प्रक्रिया संदर्भात अत्यावश्यक जबाबदारी झाली आहे.

खरंतर आरक्षणाला विरोध करायचे काही कारण नाही. स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षांत महिलांनी पूर्ण भारतभर स्वतःच्या क्षमता अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही दाखवून दिलेल्या आहेत. देशाची आर्थिक धोरणं ही कधीच सर्वसामान्यांच्या हिताची नव्हती आणि त्यामुळे एका बाजूला आर्थिक धोरणांशी तोंड देत दुसऱ्या बाजूला वर्ग, जात, लिंगाच्या भेदभावाला तोंड देत आणि त्याच बरोबर विविध प्रकारच्या धर्म, अस्मितांना, त्यातून निर्माण झालेल्या प्रश्नांना तोंड देत भारतीय महिलांनी ज्याला पुरुषी समजली गेली अशा क्षेत्रातही स्वतःच्या गुणवत्ता सिद्ध केली. असे असूनही ७५ वर्षांनंतरही त्यांनी फक्त मतदारच राहावे, आपल्या 'मतबँका' सजवाव्या हीच पुरुषप्रधान राजकारणाची इच्छा आहे. राजकारण, अर्थकारण, भ्रष्टाचार सर्व पुरुषप्रधान संदर्भांना तडा जाईल

म्हणूनही महिला राजकारणामध्ये नको आहेत. एकदा का त्या मोठ्या संख्येने राजकारणात येऊन पदे घेऊ लागल्या तर सबंध पुरुषी अहंकार आणि संस्कृती दुखावली जाईल. केवळ याच कल्पनेने महिलांचे आरक्षण पुढे पुढे ढकलले जात आहे. आरक्षणाचा हा लढा हा महिलांच्या सत्ता आणि प्रतिष्ठेच्या हक्काचा महत्त्वाचा लढा आहे. बाईची प्रतिष्ठा तिने सवाष्ण असण्यात आणि नवऱ्याचा वंश वाढवण्यात, मुलगा देण्यामध्ये आहे या आपल्याकडील धारणा आहेत. या देशाच्या समान आणि सक्षम नागरिक म्हणून सभागृहांत त्यांचा प्रवेश मोठ्या संख्येने असणे यामध्ये सर्व स्त्रियांना व्यापक प्रतिष्ठा मिळणार आहे. महिला राजकारणात आल्याने कोणतेही वातावरण गढूळ होणार नाही. राजकारण अधिक मानवकेंद्री बनण्याची शक्यता त्यामुळे जास्त तयार होते. अनेक सामाजिक, सांस्कृतिक बदलाचा पायाही त्यामधून घातला जाऊ शकतो. अनेक सकारात्मक सामाजिक सुधारणाही होऊ शकतात. महिलांच्या आरक्षणाचा प्रश्न हा फक्त महिलांचा, महिला चळवळीचा प्रश्न नसून या देशातल्या सर्वसामान्य नागरिकांना सन्मानाने जगण्याचा समान हक्क मागणाऱ्या प्रत्येक राजकीय पक्षाचाही हा विषय असला पाहिजे. आता महिलांचा मतदार म्हणून वापर थांबवा.

***लता भिसे सोनवणे,*** *पुणे*
*राज्य सचिव,*
*भारतीय महिला फेडरेशन.*
*lata_fem@yahoo.com*

---

(पान ३० वरून) सोडला नाहीये. हे आशादायक आहे. आता ग्रुपमध्ये बहुतेक जणी वयाने ज्येष्ठ आहेत किंवा पन्नाशी पार केलेल्या आहेत. कोणाला वाटेल त्यांच्याकडून आता काय घडणार? म्हणजे बदल तरी काय होणार? पण एकेक स्वस्थ, विचारी माणूस हाही समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने मोलाचाच आहे. तेवढे झाले तरी पुरे.

शेवटी हा प्रयोग आहे. तो आहे त्या स्वरूपात अखंड चालणं अपेक्षित नाही... नसतं. ह्या सभासदांनी असे वेगवेगळे उपक्रम, प्रयोग आपापल्या पद्धतीने, आपल्या विषयातून करणं अपेक्षित आहे. माणूसपणाची इयत्ता सतत जागरूक, कृतिशील राहून वाढवत राहू, हे विद्याताईंचं सूत्र मनात ठेवून संवाद करत राहू.

विद्याताईंना हेच अभिवादन!

***आशा साठे,*** *पुणे*
*मोबाईल : ९४२१८५९७७८*

---

(पान ४१ वरून)

प्रसंगी प्राणही गमवावे लागत असतील. कितीही झालं तरी सगळ्या माणसांचं शरीर सारखंच. अशा अमानवीय कृत्यांमुळे शारीरिक नुकसान तर होणारच; पण तरीसुध्दा पोटाची खळगी भरण्यासाठी हा समाज जीवावर उदार होऊन असे चित्तथरारक प्रयोग करीत असेल. परंतु आता कोरोनाने त्यांची रोजीरोटी हिसकावून घेतली आहे. यापैकी कोणतंच काम त्यांना आता करता येत नाहीय. टेक्नॉलॉजीच्या या काळात मनोरंजनाची इतकी साधने उपलब्ध असताना यांच्या शारीरिक कसरती कोण पाहणार आता? जुन्या जडीबुटी, वनौषधी यावरही फारसा विश्वास उरला नाही कुणाचा आणि ते देणाऱ्या अशिक्षित, गरीब अशा लोकांवरही कोण विश्वास ठेवणार? डोंबारी, कोल्हाटी, मदारी या सगळ्याच जमातींचं कौशल्य हे त्यांचे पोट भरण्यात कुचकामी ठरत आहे. पूर्वीसुद्धा अत्यंत अल्प मिळकतीवरच ते कसेबसे गुजराण करायचे. शिक्षण, घर, स्वतःच्या मालकीची जागा या गोष्टींच्या अभावी हा समाज गावोगाव भटकत असतो. मानवी जन्म सगळ्यांनाच एकदाच मिळतो आणि अशा भटक्या समाजातील लोकांचा तो जन्म तर पोटाच्या विवंचनेत गावोगाव भटकत भाकरीच्या शोधातच संपून जातो.

***सारिका,*** *अमरावती.*
*sarikaubale077@gmail.com*

---

**पुरुष उवाच**
**दिवाळी अंक २०२१**

PURUSH UVACH
( MEN's VOICE )

पुरुष उवाच, पुणे या गटातर्फे प्रकाशित होणाऱ्या 'पुरुष उवाच! या दिवाळी अंकासाठी फक्त पुरुषांचेच साहित्य मागवत आहोत.
यावर्षीच्या दिवाळी अंकात :

- पाळत कुणाची,कुणावर आणि... का?
- आई :माध्यमातली आणि वास्तवातली
- माझ्या बायकोचा मित्र
- संस्कृती आणि प्रकृती मध्ये अडकलेला पुरुषार्थ
- स्त्रीचा झालेला पुरुष..
- घर कुणाचं घरकाम कुणाचं?
- लैंगिकता आणि नैतिकता

असे विशेष विभाग असणार आहेत.
शब्दमर्यादा १२०० ते १५००.
साहित्य ३० सप्टेंबरपर्यंत पुढील पत्त्यावर पाठवावे.

**संपादक, पुरुष उवाच**
द्वारा – मुकुंद–गीताली निवास, ब–२, ५०१,
कुमार प्राईड पार्क, सेनापती बापट मार्ग, पुणे १६
संपर्क – ०२०–२५६५२३२४
Email : purushuvachpune@gmail.com

(पान १३ वरून)

चिडवत असतात. एकदा तो आईला विचारतो, 'आई तूसुद्धा बाईच आहेस ना? मग तू माझा आदर्श का असू नये?' अजून एक उदाहरण म्हणजे आजही अनेक नेते दुसऱ्या नेत्यांना डिवचताना त्यांना 'हिजडा' अशी उपमा देतात. शिव्यांच्या ही संस्कृती पितृसत्ताच दाखवते.

बटलरनुसार शोषणातून कर्ता तयार होतो, तर शोषणाच्या विरोधातून 'राजकीय कर्ता' तयार होतो. हा आवाज सार्वत्रिक समतेची भाषा बोलू लागला की, तो क्रांतिकारी होतो. काही लोकांना अशी सार्वत्रिक समता किंवा लैंगिकतेबाबत मोकळीक भारताच्या वसाहतपूर्व काळात दिसते. त्यासाठी मग पुराणकथांचे, खजुराहोसारख्या मंदिरांचे दाखले दिले जातात. ही मोकळीक खरी असली तरी भारतीय संस्कृतीमध्ये 'स्त्री', 'पुरुष' आणि 'इतर' अशा त्रिकोणातच साऱ्यांना बसवलेले आहे. हे 'इतर' कोण आहेत, त्यांना समाजाच्या दैनंदिन आयुष्यात, व्यवहारांत कोणते स्थान होते, याचे सत्य कळत नाही. म्हणून 'लैंगिकतेची चळवळ' ही परदेशात सुरू झाली ह्याचा आधी स्वीकार करावा लागेल. उगीच एका सुवर्णकाळाच्या आभासी भूतकाळात न अडकता आधुनिकतेतून मिळालेल्या समतेच्या मूल्यांना धरून पुढे जाणेच योग्य ठरेल. म्हणून एलजीबीटीच्या जागतिक चळवळीतून मिळालेल्या लैंगिक ओळखींच्या नावांना पुन्हा एकदा सार्वत्रिक समतेची फूटपट्टी लावून भिडावं लागेल.

***जमीर कांबळे***, *पुणे.*
*hashtag.sexuality@gmail.com*

## कविता

### माय–बाप शेतकऱ्याचं चांगभलं

### पोरी

बडव बडव बडवून तुरी
तरण्या
पोरी
रिकाम्या झाल्या

कवळ्या अंगी घाम जिरवून
घरी
तुऱ्हा
जळतनाला आल्या

खुडून खुडून घेतली कणसं
पिवळ्या
पोरीची
चिपाटासारखी हाडं

वाहाटळीत उडाला पालापाचोळा
उभ्या
पोरी
जसीबुरखुंडं

येचून येचून घेतला कापूस
पोरीच्या
ओट्या
गठूडं झाल्या


पासऱ्या मापुन कूस रिकामी
पोरी
पऱ्हाटीसारख्या
फासावर गेल्या

खंडून खंडून येचल्या
पोरी
मातीच्या
लेकी झाल्या

निर्मळ निर्मळ रान करून
पोरी
भुर्र्र्र्र्र
उडून गेल्या

***अन्ना जगताप***, *हिंगोली*
*मोबाईल नं. ९९२१५५९३९४*

## आपल्या वाचनालयात




**इकेबाना । दत्ता दामोदर नायक**

प्रकाशक : साधना प्रकाशन । किंमत : रु. २००/- । पृष्ठसंख्या : २०३

इकेबाना हे प्रवासातल्या आठवणींचे पुस्तक आहे. सुरुवातीला वाटत राहतं की लेखक जे काही आपल्याला सांगतो आहे ते आपण नेट वर सहज वाचू शकू. पण जेव्हा लेखकाने लिहलेल्या एका एका देशाचे वर्णन आपण वाचतो तेव्हा लक्षात येते की, हे फक्त प्रवासवर्णन नाही. लेखकाने वेगवेगळ्या देशांची यात्रा केली आणि तिथल्या माणसांचे वैशिष्ट्य जाणून घेतले. स्थानिक गाड्यांनी प्रवास केला,त्यांच्या रुढीं,समजुती समजून घेतल्या. तसंच काही देशांचं भारताशी कसं नातं होतं, आहे हे ही सांगितलं. जसं पोर्तुगाल. लेखक स्वतः गोव्याचा असल्याने त्याने तो देश फार सुंदर तऱ्हेने आपल्या नजरेसमोर आणला. पोर्तुगीजांचा गोव्यावर कसा प्रभाव होता आणि आहे हे लेखक अनेक उदाहरणातून सांगतो. पोर्तुगाल मधले आजुले म्हणजे विविध डिझाईन निळ्या रंगात रंगवून केलेल्या मोझाईक टाईल्स. अशा प्रकारचे आजुले गोव्यात सुद्धा तयार केले जातात.

या पुस्तकात २१ प्रकरणे आहेत. त्यात भूतान, न्यूझीलंड, कंबोडिया, स्पेन, ब्राझील, पेरू, अर्जेंटिना अशा विविध देशांमध्ये लेखकाने प्रवास केला आहे. एखाद्या देशाच्या सुंदर ठिकाणाविषयी सांगतांना लेखक त्या दे शातले लेखक, चित्रकार यांच्याबद्दलही आपल्याला माहिती देतो. या पुस्तकात कोकणी भाषेतले अनेक शब्द आले आहेत, जसे की ईगर्ज, साकव, धुंगोर, पोदेर. लेखनाच्या ओघात त्यांचा अर्थ आपल्याला कळतो शिवाय प्रस्तावनेत या शब्दांचे अर्थही दिले आहेत. लेखकाला त्याच्या डोळ्याला जे जाणवलं आणि मनाने तो प्रभावित झाला त्याबद्दल मोकळ्या मनाने लिहलं आहे. त्यामुळे वाचतांना आपण त्यात अडकून जातो. या पुस्तकात लेखक एरिक फ्रॉम या लेखकाच्या लिखाणाबद्दल लिहितो. ते वाचतांना आपल्याला खऱ्या स्वातंत्र्याचा अर्थ कळतो.

**अश्विनी बर्वे,** निफाड

•••




**थंड हवेचे ठिकाण । सुकन्या आगाशे**

प्रकाशक : ग्रंथाली, मुंबई । किंमत : रु.२५०/- । पृष्ठसंख्या : २२५

पहिल्या कथेचेच नाव कथासंग्रहाला दिले आहे. सुरुवातीला ही गोष्ट आपल्याला साधीशी वाटते. म्हणजे अमेरिकेत राहणाऱ्या मैत्रिणीच्या मुलाचा घटस्फोट झालेला असतो आणि तो त्यात अडकलेला आहे. पण या साध्या गोष्टीतून लेखिका मनाचा तळ गाठायला आपल्याला भाग पाडते. आपल्या विचारांचे, कृतीचे अर्थ आपल्यासमोर उभी करते. मुख्य म्हणजे या कथासंग्रहात १२ कथा आहेत, आणि त्यातल्या सगळ्या नायिका खंबीरपणे पण आततायी, कर्कश न होता संघर्ष करत असतात. त्यामुळे समस्या तर आहेत पण त्यातून आपणच आपले मार्ग शोधायचे आहेत. हे वाचकाला कळते.

स्त्रियांनी शिक्षण घेतले आहे, त्या काही ना काही काम करत आपल्या पायावर उभ्या आहेत. तसेच काहीजणी तर एकमेकींना मदत करत भगिनीभावाने पुढे जात आहेत. पण यासर्वजणी वर्तमानाला भिडत आहेत. त्यासाठी कोणत्याही अलौकिक गोष्टींचा आधार घेत नाही. या संग्रहातल्या प्रत्येक कथा नायिका ताणतणावाला सामोरी जाते पण ती स्वतःचे स्वत्व, माणुसकी सोडत नाही. या नायिका आपल्या मनाचा तळ गाठतात, नक्की आपल्याला काय वाटतं याचा शोध घेतात. मैत्रीचं नातं तयार करतात. त्यामुळेच त्या संघर्षातून परत उभ्या राहतात. काही कथा लग्न संस्थेबद्दल बोलतात. प्रत्येक वेळी काळ, शिक्षण जीवनावर कसा परिणाम करतो हे पण बारकाईने यात दाखवलं आहे. भूतकाळातली प्रत घेवून त्यावर काही कथा आहेत.

या कथांमधील नायिका जगण्यातून स्वतःची ओळख निर्माण करतांना दिसतात. त्यांच्या या प्रवासात वाचक म्हणून आपणही सहज सामील होतो. प्रत्येक कथेचा आशय वेगळा असून ती कथा सांगण्याची शैली सुद्धा वेगळी आहे. तरीही कथा पसरट होत नाहीत. त्यामुळे आपण सहज पुढेपुढे वाचत जातो.

**अश्विनी बर्वे,** निफाड

•••

## बोलकं पत्र

### स्वतंत्र भारतातील स्त्री खरंच स्वतंत्र आहे का?

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीचे हे ७५वे वर्ष. या स्वतंत्र भारतात आजच्या स्त्रीने सर्वच क्षेत्र पादाक्रांत केले आहेत. स्त्री अर्थार्जनासाठी पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून, किंबहुना त्यांच्यापेक्षा काकणभर जास्तच कष्ट करताना दिसते. कौटुंबिक जबाबदारी कुशलतेने सांभाळून तारेवरची कसरत करत नोकरी, व्यवसाय करते. स्वतःचं अस्तित्व सिद्ध करण्यासाठी सर्व जगाशी लढते. ही लढाई केवळ शहरी भागातील सुशिक्षित स्त्रियांचीच नव्हे, तर ग्रामीण भागातील निरक्षर स्त्रियांचीसुद्धा आहे. स्त्री सुशिक्षित असो वा निरक्षर तिच्या परिस्थितीत फारसा फरक आढळून येत नाही. स्त्री वरच्या पोस्टवर असेल तर तिला सहकार्य करण्यात पुरुष वर्गाला कमीपणा वाटतो. तिच्या मार्गात अनेकदा आडकाठी निर्माण करण्यात येते. तिच्या कल्पना, योजना लवकर राबवल्या जात नाहीत. तिने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी सहजासहजी होत नाही. मनापासून सहकार्य करणारे पुरुष सहकारी हाताच्या बोटावर मोजणारे असतात. केवळ पुरुषच नव्हे तर एक स्त्री दुसऱ्या स्त्रीची प्रगती पाहू शकत नाही. सकाळी वर्तमानपत्र हातात घेतले की, नवविवाहितेचा छळ, आत्महत्या, सुनेची हत्या, साठ वर्षाच्या स्त्रीपासून ते अल्पवयीन मुलींवर पाशवी अत्याचार करून त्यांची निर्घृणपणे हत्या या घटना रोजच्याच आहेत. याही सर्व परिस्थितीवर मात करून धीटाईने स्त्री घराबाहेर पडतेय. खरे तर ती काळाची गरज झाली आहे. कारण, एकट्याच्या कमाईत घरखर्च भागत नाही. स्त्रीने घरात रांधा, वाढा व उष्टी काढा हे करून घराबाहेर जाऊन अर्थार्जन करण्यास विरोध होत नाही. कारण तिच्या मिळकतीने कुटुंबाची स्वप्ने पूर्ण होत असतात. स्त्री जवळ जर पैसा कमावून आणण्याची बुद्धिमत्ता आहे, तर आणलेल्या पैशाचा विनियोग कसा करावा हा निर्णय घेण्याची क्षमता नाही का? निश्चितच आहे; परंतु तिला ते स्वातंत्र्य दिलं जात नाही. कित्येक महिलांना त्यांचे बँक अकाउंट डिटेल्स माहीत नसतात. इतकेच काय तर बऱ्याच भगिनी अशा आहेत की, त्यांचे बँकिंग व्यवहार त्यांचे पती परमेश्वर बघतात. त्यांना केवळ बँकेच्या स्लीपवर सह्या करण्यापुरता अधिकार असतो. जर योगायोगाने पती–पत्नी एकाच ठिकाणी काम करत असतील तर मग स्त्रियांची बिकट अवस्था तर विचारायलाच नको. तिला मिळणारी बढती, तिचे होणारे कौतुक बघवत नाही. ते तिचा द्वेष, मत्सर करू लागतात. त्यांचा इगो हर्ट होतो. त्यातून कौटुंबिक तेढ निर्माण होते. मग स्त्री आपली सारी बुद्धिमत्ता, कौशल्य, छंद सर्व काही बाजूला सारते. प्रत्येक वेळी तिनेच आपल्या अपेक्षांचा, स्वप्नांचा बळी का द्यायचा? का एखाद्या वेळी पुरुष आपल्या मनाचा मोठेपणा दाखवत नाहीत? त्यांनीही कधीतरी तडजोड करायला हवी.

आजच्या समाजाने आधुनिक जीवनशैली स्वीकारली आहे. मात्र आधुनिक व सशक्त विचारशैली मात्र अजूनही अवगत झालेली दिसत नाही. स्त्री–पुरुष असा भेदभाव न करता दोघांकडेही व्यक्ती म्हणून पाहिले पाहिजे. तरच व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार आजच्या स्वतंत्र भारतात केला जाईल.

***निशा डांगे,***
*पुसद, जि.यवतमाळ.*

---

प्रिय गीताली,

जुलै २०२१चा आपला अंक मला खूप आवडला. गणेश मतकरींच्या मुलाखतीतल्या शेवटच्या प्रश्नाने मला खडबडून जाग आली. सोशल  मीडिया, यूट्यूब, ओटीटी– ह्या सगळ्यांमुळे आपल्याही वाचनावर परिणाम झालाय, हे नव्याने जाणवलं. म्हणजे कळतं; पण वळत नाही असं झालं होतं. ही मुलाखत वाचली आणि दोन दिवस सोशल मीडिया वगैरेंपासून चक्क फारकत घेतली. त्यामुळेच हा जुलैचा अंक अख्खा वाचू शकले. वेगवेगळ्या विषयांची, व्यक्तींची ओळख झाली. स्त्रीवादी विज्ञान, शैलजा टीचर, सुमनताई बंग, पावसातला माणूस... खरं म्हणजे सगळा अंकच अत्यंत वाचनीय आहे. नीलिमा शिकारखानेंच्या लेखामुळे मासिकाच्या सुरुवातीचा खडतर काळ डोळ्यांसमोर उभा राहिला.

ऑगस्टचा अंक वर्षारंभ म्हणजे स्पेशल असणारच!

शुभेच्छा!

रेवती गोगटे, मुंबई.

# ‘मिळून साऱ्याजणी’चं सामाजिक पालकत्व

संदीप ‘मसहूर’,
परेश जयश्री मनोहर

**मिळून साऱ्याजणीच्या ३२ व्या वाढदिवसानिमित्त सुरू करण्यात आलेल्या ‘सामाजिक पालकत्व’ या विशेष विभागाची रूपरेषा आणि भूमिका विशद करणारा हा पहिला लेख.**

आपण सारेच आपापल्या मुलामुलींची भरपूर काळजी घेतो, त्यांचा व्यवस्थित सांभाळ करतो. त्यांना उत्तम शिक्षण, सकस आहार, सुदृढ कौटुंबिक वातावरण पुरवण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. त्यांची सर्वांगीण वाढ व्हावी, कोणताच त्रास होऊ नये, त्यांनी आपल्यापेक्षा अधिक यशस्वी व्हावे, अशी आपली इच्छा असते. हे सारे झाले वैयक्तिक स्तरावरील, मात्र त्यांचा समाजातील वावर कसा असेल याविषयी किती जागरूकता, स्पष्टता पालकांना असते?

अनेकदा समाजात जेव्हा काही गैरवर्तन आढळते, तेव्हा सहज प्रतिक्रिया असते की अशा व्यक्तींना त्यांच्या पालकांनी काही संस्कार दिलेत की नाही? मुलामुलींना आपण निरनिराळी कौशल्यं शिकवितो, पण त्यांच्यामध्ये समाजभान जागवणारे पालकत्व पालकांनी आत्मसात करायला हवे. पालकांनीदेखील आपली कौशल्यं विकसित करायला हवीत. त्यातही आपल्या मुलामुलींच्या वैयक्तिक प्रगतीसोबतच सामाजिक आलेखही उंचावेल यासाठी दक्ष हवे.

समाजभान आणि पालकत्व यांतील संबंध तसेच त्यातील विविध पैलूंवर तपशीलवार आणि सातत्याने सुदृढ, सकारात्मक चर्चा घडून यावी या उद्देशाने ‘मिळून साऱ्याजणीचं सामाजिक पालकत्व’ हा विशेष विभाग आम्ही ‘मिळून साऱ्याजणी’ मासिकाच्या ३२ व्या वाढदिवसानिमित्त सुरू केला आहे. प्रसिद्ध मनोविकासतज्ज्ञ, लेखक, नाटककार डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या ऑनलाईन मुलाखतीने ‘मिळून साऱ्याजणी’चं सामाजिक पालकत्वाची सुरुवात झाली. या उपक्रमाचे मार्गदर्शक म्हणून डॉ. आनंद नाडकर्णी यापुढेही सोबत असणार आहेत.

‘मिळून साऱ्याजणी’चं सामाजिक पालकत्व छापील अंकासोबतच सोशल मीडिया (फेसबुक पेज, फेसबुक प्रोफाईल, इंस्टाग्राम, यूट्यूब, व्हॉट्सॲप ग्रुप्स, ट्विटर, ऑडियो पॉडकास्ट) वर देखील असेल. सोशल मीडियावर जागेचे आणि पोस्ट्सच्या संख्येचे बंधन नसल्यामुळे तिथे ‘मिळून साऱ्याजणीचं सामाजिक पालकत्व’ या छापील अंका व्यतिरिक्तचे अधिक

केंद्रशासनातर्फे
**महिलांसाठी / मुलींसाठी सुवर्णसंधी**

**महिला सक्षमीकरणासाठी उपयुक्त महिला स्वाधारगृह योजना**

समस्याग्रस्त, अनाथ, विधवा, परित्यक्ता, निराधार महिला आणि मुलींसाठी मोफत भोजनाची सोय. शिक्षणाची, जॉबची सोय.

– संपर्क –
**मीनाक्षी महिला मंडळ संचालित**
नारी विकास स्वाधार केंद्र, महालक्ष्मी नगर,
दसक, जेलरोड, नाशिकरोड, नाशिक ४२२१०१
मोबाईल नं. ९९७५२५८०२२

**'मिळून साऱ्याजणी'चं सामाजिक पालकत्वच्या मजकूर निर्मितीसाठी मासिकाच्या संपादक गीताली वि. मं. यांच्या नेतृत्त्वाखाली विविध पैलूंवर काम करणाऱ्या युवा प्रतिनिधींचा गट गठीत करण्यात आला आहे.**
**मार्गदर्शक : डॉ. आनंद नाडकर्णी**

अनुजा बेंडखळे (सदर लेखन आणि अभिवाचक), छाया गोलटगावकर (वकील, लेखिका, संचालक–आनंदघर), जमीर कांबळे (शिक्षक, लेखक), जयदीप कर्णिक (संगणकतज्ज्ञ, कवी), क्रांति अग्रिहोत्री डबीर (सामाजिक कार्यकर्ती), माधवी जाधव (संरक्षण अधिकारी), मुग्धा नलावडे (संचालक प्रक्रिया – Eduflex Learning LLP, शैक्षणिक क्षेत्रात सामाजिक काम), मुक्ता शिंगटे (सामाजिक कार्यकर्ती), परेश जयश्री मनोहर (सामाजिक कार्यकर्ता), प्रभा विलास (सामाजिक कार्यकर्ती), प्रज्ञा हेंद्रे–जोशी (वकील, लेखिका, मिसा प्रतिनिधी), प्रसाद शिरगावकर (लेखक), रसिका आगलावे (समुपदेशक), रोहिणी पाटील (मनोचिकित्सक, समुपदेशक), ऋतुजा सीमा महेंद्र (संचालक– वोपा), सोनाली दळवी (ट्रान्सजेंडर कार्यकर्ती), उत्तमकुमार इंदोरे (पत्रकार, लेखक), संदीप मसहूर (माध्यम संवादक)

आपणासही लेखन सहभाग द्यायचा असेल तर स्वागत!

## सामाजिक पालकत्व : कोणतं? कोणाचं? कशासाठी?

गेला काही काळ शहरी मध्यमवर्गीय समाजात जागरूक पालकत्वाबद्दल सातत्याने विचार होत, कृतिशीलतेच्या पातळीवर काही प्रमाणात स्थिरावताना दिसतो. आता सामाजिक पालकत्वाबद्दल बोलण्याचेही काही प्रयत्न होताना दिसताहेत. हे प्रयत्न अत्यंत प्रामाणिकपणे होताना दिसतात, हे जरी खरे असले तरीही अजूनही त्याचे केंद्र शहरी उच्चवर्णीय मध्यमवर्ग आहे हेच दिसते. त्यामुळे साधारणपणे सामाजिक पालकत्वाच्या चर्चांचा ओघ आणि रोख आपल्या मुलांना सामाजिक जबाबदाऱ्यांचे भान देणे, समाजातील वंचित समूहांची ओळख करून देणे, संवेदनशीलपणे दुर्बल घटकांसोबत वागायला शिकवणे असे सहृदयी पालकत्वाचे प्रयत्न आणि प्रयोग असे दिसते. यात गैर काहीही नाही. खरे तर, हे सुरू होणेही एक महत्त्वाची बाब आहेच.

परंतु, आपला कोणताही विचार, कोणतीही भूमिका ही आपण कोठे उभे आहोत यावर अवलंबून असते, आधारित असते. उदा. वर मांडलेल्या भूमिकेत आपण समाजातील प्रिव्हिलेज्ड घटकांमधून आहोत हे अनुस्यूत आहे आणि त्यातून आपल्या मुलांना इतरांविषयीचे भान देणे हा प्रयत्न आहे.


समाजातील वंचित, दलित आणि शोषित समाजाच्या भूमिकेतून जर सामाजिक पालकत्वाबद्दल बोलायचे झाले तर काय प्रकारचे समाजभान द्यायला लागेल? की हा समाज समानतेवर नाही तर शोषणावर आधारित आहे, की आपल्या शोषणाचे मूळ या समाजातल्या जाती आणि धर्मव्यवस्थेवर आधारलेले आहे, की आपल्याला माणसासारखे जगायचे असेल तर या शोषणाच्या बेड्या मोडून काढण्याशिवाय पर्याय नाही, की आपल्याला आपल्यासारखे सम शोषित घटक शोधून त्यांच्यासोबत जगता यायला हवे, की आपल्याला फक्त आपल्यातलेच नाही तर शोषक समाजातीलही संवेदनशील घटक शोधून एक व्यापक नेटवर्क बनवावे लागेल, की न लढता काहीही मिळणार नाही म्हणून लढावेच लागेल?

ही लढण्यासाठीची संवेदनशील कणखर मने घडवणे हेही सामाजिक पालकत्वाच्या व्याख्येत बसणारेच असेल ना?

***परेश जयश्री मनोहर***
*वाघळवाडी, ता. बारामती, जि. पुणे.*
*मोबाइल : ९८२२९१४७५१*

लेख, अनुभव कथन, कविता, मुलाखती, माहिती चौकटी, विशेष पुस्तक–सिनेमा परिचय, चित्रे, व्यंगचित्रे, पोस्टर्स, व्हिडियो, लाईव्ह, चर्चा आदी पोस्ट्स टाकण्यात येतील. 'मिसा'चे जे वाचक सोशल मीडियावर आहेत त्यांनी आमच्या तेथील पोस्ट्स वाचाव्यात, पाहाव्यात!

समन्याय, लिंगभाव समता (जेंडर), संवेदनशीलता, सामाजिक भान, मूल्यशिक्षण, पुरुषभान जागवताना, नकाराचा खिलाडू स्वीकार, ताणतणाव, समुपदेशन, व्यक्तिमत्त्व विकास, करिअर, नातेसंबंध, एकल पालकत्व, दिव्यांगांचे पालकत्व तसेच दिव्यांग




'मिळून साऱ्याजणीचं सामाजिक पालकत्व' या विभागाचं उद्घाटन करताना डॉ. आनंद नाडकर्णी यांची मुक्ता आणि उत्तम यांनी घेतलेली मुलाखत नारी समता मंचाने प्रायोजित केली.

पालक, दत्तक, बालकांचे हक्क व अधिकार, बालगृहे/निरीक्षणगृहे यांतील मुलांची जडणघडण, थर्ड जेंडर, कायदा साक्षरता, शहरी तसेच ग्रामीण अशा अनेकानेक बाबींसंदर्भात सतर्क पालकत्व कसे निभवावयाचे यासाठीची सजगता रुजवण्याचा प्रयत्न 'मिळून साऱ्याजणीचं सामाजिक पालकत्व'चा असेल.

पालकत्वाचा विचार करताना आपल्या मनात पटकन मुलांचाच विचार येतो; पण खूप सगळे काम मोठ्यांची भूमिका, विचार यांवर करावे लागते.

आपण पालक, पेरेंट असे शब्द वापरत असलो आणि त्यात आई–वडील असे ध्वनित होत असले तरी नानाविध नात्याने मुलांचा सांभाळ करणारे कितीतरी घटक आहेत : आजी–आजोबा, नातेवाईक, शिक्षक, पाळणाघर संचालिका, custodian, guardian, caretaker, warden आदी. जेव्हा आपण सामाजिक पालकत्वाचा विचार करतो तेव्हा आईवडलां पलीकडचे पालकत्व यात सरकारी यंत्रणा उदा. पोलीस, महिला व बाल विकास विभाग, बाल हक्क आयोग, सरकारी रुग्णालयातील बालरुग्ण विभाग, विधीसंघर्षग्रस्त बालकांचे खटले चालवणारे वकील आदींमध्ये 'सामाजिक पालकत्व'चे समजभान रुजणे गरजेचे आहे. शिवाय, आता कोरोनामुळे अनाथ बालकांचा प्रश्न आहे. नैसर्गिक आपत्ती, सामाजिक अशांतता, कौटुंबिक पातळीवर अव्हेरल्यामुळे अनाथ झालेल्यांचे पालकत्व देखील समाजानेच जबाबदारीने निभवावयाचे आहे.

आणि 'पालकत्व', 'देखरेख', 'संगोपन', 'सांभाळ', 'काळजीवाहू' हे काही केवळ मुलांपुरतेच मर्यादित नाही. अनेकानेक गोष्टींची देखभाल करणे आवश्यक असते. अगदी आपल्या ऐतिहासिक वास्तूंची देखील!

एकूणच प्रत्येकाचा सामाजिक वावर जबाबदार असणे महत्त्वाचे आहे.

'मिळून साऱ्याजणी'चं सामाजिक पालकत्व यामध्ये विविध पैलूंवर तपशीलवार आणि सातत्याने सुदृढ, सकारात्मक चर्चा घडून यावी असा आमचा प्रयत्न आहे.

विभाग संयोजक : संदीप मसहूर
९४२३८५८०७७
miloonsaryajani@gmail.com

## आम्ही एकत्र, आमची एकजूट

**सामाजिक परिवर्तनासाठी या साऱ्यांची भूमिका एकच आहे. म्हणून आम्ही एकत्र आहोत हातात हात घालून**

**अक्षरस्पर्श ग्रंथालय :** ०२०–२५४२४९१५,
**नारी समता मंच :** ०२०–२४४७३११६,
**साथ–साथ विवाह अभ्यास मंडळ :** ९४२२०८९१२१,
**सखी साऱ्याजणी** (सखी मंडळाचं नवं नाव) : ०२०–२४५३८७६३,
आणि **मिळून साऱ्याजणी :** ७४४७४४९६६४
अशा आमच्या पाच संस्था/संघटना म्हणजे एका मनगटातून उगवलेली पाच बोटं. आणि त्याला फुटलेलं सहावं बोट म्हणजे,
**पुरुष उवाच** – ०२०–२५६५२३२४.

**अमेरिकेत मराठी स्त्रियांसाठी हेल्पलाईन – मैत्रिण**
अमेरिकेत कुणी मराठी स्त्री अडचणीत असेल तर ती मदत मागू शकते.
तेथील संपर्क :
सुनीता धुमाळे २०३ ६९५ ९९५१ (हा नंबर टोल फ्री नाही)

# प्रतिनिधी यादी

**हे मासिकाचे विस्तारित कुटुंबच आहे. प्रतिनिधी म्हणजे मासिकाच्या विस्तारित कुटुंबाचे घटक. प्रतिनिधी विनामानधन काम करतात. आपणही 'साऱ्याजणी'च्या संदर्भातील कामासाठी त्यांच्याशी संपर्क साधू शकता. वर्गणीही देऊ शकता.**

**समाजमाध्यम प्रतिनिधी**
प्रीती पुष्पा–प्रकाश :
मो. ९४२२५१७१२९

**महाराष्ट्र प्रतिनिधी**
सरिता आवाड :
मो. ९८३३९८७५६८

**अहमदनगर**
प्रज्ञा हेन्द्रे–जोशी :
मो. ९८५००७५४४३

**अकोला**
दीप्ती जोशी :
फोन ०७२४/२४२१६१३
मो. ९४२३१५०५१५

**अमरावती**
शोभा रोकडे :
मो. ९९६०९३७७६९

**आंबेजोगाई**
अरुंधती पाटील :
मो. ९४२२७४४१६६

**औरंगाबाद**
सुलभा खंदारे :
मो. ९४२२२०११२१
प्रतिभा अहिरे :
मो. ९२८४१९६३०४,
७२१९१३१३६८

**बेळगाव**
मनीषा सुभेदार :
फोन. ०८३१/२४०३९३८
मो. ९३४२५४१८८६

**बीड**
हेमलता पाटील :
फोन. ०२४४२/२२२४२०
मो. ९८२२६३११४४

**बारामती**
सीमा गोसावी :
फो. ९८५०९३४३४२

**बार्शी**
भारती रेवडकर :
मो. ९६०४५१५५२३

**बुलडाणा**
नरेंद्र लांजेवार :
मो. ९४२२१८०४५१

**बेंगळुरू**
नीता जाधव :
मो. ०९८४५०६६१७३

**चाळीसगाव**
वैशाली निकम :
मो. ९४२१५१२५३३

**चंद्रपूर**
गीता देव्हारे–रापुरे :
मो. ९९७५३४९५५५

**दौंड**
अरुणा मोरे :
मो. ९८५००१४५७३

**गोवा(पणजी)**
उज्ज्वला आचरेकर :
मो. ०९४२११५७९४६

**हैदराबाद**
शुभांगी परळीकर :
मो. ९२९६०५०००२
फोन. ०४०/२४६०८५६६

**जळगाव**
शमा सुबोध :
मो. ९३७३०३५५३५

**कणकवली**
शमिता बिरमोळे :
फोन. ०२३६७–
२३२९०९/
२३२५०७

**कऱ्हाड**
सविता मोहिते :
मो. ९८२२४०३७७१
(वेळ : सां ५ ते ६)

**कोल्हापूर**
उज्ज्वला हिरकुडे :
मो. ९८९०८३८६५५
समिक्षा फराकटे :
मो. ८००७१९०१०५

**पद्मानगर, लातूर**
शैलजा बरूरे :
९४२३७१४५३४

**महाबळेश्वर**
नीता भिसे :
मो. ९४२०७७१५४३

**मालगुंड**
अस्मिता रुग्गे :
फो. ०२३५७/२३५०१३
मो. ९६२३६९९१५४

**मुंबई**

**मालाड (प.)**
मीनाक्षी दादरावाला :
फो. ०२२/२८८२३२४९

**मुलुंड**
रजनी करंदीकर :
मो. ९८९२४७३३२७

**विलेपार्ले (पू.)**
विनिता हाटे :
फो. ०२२/२६१३०६४२
(वेळ : सायं. ८ नंतर)

**वाशी (नवी मुंबई)**
शरयू देशपांडे :
मो. ९३२५००१९६२

**मालवण**
वैशाली पंडित :
फोन ०२३६५/२५२९९२
मो. ९४२२०४३०२५

**नागपूर**
सुभाष तुलसीता :
मो. ९३७१५९९९२३
वर्षा पतके थोटे
(शब्दाली) :
मो. ७५५८४१९७६५

**नांदेड**
अनघा जोशी मुधोळकर :
मो. ९४२२४३४४४०

**नाशिक**
मेधा वैजापूरकर :
फोन ०२५३/२५३०१०३

**निपाणी**
शोभना शिपूरकर :
मो. ०९४४८८६१९३३

**परभणी**
ज्योती चौंडे :
मो. ९०९६५०५१७६

**पुणे**
सुनीता भागवत
(स्वारगेट) :
मो. ९४२२३१०३७८
दीपा देशमुख
(बाणेर–बालेवाडी) :
मो. ९५४५५५५५४०
गौरी जानवेकर
(सिंहगड रोड) :
मो. ९८८१८८७५९०
मीरा कुलकर्णी (पाषाण) :
मो. ९४२२१८९२६४

**पुरंदर जि. पुणे**
अजरुद्दीन नदाफ :
मो. ९१३०५७६६९६

**पंढरपूर**
फैमिदा बिजापूरे :
मो. ९९२२१९१८५७

**सफाळे जि. पालघर**
स्वाती भोईर :
मो. ८१०८३२२३९९

**सातारा**
श्रीकांत के. टी. :
फोन ०२१६२/२३२०६०
मो. ९८२२०६४८००

**देऊर, जि. सातारा**
तरुजा भोसले :
मो. ९५६१०९३८३८

**सावंतवाडी**
अर्चना वझे :
फोन ०२३६३/२७२८२८

**शिंदखेडा, जि. धुळे**
संदीप गिरासे :
मो. ९४२३४९४५१५

**सोलापूर**
सरोजनी तमशेट्टी :
मो. ९९६०१०३२९४

**सांगली**
छायाश्री जाधव :
फोन ०२३३/२३७६८६१
मो. ९८६००४९८८०

**सांगली जिल्हा**
सोनिया कस्तुरे :
मो. ९३२६८१८३५४
नामदेव कस्तुरे :
मो. ९४२२४१०८५४

**तासगाव, जि. सांगली**
मिनल कुडाळकर :
मो. ९४२३८७२४१६

**सिंधुदुर्ग जिल्हा**
अर्पिता मुंबरकर :
मो. ९४२०२६११९६

**रिसोड, जि. वाशिम**
चाफेश्वर गांगवे :
मो. ९०९६६७५००१

**यवतमाळ**
आशा देशमुख :
मो. ९४२३४३६०४३
मंगला सरोदे : फोन
०७२३२/२४२८२९

## परदेशातील प्रतिनिधी

**VIDWANS SHAILA** :
10, Inverness Drive, Kendall Park, **NJ** 08824
Email : Shaila@vidwans.com

**ADITI KELKAR HATE :**
Flat no. 410, Burj I Nahada Tower, I Nahada 1, P. O. Box No. 341235 Dubai, **UAE.** PH. 971-4-2389467, Mobile- 971-56-1798331
Email : aditikelkar21@gmail.com

**DEVINA ASHISH DEVALEKAR :**
12, Bushnell place, Maidenhead. Post Code - SL65FD London. **UK.** Ph - 0044 7961099087.
Email - ddevalekar@yahoo.com

**JYOTI KANITKAR :**
13228 Stable Brook Way, **Herndon**, VA20171
Phone no : 703-478-2680
Email : jyoti@kanitkar.com

**खालील ठिकाणीही 'मिळून साऱ्याजणी'ची वर्गणी स्वीकारली जाईल.**
(१) हिराचंद नेमचंद वाचनालय : १३४, 'मुरारजी पेठ, सोलापूर – ४१३००१. फोन : २७२६६२०
(२) साधना : ४३०–३१, शनिवार पेठ, पुणे – फोन : २४४५९६३५

**आमचे वितरक :**
पूनम एजन्सी – २४४९४६६८, बी. डी. बागवे आणि कंपनी, मुंबई– २३८५७०१२



**डॉ. मल्हार कावळे**

जन्म : ९ सप्टेंबर १९३९
मृत्यू : १९ डिसेंबर २०१८

स्मृतिप्रीत्यर्थ

मिळून साऱ्याजणी

आणि

मार्गी Marg9ee UPSC·MPSC

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# आकलन

## वैचारिक निबंध स्पर्धा २०२१
(वर्ष पहिले)

### उत्तेजनार्थ पारितोषिके

| | |
|---|---|
| **शिवानी शिदोरे**<br>सावेडी (जि. अहमदनगर) | **सायली फासके**<br>उंदरवाडी (कागल, जि. कोल्हापूर) |

### परीक्षक

| | |
|---|---|
| **इंदुमती जोंधळे**<br>(प्रसिद्ध मराठी लेखिका) | **सतीश देशपांडे**<br>(कार्यकारी संपादक, 'द युनिक बुलेटिन') |

**प्रायोजक : श्रीमती विशाखा कावळे आणि कुटुंबीय**

## निकाल



प्रथम क्रमांक

**नेहा शहा**
(महाड, जि. रायगड)



द्वितीय क्रमांक

**विवेक घाडगे**
(राजळे, जि. सातारा)



तृतीय क्रमांक

**प्रियांका तुपे**
(पुणे)


१ ऑगस्ट या लोकमान्य टिळक पुण्यतिथी
आणि अण्णाभाऊ साठे जयंती दिनी
दोघांच्या स्मृतीला अभिवादन करून

मिळून साऱ्याजणीचा

# मिसा
# वाचक कट्टा
whatsapp ग्रुप!

हा अभिनव उपक्रम सुरु करण्यात आला.

रसिका भट लिमये आणि संध्या सुमन
या दोन युवा ॲडमिन्स
हा व्हॉट्सॲप ग्रुपचा उपक्रम
हाताळणार आहेत.

**येथे काय असेल :-**

- ✓ 'मिळून साऱ्याजणी' मासिकातील साहित्यावर चर्चा, समीक्षा, परखड मते-मतांतरे, विचार-विनिमय
- ✓ 'मिळून साऱ्याजणी'च्या उपक्रमांची, कार्यक्रमांची माहिती
- ✓ 'मिळून साऱ्याजणी' परिवारातील घडामोडी
- ✓ सदस्यांचे स्वलेखन आणि उत्तम, निवडक साहित्यास फेसबुक, ईन्स्टाग्राम वर प्रसिद्धी तसेच निवडक साहित्याचे अभिवाचन
- ✓ सहभागी सदस्यांचे स्वतःचे लेखन, अगदी इतरत्र प्रसिद्ध झाले असेल तरी त्याच्या लिंक्स फॉरवर्डस चालतील

**काय नसेल :-**

- ✗ असंबंधित फॉरवर्डस
- ✗ राजकीय, धार्मिक, जातीय टीकाटिप्पणी
- ✗ असभ्य, अभिरुचीहीन भाषा
- ✗ द्वेष, भडकाऊ, खोट्या पोस्ट्स
- ✗ व्यावसायिक प्रमोशन्स

अवघ्या आठवड्याभरातच या उपक्रमास भरघोस प्रतिसाद मिळून एक ग्रुप फुल्ल झाला,
आता दुसऱ्या ग्रुपसाठी नोंदणी सुरु झाली आहे!!
आपणांस मिळून साऱ्याजणीचा वाचक कट्टा या व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये सामील व्हायचे असेल तर आम्हाला,
Please Add Me असा मेसेज ७४४७४ ४९६६४ या मोबाईल व्हॉट्सॲप क्रमांकावर पाठवा.
शिवाय याच मेसेज मध्येच तुमचे नाव, वय, गाव/शहर आणि व्यवसाय हेदेखील कळवा.

**REGISTERED**
License to post without prepayment of postage No.: **WPP - 34**
RNI Regd.no. MAHMAR/2000/02001 Declaration No SDO/Pune City/ SR/11/2021
Postal Regd.No. PCW/043/2021-2023
Published & Posted on 01/09/2021
Posting at PSO, Pune GPO - 411001


# अमन की ओर

(प्रेमाला पर्याय नाही)

**तरुण वास्तवाचा वेध । मिळून साऱ्याजणी - ऑक्टोबर-नोव्हेंबर जोडअंक २०२१**

'अमन की ओर' जाण्यासाठी प्रेमाला पर्याय नाही' या आशयाला केंद्रस्थानी ठेवत आजचे तरुण रोजगार, शिक्षण, राजकारण हिंसा, प्रेम, लैंगिकता, शांती अशा महत्त्वाच्या विषयांबद्दल काय विचार करतायत, त्यांच्या मनाच्या प्रतलावर कोणती आंदोलनं सुरु आहेत याचा त्यांच्याशी प्रत्यक्ष बोलून घेतलेला शोध हे या जोडअंकाचं खास आकर्षण असणार आहे.

अतिथी संपादक :
**नितीन जाधव, काजल बोरस्ते**



**या विभागात -**

- चित्रपट माध्यमाचा वापर शोषित वर्गाचं जगणं मांडण्यासाठी करणारे कलाकार, दिग्दर्शक ह्यांच्या मुलाखती
- एकनिष्ठा मानणारी 'मोनोगॅमी' आणि सोबतीच्या अनेक शक्यता उलगडणारी 'पॉलीॲमरी' या दोन्ही व्यवस्थांवर मिलेनियल्सचं भाष्य
- 'आयडेंटिटी पॉलिटिक्स'च्या विविध आयामांबद्दल लिहितायत सागर कांबळे, प्रथमेश पाटील, मोईन कुरेशी, प्रियांका तुपे आणि संदेश कुडतरकर
- लैंगिक अधिकार म्हणजे काय आणि ते का महत्त्वाचे आहेत ह्यावर लिहितोय लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचा विद्यार्थी प्रवीण निकम
- तरुणाईचं मन वाचणाऱ्या पुस्तकांची ओळख - अविनाश उषा वसंत लिखित 'पटेली' आणि श्वेता सीमा विनोद लिखित 'आपल्याला काय त्याचं?'
- श्रुती मधुदीप, साहिल कबीर, मुक्ता बाम या तरुण लेखकांच्या कथा
- तरुण कवींच्या कविता, पत्रं, मीम्स आणि बुद्धीला खुराक असणाऱ्या अनेक गोष्टी!

**याशिवाय अंकात -**

- ज्येष्ठ स्त्रीवादी विचारवंत व कार्यकर्त्या उमा चक्रवर्ती यांची विशेष मुलाखत
- कथेच्या दालनात - नीरजा, नीलिमा बोरवणकर, भारती पांडे आणि निशा डांगे
- कवितेच्या दालनात - कल्पना दुधाळ, अश्विनी धोंगडे, आश्लेषा महाजन, राहुल शिंदे
- पुस्तकांच्या मनात - दीनानाथ मनोहर, प्रज्ञा दया पवार यांच्या नवीन पुस्तकांचा परिचय
- 'वर्क फ्रोम होम'चं देणं काय? - दीपाली दोंदे
- कला क्षेत्रातील तरुणाईची एकतिशी - संजीव खांडेकर
- बदलती तरुणाई - रविंद्र रुक्मिणी पंढरीनाथ
- अफगाणिस्तानमधील पहिल्या स्त्री चित्रपट दिग्दर्शक रोया व अलका सादत - सुषमा देशपांडे

**पृष्ठसंख्या - १२० किंमत - रु. १००/-**